


सोलापूर

SOLAPUR TARUN BHARAT

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

आसमंतसह

लातूर

रविवार, १८ जानेवारी २०२६ । वर्ष ३ रे अंक ३१९ । पाने १२+८ । किंमत रु. ६/-

■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### ‘ऑपरेशन सिंदूर’च्या हुतात्म्यांसाठी युद्धस्मारक

**जम्मू** : मागील वर्षी मे महिन्यात ‘ऑपरेशन सिंदूर’दरम्यान हौतात्म्य पत्करणाऱ्या एका वरिष्ठ अधिकाऱ्यासह इतर हुतात्म्यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी लष्कराने जम्मू-काश्मिरात सरकारच्या समन्वयाने राजौरीत एक युद्धस्मारक उभारले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी शनिवारी दिली. हे स्मारक गुज्जर चौकात उभारण्यात आले आहे. याच ठिकाणी मागील वर्षी ७ मे रोजी भारतीय सशस्त्र दलांनी सीमेपलीकडे पाकिस्तानातील दहशतवादी पायाभूत सुविधांना लक्ष्य करण्यासाठी ‘ऑपरेशन सिंदूर’ सुरू केले होते. याला प्रत्युत्तर देत पाकिस्तानी लष्कराने नागरी भागांवर तीव्र गोळीबार केला होता. पाकिस्तानी गोळीबारात प्राण गमावलेल्यांमध्ये राजौरीचे अतिरिक्त जिल्हा विकास आयुक्त राजकुमार थप्पा यांचा समावेश होता.

### मुलक्कल बलात्कार प्रकरणी सरकारी वकिलाची नियुक्ती


**कोट्टायमः** माजी जालंधर बिशप फ्रँको मुलक्कल यांच्यावरील बलात्कार प्रकरणातील पीडित ननने शनिवारी केरळ उच्च न्यायालयात कायदेशीर कार्यवाही हाताळण्यासाठी विशेष सरकारी वकील नियुक्त केल्याबद्दल केरळ सरकार आणि मुख्यमंत्री पिनराई विजयन यांचे आभार मानले. अधिवक्ता बी. जी. हरेंद्रनाथ यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे आणि याबाबतची अधिसूचना लवकरच जारी केली जाईल, असे शुक्रवारी, मुख्यमंत्री कार्यालयाने सांगितले. वृत्तपत्रांतील बातम्यांमधून या नियुक्तीबद्दल माहिती मिळाली, असे कुराविलंगड येथे पीडित ननने सांगितले. सरकार, मुख्यमंत्री, माध्यमे आणि माध्यम प्रतिनिधींचे आभार मानते. आमच्या विनंतीला गती देण्यासाठी समाजातील अनेक लोकांनी स्वाक्षरी मोहीम चालवून आम्हाला पाठिंबा दिला, असे नन म्हणाल्या.

### पालक्कडमध्ये बिबट्या जेरबंद

**पालक्कड** : मानवी वस्तीत शिरलेल्या एका बिबट्याला शनिवारी येथे नेनमारा येथे पिंजऱ्याच्या सापळ्यात पकडण्यात आले, असे वन अधिकाऱ्यांनी सांगितले. तोच प्रौढ बिबट्या एका रॉटविलर श्वानावर हल्ला करत असल्याचा एक व्हिडीओ समाज माध्यमावर व्हायरल झाला होता. या श्वानाने प्रतिकार करून त्या वन्य प्राण्याला पळवून लावले होते, असे वन अधिकाऱ्यांनी सांगितले. ही घटना मागील महिन्यात पोथुंडी वन चौकीच्या हद्दीजवळील विथनसेरी येथे घडली होती. यापूर्वी, या बिबट्याने परिसरातील घरांमध्ये इतर श्वानांवरही हल्ला केला होता. या वारंवार घडणाऱ्या घटनांनंतर, वनविभागाने एका निर्जन ठिकाणी पिंजऱ्याचा सापळा लावला होता. शनिवारी सकाळी गावकऱ्यांना बिबट्या पिंजऱ्यात अडकलेला दिसला आणि त्यांनी वन अधिकाऱ्यांना माहिती दिली.

### बस उलटून १७ जण जखमी

**तिरुवनंतपुरम्** : एक पर्यटक बस उलटल्याने शनिवारी विद्यार्थी आणि शिक्षकांसह १७ जण जखमी झाले, अशी माहिती पोलिसांनी दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जखमींमध्ये त्रिशूर जिल्ह्यातील कोडकारा येथील एका महाविद्यालयाचे शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा समावेश आहे. ते औद्योगिक भेटीसाठी विझिंजम बंदराकडे जात होते.ही घटना पहाटे ३.३० च्या सुमारास घडली. नवाइकुलमजवळील एथुक्काड येथील राष्ट्रीय महामार्गाच्या सर्व्हिस रोडवरून जाणारी बस चालकाच्या नियंत्रणाबाहेर जाऊन एका घरावर आदळली आणि उलटली. घराचे किरकोळ नुकसान झाले. या घरात राहणारे कुटुंब सुरक्षित असल्याचे पोलिसांनी सांगितले. बसमध्ये विद्यार्थी, शिक्षक आणि बस कर्मचाऱ्यांसह सुमारे ४२ लोक होते. स्थानिक रहिवाशांनी घटनास्थळी धाव घेतली आणि अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढण्यास मदत केली. यांना नंतर परिपल्ली येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले.



### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,४२,६०० |
| चांदी (प्रतिकिलो) | रु. २,८३,५०० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३२.९ | १७.९ |
| अमरावती | ३३.६ | १२.० |
| भंडारा | २९.० | १४.६ |
| बुलडाणा | ३२.० | १५.८ |
| चंद्रपूर | ३१.६ | १३.२ |
| गडचिरोली | ३०.२ | ११.६ |
| गोंदिया | २९.२ | ८.२ |
| नागपूर | ३०.८ | १०.२ |
| वर्धा | ३२.० | १२.० |
| वाशीम | ३१.० | १३.८ |
| यवतमाळ | ३१.० | १०.० |

# संपन्न देशच विश्वाचे संचालन करू शकतो

**भय्याजी जोशी यांचे गोंदिया येथे प्रतिपादन**

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या केशव भवनाचे लोकार्पण

◆ **गोंदिया, १७ जानेवारी**

आजच्या जागतिक व्यवस्थेत केवळ नैतिकता, आदर्श किंवा सांस्कृतिक मूल्यांच्या आधारे कोणताही देश प्रभावी जागतिक नेतृत्व करू शकत नाही. भौतिक, आर्थिक, औद्योगिक व तंत्रज्ञानात्मकदृष्ट्या संपन्न असलेले देशच जागतिक घडामोडींचे संचालन करतात, असे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय निमंत्रित सदस्य भय्याजी जोशी यांनी व्यक्त केले.

ते शनिवारी गोंदिया येथील रेलटोली स्थित राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नवनिर्मित केशव भवनाच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर रा. स्व. संघाचे विदर्भ प्रांत संघचालक दीपक तामशेट्टीवार, विभाग संघचालक दलजीतसिंग खालसा उपस्थित होते.

भय्याजी जोशी म्हणाले, जागतिक राजकारणात प्रभाव निर्माण करायचा असेल तर आर्थिक सामर्थ्य, उत्पादनक्षमता, विज्ञान-तंत्रज्ञान आणि औद्योगिक प्रगती अनिवार्य आहे. इतिहास सांगतो, ज्यांच्याकडे भौतिक बळ आहे, तेच देश आंतरराष्ट्रीय धोरणे, व्यापार नियम आणि जागतिक दिशा ठरवतात. आदर्श महत्त्वाचे असले तरी ते प्रभावी ठरवण्यासाठी सामर्थ्याची जोड आवश्यक आहे. आजच्या समाजाला प्रभावी, चारित्र्यसंपन्न आणि राष्ट्रनिष्ठ व्यक्तिमत्त्वांची गरज असल्याचे सांगत त्यांनी तरुणांना उद्योग, संघटन, समाजकार्य आणि राष्ट्रनिर्मितीत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. तत्पूर्वी, भय्याजी जोशी यांच्या हस्ते नवनिर्मित केशव भवनाचे विधिवत लोकार्पण करण्यात आले. यावेळी भवन निर्माणकर्ता शशी वाढई यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला तसेच श्याम हरकरे लिखित अण्णाजी कुलकर्णी यांच्या जीवनावर आधारित पुस्तकाचे विमोचन करण्यात आले.

प्रास्ताविक समाज जागृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष लीलाराम बोपचे यांनी, संचालन व आभार प्रदर्शन बाळकृष्ण बिसेन यांनी केले. कार्यक्रमाला माजी खासदार सुनील मेंढे, आ. विनोद अग्रवाल, आ. संजय पुराम, जिप अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, स्वयंसेवक उपस्थित होते. ◀(तभा वृत्तसेवा)



कार्यक्रमात संबोधन करताना भय्याजी जोशी व व्यासपीठावर उपस्थित मान्यवर

### संघ कोणत्याही धर्माच्या विरोधात नाही

संघ कोणत्याही धर्माच्या विरोधात नसून, दुर्गुणांच्या विरोधात आहे, परिवर्तनाचे खरे सामर्थ्य सकारात्मक विचारांवर आधारित असते. हिंदू विचार हे मुळात सकारात्मक असू.न विश्वकल्याणासाठी सकारात्मक विचारांची आवश्यकता आहे. विश्वाचे संचालन करण्याचे सामर्थ्य प्रत्येक हिंदूमध्ये आहे, मात्र समाज दुर्लक्ष करून चालणार नाही. समाजाला सामर्थ्यवान बनवावे लागेल. सकारात्मक विचार निर्माण करण्यासाठी हिंदुत्वाची गरज आहे, असे ते म्हणाले.

### संघात त्यागाची जीवनशैली

संघाच्या कार्यपद्धतीबाबत बोलताना ते म्हणाले, व्यक्ती निर्माणासाठी समर्पित जीवन आवश्यक असून, त्यागाची जीवनशैली संघात प्रत्यक्ष पाहायला मिळते. संघावर अनेक संकटे आली, परंतु त्याला मोडून काढण्याची ताकद कुणातही नव्हती. संघ सातत्याने वाढत गेला. हिंदू समाज संघटित करणे कठीण मानले जात असतानाही एका छोट्या अंकुरापासून आज संघाचा विशाल वटवृक्ष उभा आहे. लाखो स्वयंसेवकांच्या विश्वासावर संघ आज विश्वातील सर्वांत मोठी स्वयंसेवी संघटना म्हणून ओळखली जाते.

# बनावट नोटा छापणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

### बोरी खुर्द येथे उडाली खळबळ

◆ **पुसद, १७ जानेवारी**

बोरी खुर्द येथील एका घरात ५०० रुपयांच्या बनावट नोटा छापण्यात येत असल्याची गुप्त माहिती पुसद शहर पोलिसांना मिळाली. या माहितीवरून पोलिसांनी लगेच बोरी खुर्द येथे धाड टाकली. पोलिसांनी या धाडीत बनावट नोटा छापण्याचे साहित्य जप्त करून दोन आरोपींना ताब्यात घेतले तर एक आरोपी फरार आहे. ही कारवाई १७ जानेवारी रोजी संध्याकाळी ५ वाजता करण्यात आली.

आरोपी संतोष सूर्यवंशी, गणेश गायकवाड हे विनोद केरबाजी कुरडे (बोरी) यांच्या घरी प्रिंटरवर ५०० रुपयांच्या बनावट नोटा छापत होते. त्यांनी १५ नोटा छापल्या होत्या.




उपविभागीय पोलिस अधिकारी हर्षवर्धन बिजे यांच्या मार्गदर्शनात व ठाणेदार सेवानंद वानखेडे यांच्या नेतृत्वात पोलिसांनी छापा टाकून ५०० रुपयांच्या ४ भारत सरकारच्या मूळ नोटा व १५ बनावट नोटा जप्त केल्या. तसेच रसायन, प्रिंटर, कोरे कागद, कटर, पॅड इत्यादी साहित्य जप्त करून आरोपी संतोष सूर्यवंशी, गणेश गायकवाड यांना अटक केली. आरोपी विनोद कुरडे हा आरोपी फरार आहे.

पोलिस हेडकॉन्स्टेबल सुनील मदने यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई एपीआय केदार तसेच सुनील मदने, पंकज पातुरकर व शंकर टाळीकोटे हे पोलिस हेडकॉन्स्टेबल आणि एनपीसी खुशाल चव्हाण, पीसी जुनैद सय्यद व दिनेश सोळंके यांनी केली. ◀(तभा वृत्तसेवा)

# रेवा डायमंड्सकडून हिऱ्यांच्या किमतीवर २५ टक्के सवलत

◆ **पुणे, १७ जानेवारी**

लक्झरी जेव्हा परंपरेशी आणि विश्वासाशी एकरूप होते, तेव्हा सौंदर्याला नवा अर्थ मिळतो. १८३२ पासून विश्वासाचे नाव असलेल्या पु. ना. गाडगीळ आणि सन्सच्या घराण्याकडून सादर केलेल्या रेवा डायमंड्स, हिऱ्यांच्या विश्वात एक अनोखी आणि लक्षवेधी ऑफर सादर करत आहेत.



पहिल्यांदाच, रेवा डायमंड्सकडून हिऱ्यांच्या किमतीवर थेट फ्लॅट २५ टक्के सवलत देण्यात येत आहे. ही ऑफर नेकलेस आणि बांगड्यांवर उपलब्ध असेल. ही मर्यादित कालावधीसाठी असलेली ऑफर म्हणजे दर्जा, सौंदर्य आणि लक्झरीचा परिपूर्ण संगम आहे. रेवा डायमंड्समधील प्रत्येक दागिना हा उत्कृष्ट कारागिरी, नाजूक डिझाईन आणि निवडक चमकदार हिऱ्यांचा प्रत्यय देतो. खास प्रसंगांसाठी भव्य नेकलेस असो किंवा रोजच्या लक्झरीसाठी साजेशा बांगड्या प्रत्येक दागिना आयुष्याच्या सुंदर क्षणांना अधिक खास बनवतो. नववर्ष, लग्नसराई किंवा आपल्या माणसांसाठी परफेक्ट गिफ्ट शोधत असाल, तर ही ऑफर म्हणजे हिऱ्यांच्या आनंदाचा सुवर्णयोग आहे. इथे केवळ किंमत नाही, तर आनंद, आत्मविश्वास आणि आठवणी मोलाच्या ठरतात.

ही खास ऑफर फिनिक्स मॉल ऑफ द मिलेनियम, वाकड येथील एक्सक्लुझिव्ह रेवा डायमंड्स शोरूममध्ये अनुभवता येईल तसेच पुण्यातील निवडक पु. ना. गाडगीळ अँड सन्स शोरूम्स सिंहगड रोड, सातारा रोड, कोथरूड, लक्ष्मी रोड आणि विमान नगर येथे देखील ही सवलत मिळणार आहे. ही ऑफर ३१ जानेवारी २०२६ पर्यंत वैध आहे. वा

### उत्तरप्रदेशात ४० गाड्यांची धडक, सात ठार

**लखनौ** : उत्तरप्रदेशमध्ये शनिवारी या हिवाळ्यातील सर्वांत दाट धुके पडले. १५ जिल्ह्यांमध्ये धुक्यामुळे ४० पेक्षा जास्त वाहनांची धडक झाली. या घटनांमध्ये दीड वर्षांच्या मुलीसह सात जणांचा मृत्यू झाला, तर ५० पेक्षा जास्त जखमी झाले. राज्यात १०० पेक्षा जास्त रेल्वे गाड्या उशिराने धावत आहेत. जम्मू-काश्मीरमध्ये ४० दिवसांची कडाक्याची थंडी चिल्लई कलां सुरू आहे. आज त्याचा २८ वा दिवस आहे. काश्मीरमध्ये किमान तापमानात मोठी घट झाली. श्रीनगरमध्ये तापमान उणे ४.० सेल्सिअस होते, शोपियांमध्ये उणे ५.६ सेल्सिअस, पहलगाममध्ये उणे २.६, गुलमर्गमध्ये उणे ४.२, सोनमर्गमध्ये उणे २.९ तापमान नोंदवले गेले.हिमाचलमधील लाहौल स्पिती आणि चंबा येथे बर्फवृष्टी झाली. स्पितीच्या शिंकुला खिंडीत २५ पर्यटक वाहने बर्फवृष्टीत अडकली.

# मुंबईत मराठी मनाचा कौल ठाकरेंनाच

## धारावी ते शिवडीपर्यंत उबाठा-मनसेलाच पाठिंबा

◆ **मुंबई, १७ जानेवारी**

मुंबापुरीतून ठाकरे बंधू संपणार, अशा वल्गना काही राजकीय विश्लेषक आणि काही नेते करीत होते पण, मराठी पट्ट्यात आजही ठाकरे बंधूंचाच जलवा आहे, हे नुकत्याच झालेल्या महानगरपालिका निवडणुकीतून सिद्ध झाले आहे. एकतर्फी समजली जाणारी ही निवडणूक अटीतटीची झाली. महायुतीला काठावर बहुमत मिळाले. गुजराती, मारवाडी आणि उत्तर भारतीयांनी साथ दिली नसती तर महायुतीचे काम कठीण झाले असते.

मुंबईत ८९ जागांसह भाजपा पहिल्या तर ६५ जागा घेऊन उबाठा दुसऱ्या स्थानावर आहे. शिवसेनेला २९ जागा मिळाल्या. भाजपचे जवळपास २५ उमेदवार हे उत्तर भारतीय किंवा गुजराती आहेत. मुंबईत दादर, वरळी,



शिवडी, धारावी, लालबाग, परळ हे भाग मराठीबहुल आहेत. दादर, वरळी आणि शिवडी या भागात २१ जागा आहेत. त्यापैकी १९ जागा ठाकरेंनी जिंकल्या आहेत. एक जागा फक्त १०० मतांनी गमावली. धारावीत सात जागा आहेत.

येथे उबाठाने चार तर काँग्रेसने २ जागा जिंकल्या. वरळी आणि प्रभादेवीत उबाठा-मनसेने सहापैकी पाच जागा पटकावल्या. यावरून मराठी पट्ट्यात भाजपा-शिवसेनेला मतदारांनी नाकारल्याचे स्पष्ट झाले. ◀(वृत्तसंस्था)

**मुंबईत मिळालेली मतांची टक्केवारी**

| | |
|---|---|
| भाजपा- | ४५.३९ |
| उबाठा- | २७.३७ |
| शिवसेना- | १०.२८ |
| काँग्रेस- | ९.४१ |
| मनसे- | २.९१ |

| पक्ष | लढलेल्या जागा | जिंकलेल्या जागा | स्ट्राईक रेट |
|---|---|---|---|
| भाजप | १३५ | ८९ | ६६ |
| उबाठा | १६० | ६५ | ४०.६२ |
| शिवसेना | ९० | २९ | ३२.२२ |
| काँग्रेस | १५१ | २४ | १५.८९ |
| राकाँ(श.प.) | ११ | १ | ०.९० |
| मनसे | ५३ | ६ | ०.८६ |
| राकाँ | ३७ | ३ | ०.८१ |

# ‘आदि शंकराचार्यांमुळे भारताची ओळख’

◆ **गांधीनगर, १७ जानेवारी**



आदि शंकराचार्य यांच्यामुळेच भारताची ओळख निर्माण झाली. त्यांनी मठांची स्थापना करून ज्ञानाची परंपरा जपली आणि लोकांच्या प्रश्नांची तार्किक उत्तरे दिली. सनातन धर्माचा ध्वज सर्व दिशांमध्ये उंच राहील यासाठी त्यांनी केलेले कार्य चंद्र-सूर्य असेपर्यंत लोकांच्या स्मरणात राहील, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले.

८ व्या शतकातील ग्रंथाचे गुजराती भाषेत केलेल्या भाषांतराचे प्रकाशन शाह यांच्या हस्ते पार पडले. यावेळी संबोधित करताना त्यांनी सांगितले की, अद्वैत वेदांच्या १५ खंडांच्या पूर्ण ग्रंथांमुळे गुजरातमधील तरुणांना त्यांना समजून घेण्यास आणि त्यांच्या जीवनावर आणि कार्यावर प्रभाव पाडण्यास मदत होईल. समाजासमोर असलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे या ग्रंथांमध्ये सापडतील. शंकराचार्यांचा उल्लेख करताना ते म्हणाले की, इतक्या कमी आयुष्यात इतके काही साध्य करणे फार कमी लोकांना शक्य होते. शंकराचार्य यांनी देशभर पायी प्रवास केला. कराचार्य यांच्यामुळे भारताची ओळख निर्माण झाली. त्यांनी चारही दिशांना मठ स्थापन केले आणि सनातन धर्माचा ध्वज सर्व दिशांना उंचावला याची खात्री केली. ◀(वृत्तसंस्था)

# महापालिकांमधील पक्षीय बलाबल

### मुंबई

| | |
|---|---|
| भाजपा | ८९ |
| शिवसेना | २९ |
| उबाठा | ६५ |
| मनसे | ०६ |
| काँग्रेस | २४ |
| राकाँ | ०३ |
| राकाँ(श.प.) | ०१ |
| इतर | १० |

### ठाणे

| | |
|---|---|
| भाजपा | २८ |
| शिवसेना | ७५ |
| उबाठा | ०१ |
| मनसे | ०० |
| काँग्रेस | ०० |
| राकाँ | ०९ |
| राकाँ(श.प.) | १२ |
| इतर | ०६ |

### भिवंडी-निजामपूर

| | |
|---|---|
| भाजपा | २२ |
| काँग्रेस | ३० |
| शिवसेना | १२ |
| उबाठा | ०० |
| मनसे | ०० |
| राकाँ | ०० |
| राकाँ(श.प.) | १२ |
| इतर | १४ |

### कल्याण-डोंबिवली

| | |
|---|---|
| भाजपा | ५० |
| काँग्रेस | ०२ |
| शिवसेना | ५३ |
| उबाठा | ११ |
| मनसे | ०५ |
| राकाँ | ०० |
| राकाँ(श.प.) | ०१ |
| इतर | ०० |

### उल्हासनगर

| | |
|---|---|
| भाजपा | ३७ |
| शिवसेना | ३६ |
| काँग्रेस | ०१ |
| उबाठा | ०० |
| मनसे | ०० |
| राकाँ | ०० |
| राकाँ(श.प.) | ०० |
| इतर | ०४ |

### वसई-विरार

| | |
|---|---|
| भाजपा | ४३ |
| शिवसेना | ०१ |
| काँग्रेस | ०१ |
| उबाठा | ०० |
| मनसे | ०० |
| राकाँ | ०० |
| राकाँ(श.प.) | ०० |
| बविमा | ७० |

### पुणे

| | |
|---|---|
| भाजपा | ११९ |
| काँग्रेस | १५ |
| शिवसेना | ०० |
| उबाठा | ०१ |
| मनसे | ०० |
| राकाँ | २७ |
| राकाँ(श.प.) | ०३ |
| इतर | ०० |

### पिंपरी चिंचवड

| | |
|---|---|
| भाजपा | ८४ |
| शिवसेना | ०६ |
| काँग्रेस | ०० |
| उबाठा | ०० |
| मनसे | ०० |
| राकाँ | ३७ |
| राकाँ(श.प.) | ०० |
| इतर | ०१ |

### जळगाव

| | |
|---|---|
| भाजपा | ४६ |
| शिवसेना | २२ |
| उबाठा | ०५ |
| मनसे | ०० |
| काँग्रेस | ०० |
| राकाँ | ०१ |
| राकाँ(श.प.) | ०० |
| इतर | ०१ |

### लातूर

| | |
|---|---|
| भाजपा | २२ |
| शिवसेना | ०० |
| उबाठा | ०० |
| मनसे | ०० |
| काँग्रेस | ४३ |
| राकाँ | ०१ |
| राकाँ(श.प.) | ०० |
| इतर | ०४ |

### पनवेल

| | |
|---|---|
| भाजपा | ५५ |
| काँग्रेस | ०४ |
| शिवसेना | ०२ |
| उबाठा | ०५ |
| मनसे | ०० |
| राकाँ | ०२ |
| राकाँ(श.प.) | ०० |
| इतर | १० |

### सांगली-मिरज

| | |
|---|---|
| भाजपा | ३९ |
| काँग्रेस | १८ |
| शिवसेना | ०२ |
| उबाठा | ०० |
| मनसे | ०० |
| राकाँ | १६ |
| राकाँ(श.प.) | ०३ |
| इतर | ०० |

### इचलकरंजी

| | |
|---|---|
| भाजपा | ४३ |
| काँग्रेस | ०० |
| शिवसेना | ०३ |
| उबाठा | ०१ |
| मनसे | ०० |
| राकाँ | ०१ |
| राकाँ(श.प.) | ०० |
| इतर | १७ |

### जालना

| | |
|---|---|
| भाजपा | ४१ |
| काँग्रेस | ०९ |
| शिवसेना | १२ |
| उबाठा | ०० |
| मनसे | ०० |
| राकाँ | ०० |
| राकाँ(श.प.) | ०० |
| इतर | ०३ |

### नाशिक

| | |
|---|---|
| भाजपा | ७२ |
| काँग्रेस | ०३ |
| शिवसेना | २६ |
| उबाठा | १५ |
| मनसे | ०१ |
| राकाँ | ०४ |
| राकाँ(श.प.) | ०० |
| इतर | ०१ |

### नवी मुंबई

| | |
|---|---|
| भाजपा | ६५ |
| काँग्रेस | ०० |
| शिवसेना | ४२ |
| उबाठा | ०२ |
| मनसे | ०१ |
| राकाँ | ०० |
| राकाँ(श.प.) | ०० |
| इतरा | ०१ |

### मिरा-भायंदर

| | |
|---|---|
| भाजपा | ७८ |
| काँग्रेस | १३ |
| शिवसेना | ०३ |
| उबाठा | ०० |
| मनसे | ०० |
| राकाँ | ०० |
| राकाँ(श.प.) | ०० |
| इतर | ०१ |

### अहिल्यानगर

| | |
|---|---|
| भाजपा | २५ |
| काँग्रेस | ०२ |
| शिवसेना | १० |
| उबाठा | ०१ |
| मनसे | ०० |
| राकाँ | २७ |
| राकाँ(श.प.) | ०० |
| इतर | ०२ |

### छत्रपती संभाजीनगर

| | |
|---|---|
| भाजपा | ५७ |
| काँग्रेस | ०१ |
| शिवसेना | १३ |
| उबाठा | ०६ |
| मनसे | ०० |
| राकाँ | ०० |
| राकाँ(श.प.) | ०१ |
| इतर | ३७ |

### परभणी

| | |
|---|---|
| भाजपा | १२ |
| काँग्रेस | १२ |
| शिवसेना | ०० |
| उबाठा | २५ |
| मनसे | ०० |
| राकाँ | ११ |
| राकाँ(श.प.) | ०० |
| इतर | ०५ |

### धुळे

| | |
|---|---|
| भाजपा | ५० |
| काँग्रेस | ०० |
| शिवसेना | ०५ |
| उबाठा | ०० |
| मनसे | ०० |
| राकाँ | ०८ |
| राकाँ(श.प.) | ०० |
| इतर | ११ |

### नांदेड-वाघाडा

| | |
|---|---|
| भाजपा | ४५ |
| काँग्रेस | १० |
| शिवसेना | ०४ |
| उबाठा | ०० |
| मनसे | ०० |
| राकाँ | ०२ |
| राकाँ(श.प.) | ०० |
| इतर | २० |

### मालेगाव

| | |
|---|---|
| भाजपा | ०२ |
| काँग्रेस | ०३ |
| शिवसेना | १८ |
| उबाठा | ०० |
| मनसे | ०० |
| राकाँ | ०० |
| राकाँ(श.प.) | ०० |
| इतर | ६१ |

### कोल्हापूर

| | |
|---|---|
| भाजपा | २६ |
| काँग्रेस | ३४ |
| शिवसेना | १५ |
| उबाठा | ०१ |
| मनसे | ०० |
| राकाँ | ०४ |
| राकाँ(श.प.) | ०० |
| इतर | ०१ |

### सोलापूर

| | |
|---|---|
| भाजपा | ८७ |
| काँग्रेस | ०२ |
| शिवसेना | ०४ |
| उबाठा | ०० |
| मनसे | ०० |
| राकाँ | ०१ |
| राकाँ(श.प.) | ०० |
| इतर | ०८ |

### अकोला

| | |
|---|---|
| भाजपा | ३८ |
| काँग्रेस | २१ |
| शिवसेना | ०१ |
| उबाठा | ०६ |
| मनसे | ०० |
| राकाँ | ०१ |
| राकाँ(श.प.) | ०३ |
| इतर | १० |

### चंद्रपूर

| | |
|---|---|
| भाजपा | २३ |
| काँग्रेस | २७ |
| शिवसेना | ०१ |
| उबाठा | ०६ |
| मनसे | ०० |
| राकाँ | ०० |
| राकाँ(श.प.) | ०० |
| इतर | ०८ |

### अमरावती

| | |
|---|---|
| भाजपा | २५ |
| काँग्रेस | १५ |
| शिवसेना | ०३ |
| उबाठा | ०२ |
| मनसे | ०० |
| राकाँ | ११ |
| राकाँ(श.प.) | ०० |
| इतर | २८ |

### नागपूर

| | |
|---|---|
| भाजपा | १०२ |
| काँग्रेस | ३४ |
| शिवसेना | ०१ |
| उबाठा | ०२ |
| मनसे | ०० |
| राकाँ | ०१ |
| राकाँ(श.प.) | ०० |
| इतर | ११ |

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | रविवार, १८ जानेवारी २०२६
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



कार्यासाठी काय उपयोगाचे ठरेल ते करताना हळूहळू केवळ व्यक्तिगत जीवनाची आपली आसक्ती कमी होऊन, आपल्या जीवनाचा स्तर उंचावतो. संघाच्या हिताचाच विचार आपल्या सर्व सहकाऱ्यांसह करताना, कार्यकर्त्यांसह बैठकीत सामूहिक चिंतन करताना निरपेक्ष कार्य करणारा उत्तम संच तयार होतो.

**एकनाथ रानडे**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

# विदेशात जाऊन ज्ञान घ्या; पण ते देशासाठी वापरा

## सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन

◆ **छ. संभाजीनगर, १७ जानेवारी**

भारताच्या विकासात तरुणांचे योगदान महत्त्वाचे आहे. ज्ञान मिळवण्यासाठी विदेशात जाणे चुकीचे नाही. परंतु, ते ज्ञान भारताच्या फायद्यासाठी वापरले पाहिजे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी शनिवारी केले. ते छ. संभाजीनगरच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित युवा परिषदेत



त्यांनी तरुणांशी संवाद साधला.

आपल्या देशाचे भविष्य घडवण्याची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी युवकांवर आहे. आजचे युवक देशभक्त आहेत. युवक जितके देशभक्त असतील, तितकेच ते देशासाठी काम करतील. अनेकांनी संघासोबत काम करून देशाच्या हितासाठी आपले ज्ञान आणि कौशल्ये वापरली आहेत. संघ कुणाशीही स्पर्धा करीत नाही किंवा कुणाचा विरोध करीत नाही. संघाला एक मजबूत समाज निर्माण करायचा आहे, असे डॉ. मोहनजी भागवत यांनी सांगितले आणि या कार्यात योगदान द्यावे, असे आवाहन युवकांना केले.

संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त डॉ. मोहनजी भागवत यांच्या उपस्थितीत एमआयटी कॉलेजच्या मंथन हॉलमध्ये युवा परिषद आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमात उपस्थित तरुणांनी उत्सुकतेने अनेक प्रश्न विचारले. डॉ. मोहनजी भागवत यांनी त्यांना सविस्तरपणे उत्तरे दिली. यावेळी व्यासपीठावर देवगिरी प्रांत संघचालक अनिल भालेराव आणि विभाग संघचालक मुंजाजी झगडे उपस्थित होते. ◂(वृत्तसंस्था)

# ‘हॉटेल पॉलिटिक्स’

## शिंदेनी नगरसेवकांना ‘ताज लॅण्ड्स एंड’मध्ये हलविले

◆ **मुंबई, १७ जानेवारी**

मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीचे निकाल जाहीर होताच सत्तास्थापनेसाठी राजकीय हालचालींना वेग आला आहे. महापौरपदावर कोणाची वर्णी लागणार, यावरून सध्या जोरदार रस्सीखेच सुरू असून, या पृष्ठभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने ‘हॉटेल पॉलिटिक्स’चा मार्ग स्वीकारल्याचे दिसत आहे.



महापौर निवड होईपर्यंत शिवसेनेचे सर्व निवडून आलेले नगरसेवक पुढील तीन दिवस वांद्र्याच्या ताज लॅण्ड्स एंड हॉटेलमध्ये मुक्कामी असणार आहेत. यासंदर्भात शिवसेनेच्या सर्व नगरसेवकांना शनिवारी दुपारी तीन वाजता ताज लॅण्ड्स एंड हॉटेलमध्ये हजर राहण्याचे आदेश देण्यात आले होते.

भाजपला-सेना-रिपाइं महायुतीला मुंबई महापालिकेत मुंबईकरांनी जनादेश दिला आहे. मात्र, या महापौर निवडणुकीत शिवसेनेचा पाठिंबा निर्णायक ठरणार आहे. याच पृष्ठभूमीवर शिवसेनेने नगरसेवकांना एकत्र ठेवण्याची रणनीती आखल्याचे मानले जात आहे. सत्तास्थापनेदरम्यान पक्षातील कोणताही नगरसेवक फुटू नये, तसेच सर्व नगरसेवक एकसंध राहावेत, या उद्देशानेच हा निर्णय घेतल्याचे कळते. मुंबई महापालिकेतील सत्तासमीकरणे अत्यंत नाजूक बनली असून, प्रत्येक नगरसेवक महत्त्वाचा ठरणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

# मुंबईचा महापौर महायुतीचाच

## कारभार चांगल्या पद्धतीने चालवू : मुख्यमंत्री

◆ **मुंबई, १७ जानेवारी**

कुणी काहीही म्हणत असले तरी मुंबईचा महापौर महायुतीचाच होईल. भारतीय जनता पार्टी आणि शिवसेना मुंबईचा कारभार चांगल्या पद्धतीने चालवतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.



देवाच्या मनात असेल तर आपला महापौर होईल, असे विधान उद्धव ठाकरेंनी केले. विधानावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई येथे बोलताना प्रत्युत्तर दिले असून वरच्या देवाने महायुतीचा महापौर करण्याचे ठरविले, असा टोला लगावला. महापौर कुणाला करायचे, किती वर्षे वाटून घ्यायचे, हे सर्व शिंदे आणि आम्ही मिळून ठरवू, असे ते म्हणाले.

### ‘गिरे तो भी टांग उपर’

मुंबईत आमचा आकडा ११९ च्या पुढे गेला असून आम्ही बहुमताच्या पार गेलो आहोत. आमच्या १४ जागा अतिशय कमी मतांनी गेल्या. एवढ्या जागा एकत्रित शिवसेनेलाही कधी मिळाल्या नव्हत्या. त्यामुळे कोण काय म्हणतो, याला अर्थ नाही. पण ,‘काहींचे गिरे तो भी टांग उपर’ असे असते, असा टोला मुख्यमंत्र्यांनी संजय राऊत यांच्या विधानावर लगावला

### पराभवाने खचायचे नाहीः अजित पवार

महानगरपालिका निवडणुकीत आमचा अंदाज चुकला आहे. लोकशाहीत मतदार राजा हा सर्वोच्च असतो. प्रयत्न करणे प्रत्येक राजकीय पक्षाचे काम असते.



आम्हाला चांगले यश मिळेल, असा सर्वांचा अंदाज होता. प्रसारमाध्यमांचा सुद्धा. पण, आम्हाला मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. पराभवामुळे खचून जायचे नसते तर जोमाने प्रयत्न करायचे असतात, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केली. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात भाजपाने चांगली निवडणूक लढविली आणि जिंकली. ते अभिनंदनास पात्र, असल्याचेही पवार म्हणाले.

### मनसेला सर्वात मोठा फटका

मुंबईत मनसेला सर्वात जास्त फटका बसेल, असे भाकीत मी व्यक्त केले होते. निकालानंतर हे भाकीत खरे ठरले. राज ठाकरे किंवा मनसेला या युतीचा काहीच फायदा झालेला नाही. उद्धवजींना मात्र, झालेला दिसतो, असे फडणवीस म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)

### देवाच्या मनात असेल तर आमचा महापौर : उद्धव ठाकरे

भारतीय जनता पक्ष हा कागदावर राहिलेला पक्ष आहे. शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) संपविण्याचे त्यांचे प्रयत्न होते पण त्यात ते यशस्वी झाले नाहीत. आता आपली जबाबदारी आणखी वाढली आहे. आपला महापौर व्हायला पाहिजे हे आपले स्वप्न आहे. बघू, देवाच्या मनात असेल तर तेही होईल, असे सूचक विधान उद्धव ठाकरे यांनी केले आहे. ■

## आता महापौरपदासाठीच्या आरक्षण सोडतीकडे लक्ष!

मुंबई : राज्यातील २९ महापालिकाच्या निवडणुकांतून निवडून आलेल्या तब्बल २८६९ नगरसेवकांच्या नजरा आता आपआपल्या महापालिकेतील महापौर पदाच्या आरक्षणाच्या सोडतीकडे लक्ष लागले आहे. नगरविकास विभागाकडून येत्या आठवड्याभरात त्याची निश्चिती केली जाणार असून महिन्याअखेरीस निवडी केल्या जातील, असे सूत्रांकडून सांगण्यात आले. राज्यातील शुक्रवारी जाहीर झालेल्या निवडणुक निकालमध्ये भाजपाने मोठी बाजू मारली. आशिया खंडातील सर्वात मोठी महापालिका असलेल्या बृहन्मुंबईसह २९ पैकी १६ ठिकाणी एकहाती तर महायुतीतील घटक पक्षासह२३ ठिकाणी बहुमत मिळविले आहे. त्यामुळे या ठिकाणी त्याचाच महापौर होणार हे निश्चित आहे. तर उर्वरित महापालिकेत काँग्रेस व अन्य विरोधी पक्षाचे महापौर बनण्याची शक्यता आहे.

# घुसखोरांमुळे दंगलींना खतपाणी

## पंतप्रधान मोदी यांचा तृणमूलवर घणाघात

◆ **मालदा, १७ जानेवारी**

मोठ्या प्रमाणातीत घुसखोरीमुळे दंगलींना खतपाणी मिळाले आहे, असा घणाघात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी केला. तृणमूल काँग्रेसवर हल्ला करण्यासाठी त्यांनी घुसखोरी केंद्रस्थानी ठेवली आहे. मात्र, मतुआंसारख्या निर्वासित समुदायांना घाबरण्यासारखे कोणतेही कारण नाही, असे आश्वासन त्यांनी दिले.

घुसखोरी हे राज्यासमोर एक अतिशय मोठे आव्हान आहे. तृणमूल काँग्रेसच्या आश्रय आणि सिंडिकेट राजवटीमुळे तसेच घुसखोरांसोबत केलेल्या युतीमुळे अवैध स्थलांतराला प्रोत्साहन मिळाले आहे, असे उत्तर



बंगालमधील मालदा या मुस्लिमबहूल जिल्ह्यातील एका भव्य सभेला संबोधित करताना मोदी म्हणाले.


जगात असे अनेक विकसित आणि समृद्ध देश आहेत, जिथे पैशांची कोणतीही कमतरता नाही, तरीही ते घुसखोरांना बाहेर काढत आहेत. बंगालमधून घुसखोरांना बाहेर काढणे हे तितकेच आवश्यक आहे. सत्तेत आल्यानंतर भाजपा सरकार अवैध स्थलांतर रोखण्यासाठी आणि घुसखोरांना बाहेर काढण्यासठी मोठी कारवाई करेल, असे आश्वासन नरेंद्र मोदी यांनी दिले.

तृणमूल काँग्रेसची सिंडिकेट प्रणाली घुसखोरांना राज्यात स्थायिक करण्यासाठी काम करीत आहे आणि घुसखोर व सत्ताधारी पक्षात युती असल्याचा आरोप मोदी यांनी केला. ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वातील सरकारविरोधात भाजपा आपला प्रचार तीव्र करीत असताना मोदी यांनी हा आरोप अधिक ठळकपणे मांडला.

घुसखोरांसोबतचे संबंध तृणमूल सरकारला तोडावेच लागतील. भाजपाचे सरकार स्थापन होताच, घुसखोरी आणि घुसखोरांविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल. नरेंद्र मोदी यांनी निर्वासित समुदायांना विशेषतः मतुआ समुदायाला आपल्या बाजूने वळवण्याचा प्रयत्न केला. ◂(वृत्तसंस्था)

### घुसखोरीमुळे बदलली भाषा

घुसखोरीचा परिणाम स्पष्टपणे दिसत आहे. राज्याच्या अनेक भागांमध्ये लोकसंख्याशास्त्रीय संतुलन बदलले आहे. अनेक ठिकाणी बोलली जाणारी भाषासुद्धा बदलायला लागली आहे, असे लोक मला सांगतात. भाषा आणि बोलीभाषेत फरक दिसून येत आहेत. घुसखोरांची लोकसंख्या वाढत असल्यामुळे मालदा आणि मुर्शिदाबादसह पश्चिम बंगालच्या अनेक भागांमध्ये दंगली सुरू झाल्या आहेत, असे मोदी म्हणाले. ■






सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## रोखठोक

# तेजस्वी इतिहासाचे अस्वस्थ वर्तमान

**दिनेश गुणे**

कोणत्याही राजकीय पक्षाच्या सत्ताकारणातील वाटचालीचा धांडोळा घेताना, त्याच्या इतिहासाची उजळणी अपरिहार्य असते. इतिहासातून त्या पक्षाने कोणता धडा घेतला, वर्तमानकाळापर्यंतच्या वाटचालीत त्यामधून कोणता शहाणपणा प्राप्त केला आणि वर्तमानाच्या स्थितीचा आढावा घेत भविष्याची कोणती नीती निश्चित केली, यावर त्या राजकीय पक्षाच्या अस्तित्वापासून भविष्यापर्यंतची स्थिती ठरविली जाते. या परिणामांचे मोजमाप करून ढोबळ मानाने काही प्रमुख राजकीय पक्षांच्या वाटचालीकडे पाहिल्यास, इतिहास आणि वर्तमानाच्या स्थितीमध्येच मोठी विसंगती दिसू लागते. ज्या पक्षांचा इतिहास उजळलेला दिसतो, त्यांच्या वर्तमानावरच अस्वस्थतेची, अस्थिरतेची काजळी दिसू लागते आणि भविष्याच्या अनिश्चिततेचे सावटदेखील दिसू लागते. याउलट, ज्या पक्षांच्या इतिहासावर अनिश्चिततेचे, पराजयाचे सावट होते, त्यांनी वर्तमानाच्या वाटचालीची नियोजनबद्ध आखणी केली, ध्येय निश्चित केले, त्यानुसार रचना आणि रणनीती बदलत नव्या बदलांचा स्वीकार करणाऱ्या ध्येयनिष्ठ मनांची योग्य मशागतही केली आणि भविष्याच्या वाटचालीस नव्या दमाने सुरुवात करून वर्तमानातील यशाचा टप्पा पार केला असेही दिसते. त्यामुळे अशा पक्षांचे भविष्यही उजळलेले राहणार, याविषयी सध्या तरी कोणालाच कोणतीही शंका राहिलेली नाही.

महाराष्ट्रातील राजकारण आणि सत्ताकारणाच्या वर्तमानाकडे पाहताना, येथील राजकारणावर प्रभाव टाकणाऱ्या काही पक्षांच्या इतिहासाचे बोट धरून वर्तमानाच्या वाटचालीचा मागोवा घ्यावा लागेल. ज्या पक्षांनी इतिहासात यशाचे झेंडे रोवले, जनाधाराची आणि जनतेच्या विश्वासाची मोठी पुंजी गाठीशी बांधली आणि त्याच्या जोरावर वर्तमानात वाटचाल करतानाही काही नीती बदलल्यामुळे बदललेल्या स्थितीशी संघर्ष करण्याची वेळ ओढवली, त्यात बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेल्या शिवसेनेचा आणि शतकाहूनही अधिक काळाची लोकमान्यतेची परंपरा लाभलेल्या काँग्रेसचा समावेश करावा लागतो.

रविवार, १९ जून १९६६. हा दिवस महाराष्ट्राच्या राजकारणाला नवी दिशा देणारा ठरला. म्हणजे, त्या दिवशी एका इतिहासाची भविष्याच्या दिशेने दमदार वाटचाल सुरू झाली. मराठी माणसाच्या न्याय्य हक्कासाठी लढणारी संघटना म्हणून शिवसेनेची स्थापना झाली. त्या दिवशी सकाळी सव्वानऊ वाजता शिवछत्रपतींच्या जयजयकारात शिवसेनेची सदस्य नोंदणी सुरू झाली. सहदेव नाईक नावाचा बाळासाहेबांचा निष्ठावंत पाईक पुढे आला, त्याने स्थापनेच्या मुहूर्ताचा नारळ फोडला आणि प्रबोधनकार ठाकरे यांच्या हस्ते शिवसेनेच्या सदस्य नोंदणीचे फॉर्म वाटप सुरू झाले. दोन दिवसांत सोमवारी संध्याकाळपर्यंत १० हजार मराठी माणसांनी शिवसेनेचे सदस्यत्व घेतले. सदस्य नोंदणीच्या त्याच तक्त्यावर, डरकाळ्या फोडणाऱ्या ढाण्या वाघाचे चित्र, शिवसेनेचे बोधचिन्ह आणि छत्रपती शिवरायांचे चित्र होते. 'मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा' हे वचन त्यावर लिहिले होते. शिवसेनेच्या स्थापना दिवसाचा हा इतिहास अजूनही काही बुजुर्ग शिवसैनिकांच्या नजरेसमोर जसाच्या तसा तरळताना दिसतो. त्याच दिवशी संघटनेचे नावही निश्चित झाले आणि मुंबईतील मरोळ येथील 'बोरोसिल ग्लास वर्क्स' नावाच्या कंपनीत 'मराठी माणसाचा खिमा' या मथळ्याखाली मराठी माणसावरील अन्यायास वाचा फोडणारे वृत्त 'मार्मिक'मध्ये प्रसिद्ध झाले. मराठी माणसाच्या हक्कासाठी लढणाऱ्या या संघटनेत सामील होणाऱ्या मराठी माणसास आपल्या कर्तव्याची दिशा स्पष्ट असावी, या हेतूने बाळासाहेब ठाकरे यांनी सदस्यांकडून प्रतिज्ञापत्रे भरून घेण्याचे ठरविले. त्यासाठी संघटनेचे १२ कलमी धोरणपत्रही निश्चित झाले. शिवसेनेच्या स्थापनेपासून सुरू झालेला हा इतिहास पुढची अनेक दशके आक्रमकतेचा, न्यायाच्या संघर्षाचा ठरल्याने मराठी माणसाच्या मनामनाचा या संघटनेने ठाव घेतला होता. १९६८ मध्ये मुंबई महापालिकेत प्रवेश आणि १९७० मध्ये थेट विधानसभेत दाखल झालेल्या शिवसेनेने महाराष्ट्र काबीज करणारा झंझावात बाळासाहेबांच्या नेतृत्वात सुरू केला आणि २००२ पर्यंत बाळासाहेब ठाकरे यांच्या पंच्याहत्तरीपर्यंत या तेजस्वी इतिहासाची नवनवी पाने तयार होत राहिली. १९९५ ते १९९९ हा काळ शिवसेनेच्या इतिहासातील सुवर्णकाळ ठरला.

(या काळाचा उल्लेख शिवसेनेच्या इतिहासात 'शिवशाही' असा केला जातो.) १९९५ च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेना-भाजपा युतीला राज्यातील २८८ जागांपैकी १३४ जागांवर विजय मिळाला आणि मंत्रालयावर भगवा फडकावण्याचे आपले स्वप्न साकार झाले, अशा शब्दांत बाळासाहेबांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. १४ मार्च १९९५ या दिवशी शिवाजी पार्क मैदानावरील शाही सोहळ्यात शिवशाहीचे मुख्यमंत्री म्हणून मनोहर जोशी आणि उपमुख्यमंत्री म्हणून भाजपाचे गोपीनाथ मुंडे यांना तत्कालीन राज्यपाल पी. सी. अलेक्झांडर यांनी शपथ दिली. २००३ मध्ये शिवसेनेचे कार्यकारी प्रमुख म्हणून उद्धव ठाकरे यांची निवड झाली आणि शिवसेनेच्या संघटनात्मक रचनेत पहिला बदल करण्यात आला. राज ठाकरे यांनीच महाबळेश्वर येथील शिबिरात उद्धव ठाकरे यांचे नाव शिवसेनेच्या कार्यकारी प्रमुखपदासाठी सुचविणारा प्रस्ताव मांडला होता. आता हिंदुत्व हेच शिवसेनेचे एकमेव धोरण राहील, अशी घोषणा त्याच शिबिरात बाळासाहेब ठाकरे यांनी केली होती. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे या शिवसेनेच्या दोन फांद्या आहेत, त्या छाटण्याचा प्रयत्न आजूबाजूच्या माणसांकडूनच होत असला, तरी राज-उद्धव यांच्यात कधीच कोणताही वाद नव्हता, अशी ग्वाही त्यांनी याच शिबिरात दिली होती. पुढे दोनच वर्षांत, २००६ मध्ये शिवसेनेला फुटीचे आणखी दोन नवे धक्के बसले. शिवसेनेत पैसे घेऊन पदे विकली जातात; या पक्षात पदांचा बाजार भरला आहे, असा गंभीर आरोप करीत नारायण राणे यांनी पुकारलेले थेट बंड आणि त्यांची हकालपट्टी हे शिवसेनेच्या भविष्याचे




संकेत देणारी नांदी ठरू पाहात होती. शिवसेना ही धावती गाडी आहे. आतापर्यंत अनेक जण या धावत्या गाडीतून उतरून गेले, पण गाडी वेगाने चालतच राहिली. नारायण राणे शिवसेनेतून गेल्याने त्याचा काडीमात्र परिणाम होणार नाही, अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी या फुटीवर भाष्य केले, पण भविष्य काही वेगळेच दिसू लागले होते. २००६ मध्ये जुलैच्या सुमारास नारायण राणे यांची पक्षातून हकालपट्टी झाली आणि काही महिन्यांतच राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर टीकेची झोड उठवत शिवसेना सोडण्याचा निर्णय जाहीर केला. राज ठाकरे यांच्या नाराजीची धग शिवसेनेत त्याआधीच जाणवू लागली होती. म्हणूनच १ ऑगस्ट २००५ या दिवशी खुद्द बाळासाहेबांनीच राज व उद्धव यांच्यासमवेत बैठक घेतली. संघटनेच्या हिताचे सर्व निर्णय उद्धव आणि राज एकत्र बसून घेतील, असे जाहीर करून मतभेद मिटल्याची ग्वाही त्या दिवशी बाळासाहेबांनी दिली होती. आज शिवसेना व महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांची युती झाल्यानंतर, महापालिका निवडणुकांसाठी जारी करण्यात आलेल्या संयुक्त वचननाम्याच्या मुखपृष्ठावर उद्धव ठाकरे, बाळासाहेब आणि राज ठाकरे यांचे छायाचित्र दिसते. त्या बैठकीनंतर दुसऱ्याच दिवशी 'हम साथ साथ है' अशा मथळ्याखाली वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाले, ते हेच छायाचित्र होते.

राज ठाकरे यांचा पक्षत्याग, उद्धव ठाकरे यांचे मुख्यमंत्रिपद, एकनाथ शिंदे यांच्या फुटीनंतर पक्षात सुरू झालेली गळती आणि महापालिका निवडणुकीत राज्यभर झालेली उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली पडझड ही ठाकरे यांच्या शिवसेनेच्या वर्तमानाची स्थिती आहे. वैभवी इतिहास असलेल्या या पक्षाचे वर्तमान आज दोलायमान झाले असल्याने भविष्यदेखील निश्चितच झाल्याचा स्पष्ट संदेश अलिकडेच झालेल्या विधानसभा, स्थानिक स्वराज्य संस्था आणि महापालिका निवडणुकांनी ठाकरे यांच्या शिवसेनेस दिला आहे. शिवसेनेच्या इतिहासाचे हे वर्तमान आहे. नेतृत्व सिद्ध करण्याच्या कसोटीच्या क्षणी बसणाऱ्या फटक्यांचा इतिहासावरही परिणाम होतो, वर्तमानही अस्वस्थ होते आणि भविष्यदेखील अनिश्चित होते, हा राजकारणातील नियम आहे. काँग्रेसची स्थिती अशाच अवस्थेतून वाट काढत आहे. या पक्षाचा देशाच्या राजकीय इतिहासावरील प्रभाव, इतिहासाच्या शतकोत्तर वाटचालीत या पक्षाने जनमानसाची घेतलेली अभेद्य पकड आणि दीर्घकाळ एकहाती सत्तेच्या माध्यमातून सत्ताकेंद्रावर प्रस्थापित केलेला हक्क हा या पक्षाचा इतिहास आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच्या चळवळी, आंदोलने आणि संघर्षांच्या नेतृत्वाचा झेंडा खांद्यावर घेऊन ब्रिटिश सत्तेविरुद्ध संघर्ष करणाऱ्या फळीचे नेतृत्वच या पक्षाने केले असल्याने, स्वातंत्र्यानंतर स्थापन होणाऱ्या सरकारची धुरा या पक्षाच्या खांद्यावर साहजिकपणे सोपविली गेली आणि सत्ता म्हणजे काँग्रेस हे समीकरण ठरून गेले. पुढे जवळपास तीन दशके या समीकरणात कोणताही धक्का लावण्याची कोणाचीच हिंमतही होत नव्हती, एवढी शक्ती या पक्षाने प्रस्थापित केली होती. नेतृत्वाच्या वादावरून पक्षांतर्गत कुरबुरी होऊनही, उघड संघर्ष टाळण्याचा मुत्सद्दीपणा दाखवत सबुरीचे धोरण स्वीकारणाऱ्या नाराजांची संख्या या पक्षात कमी नव्हती. शिवसेनप्रमाणेच नेतृत्वाच्या संघर्षातूनच या पक्षातील फूट पडली आणि स्वातंत्र्यापूर्वीच्या काँग्रेसच्या परंपरेचा झेंडा खांद्यावर घेण्याचा पहिला हक्क मात्र भारतीय राष्ट्रीय काँग्रेस नावाच्या पक्षाला मिळाला.

तेव्हापासूनच्या इतिहासाचा धांडोळा घेत काँग्रेसच्या वर्तमानापर्यंतची वाटचाल पाहिली, तर नेतृत्वाच्या कसोटीच्या क्षणी बसलेल्या असंख्य फटक्यांमुळे हा पक्ष असाच जर्जर होत गेल्याचे दिसते. १९६४ मध्ये पंडित नेहरूंच्या निधनानंतर काँग्रेसमध्ये सत्ताकेंद्र रिक्त झाले होते. १९६६ मध्ये लालबहादूर शास्त्रींच्या आकस्मिक निधनानंतर कामराज, निजलिंगप्पा, मोरारजी देसाई, स. का. पाटील, अतुल्य घोष आदींनी सिंडिकेट काँग्रेस असे म्हटले जाणारा अदृश्य पण प्रभावी असा सत्तागट निर्माण केला. इंदिरा गांधी तरुण, अननुभवी आहेत, त्यांना रबर स्टॅम्प पंतप्रधान बनवू आणि सत्तेच्या नाड्या आपल्या हाती ठेवू, अशी त्यांची समजूत होती. पण, १९६९ मध्ये राष्ट्रपती निवडणुकीत इंदिरा गांधी यांनी धूर्त खेळीतून ही समजूत धुळीस मिळविली. सिंडिकेट काँग्रेसचा उमेदवार पराभूत झाला आणि काँग्रेसमध्ये स्पष्ट फूट पडली. इंदिरा गांधींकडे पक्ष संघटना नव्हती, बहुसंख्य खासदारही नव्हते आणि पक्षातील जुने नेते दुरावले होते. त्यामुळे अशा स्थितीचा सामना करण्याचा सर्वांत प्रभावी मार्ग, म्हणजे जनतेचा भक्कम पाठिंबा मिळविण्याचा निर्धार करून त्या थेट जनतेमध्ये गेल्या, जनतेची संवाद साधला. गरिबी हटाव सारखी जनतेच्या भावना सुखावणारी घोषणा दिली आणि राजकारणाचा बाज बदलून टाकला. १४ बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा निर्णय घेऊन सिंडिकेट काँग्रेसच्या आर्थिक सत्तेची रसद संपुष्टात आणली आणि गरिबांची नेता अशी प्रतिमा निर्माण करणाऱ्या इंदिरा गांधी पुन्हा प्रभावशाली ठरल्या. १९७१ च्या निवडणुकीत ३५२ जागांवर विजय मिळवून इंदिरा गांधींनी जनतेचा कौल आपल्या बाजूला असल्याचे सिद्ध केले. बंडखोरांचा गट राजकीयदृष्ट्या संपला आणि काँग्रेस पक्ष इंदिराकेंद्रित झाला. सरकारवर आणि पक्षसंघटनेवरही नेतृत्वाची छाया राहिली. निर्णायक नेतृत्व, स्पष्ट वैचारिक संघर्ष, धाडसी धोरणे आणि जनतेशी थेट नाते या चतु:सूत्रीमुळे इंदिरा गांधींचे नेतृत्व यशस्वी ठरले.

हा काँग्रेसच्या तेजस्वी काळाचा इतिहास होता. शिवसेना आणि काँग्रेसच्या आजच्या वाटचालीकडे पाहता, या इतिहासापासून दोन्ही पक्षांनी फारकत घेतली असावी, असेच चित्र दिसते. इंदिरा गांधींनी जनतेत जाऊन पक्षांतर्गत बंड मोडले. आजच्या काँग्रेसकडे अंतर्गत बंडास निर्णायक उत्तर नाही. स्पष्ट वैचारिक धोरणाचा अभाव आणि कोणाशी लढायचे, याचा संभ्रम या तिहेरी संभ्रमात काँग्रेसचा वर्तमानकाळ गुरफटला आहे.

गेल्या १०-१५ वर्षांत राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने अनेक निवडणुका लढविल्या. काही ठिकाणी आशा निर्माण झाली, पण अनेक ठिकाणी काँग्रेसच्या पदरात निराशाच पडली. राहुल गांधी यांच्या नेतृत्वाविषयी पक्षातील अपेक्षाभंगाच्या व्यथा आता व्यक्त होऊ लागल्या आहेत. भारताच्या राजकारणात राहुल गांधी हे नाव उपहासापुरते राहिले आहे, हे वर्तमान आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीनंतर मात्र भविष्याचे चित्र अधिक आशादायक दिसेल, असे संकेत काँग्रेसला मिळू लागले आहेत. याचे श्रेय राहुल गांधींना द्यावे किंवा नाही, याबाबत पक्षात मतभेद निश्चितच आहेत. कारण २०१४ आणि २०१९ या दोन लोकसभा निवडणुकांतील पराभवाने काँग्रेस अक्षरशः खिळखिळी झाली. भारताच्या राजकारणात प्रभावीपणे सुरू झालेल्या मोदीयुगाच्या झंझावातामुळे काँग्रेस केवळ सत्तेबाहेर ढकलली गेली, एवढेच नाही, तर काँग्रेसचा राजकीय आत्मविश्वासही डळमळीत झाला. राहुल गांधी यांच्याकडे पक्षाचे अध्यक्षपद आले, पण संघटन, नेतृत्व, कार्यकर्त्यांची जडणघडण, निवडणूक रणनीती यात काँग्रेस पिछाडीवरच राहिली. २०१९ मधील राहुल गांधींचा अमेठीतील पराभव हा केवळ काँग्रेसला सोसावा लागलेला एका मतदारसंघातील पराभव नव्हता, तर काँग्रेसच्या पारंपरिक गडाला पडलेले खिंडार होते. राहुल गांधींच्या नेतृत्वशैलीवर तेव्हापासूनच प्रश्नचिन्हे उमटण्यास सुरुवात झाली होती. २०२४ च्या निवडणुकीत पक्षाला बऱ्यापैकी यश मिळाले; राज्यांच्या निवडणुकांत पक्ष मात्र मतदारांच्या दृष्टीने उपेक्षितच राहिला. पक्षाकडे स्वतःचा चेहरा नाही, ठोस संघटन नाही, स्थानिक नेतृत्वाचा अभाव, अशा अनेक कमतरतांचा सामना काँग्रेसला करावा लागत आहे. राजकारणात केवळ नैतिक बळ पुरेसे नसते. निवडणुका जिंकणारा, संघटना बांधणारा आणि सर्वांना सोबत घेऊन चालणारा नेता असावा लागतो. सध्या राहुल गांधींची काँग्रेस आणि ठाकरे यांच्या शिवसेनेत त्याचाच अभाव दिसतो. म्हणूनच इतिहासातील साम्यस्थळे आणि वर्तमानातील अस्वस्थता याबाबत दोन्ही पक्ष एकाच वाटेवर चालताना दिसत आहेत.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### 'तरुण भारत'चे पुण्यात स्वागत

दैनिक 'तरुण भारत' नागपूर आता पुणे येथून प्रकाशित होणार ही आनंदाची बातमी आहे. तरुण भारत हे केवळ वृत्तपत्र नाही तर विचार आहे. माझे बालपण, शिक्षण, प्रारंभीची नोकरी अमरावतीत झाल्याने तरुण भारतसोबत एक भावनिक नाते आहे. वृत्तपत्र म्हणजे तरुण भारत असे समीकरण आहे. ग. त्र्यं. माडखोलकर, मा. गो. वैद्य, दि. भा. घुमरे, ल. त्र्यं. जोशी यासारख्या संपादकांनी तरुण भारतातील नीतिमत्ता कधीही ढळू दिली नाही आणि एक उच्च परंपरा स्थापित केली. ''चांगले राज्य चांगल्यांचे राज्य'' यासारखे लेख अजूनही स्मरणात आहेत.

मला आठवतो तो १९७१ दरम्यानचा १६ पैसे मूल्य असलेला तरुण भारत! युद्ध कर व (बांगला देशातील) शरणार्थी कर यामुळे ४ पैशांनी किंमत वाढली होती. १९७१च्या युद्धसमयी माझा शालनायक असलेला मोठा भाऊ विजय कद्रे शाळेतील प्रार्थनेपूर्वी तरुण भारतमधील युद्धविषयक बातम्या वाचून दाखवीत असे. त्यावेळी विद्यार्थ्यांनी दिलेली 'भारत माता की जय' ही घोषणा गगनभेदी असायची. आणिबाणी कालावधीत तरुण भारत बंद पडावा यासाठी अनेक प्रयत्न झालेत. सरकारी जाहिराती बंद केल्या, व्यावसायिकांनी जाहिराती देऊ नये असे पत्र पाठविले गेले, सरकारी कार्यालयांनी तरुण भारत विकत घेऊ नये असा दबाव आणला गेला. तरीही बावनकशी सोने उजळून निघावे तसे वाचकांच्या पाठिंब्यावर दैनिक तरुण भारत या अग्निदिव्यातून बाहेर आले. संयमी संपादकीय व विचारप्रवर्तक लेख हे तरुण भारतचे वैशिष्ट्य सांगता येईल.

राष्ट्रीय महामार्गाच्या एका प्रकल्पावर पुणे इथे अभियंता म्हणून २०११ मध्ये रुजू झालो आणि 'विदर्भवासी पुणे निवासी' झालो. पुणे महानगरात तरुण भारत नाही याची तीव्र जाणीव २०१४ मध्ये झाली. पुणे इथून तरुण भारत प्रकाशित व्हावा यासाठी अनेकांना विनंती करणारे पत्र पाठविले. विलंबाने का होईना तरुण भारत येथून सुरू होत आहे याचे स्वागत आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात शिरकाव करणे, स्थिर होणे आव्हानात्मक असले तरी तरुण भारतचे वाचक भरभरून प्रतिसाद देतील याची खात्री आहे.

**हेमंत पुरुषोत्तम कद्रे**/९४२२२१५३४३

### तिलोत्सव

तिळाच्या विषयी काही उपयोगिता सांगताना मला माझ्या लहानपणात हिंडून आल्याचा अनुभव येणार आहे. तुम्हालाही नक्कीच तसे वाटणार! सर्वसामान्यांना सहज उपलब्ध होणारे तिळ हे पीक दिवाळीच्या दरम्यान शेतकऱ्यांच्या हाती आणि नंतर बाजारात येते. आरोग्यासाठी किती उपयोग होतो याचा सूक्ष्म अभ्यास आपल्या पूर्वजांनी, ऋषिमुनींनी केला. शरीराचे आरोग्य, मानसशास्त्र, सामाजिक सलोखा यांचे एकत्रीकरण म्हणजे आपले अनेक सण, उत्सव परंपरा. आपली आजी, नानी, मोठी काकू, सगळे जण या सर्व चालीरीती पाळत असत. संपूर्ण गाव सणवार, समारंभ अतिशय उत्साहात साजरे करीत असत. स्वतःचा, कुटुंबाचा विचार करताना समाजाशी जुळलं पाहिजे हा कटाक्ष होता. मनुष्य एकटा राहू शकत नाही. जसजसा काळ लोटला तसतसं सणवार म्हणजे बुरसटलेल्या पद्धती हा विचार रुजू लागला. जुन्या परंपरा न पाळणे म्हणजे आम्ही मॉडर्न असे पसरू लागले. लहान असताना घरातील वयोवृद्धांना हे का? असंच का अशी विचारण्याची पद्धत नव्हती आणि हिंमतही नव्हती. आरोग्याचा बटवा होता या आज्यांजवळ सणावारांसहित! अगदी कडक नियमांनुसार! तिळाचा लाडू रोज एकच मिळायचा.

तिळाचा उत्सव सुरू होतो तो दिवाळीपासून. तिळाच्या तेलाने मालिश करून अभ्यंग स्नानाने सुरुवात होते. रात्रभर भिजलेल्या तिळाला सकाळी वरवंटा पाट्यावर वाटून त्याच्या उटण्याने अंघोळ करणे. साल स्क्रबचे काम करते आणि पाण्यात मुरलेलं तेल त्वचेला स्निग्धता देते. सकाळच्या गारठ्यामुळे त्वचेला रुक्षता न येता त्वचा मऊ तजेलदार होते. दिवस लहान होत जातो, हवेतील उष्णता कमी होत जाते अशावेळी तिळाचे तेल त्वचेतून उष्णता उत्सर्जित होऊ देत नाही. तिळ हा तैल पदार्थ असून त्यातील स्निग्ध गुण आरोग्यासाठी फायदेशीर आहेत. त्यात ओमेगा ३ व ओमेगा ६ फॅटी ॲसिड असतात जे शरीरातील कोलेस्टेरॉलची पातळी योग्य प्रमाणात ठेवण्यास मदत करतात. तिळात कॅल्शियम भरपूर असते जे आपल्या शरीरातील हाडे मजबूत करण्यास मदत करतात. तिळात मॅग्नेशियम, झिंक, ॲन्टिऑक्सिडंन्ट असतात. असे हे गुणकारी तिळ हिवाळाभर खाणे फायदेशीर असते. सूर्याचे मकर राशीत होणारे संक्रमण मकरसंक्रांत सण म्हणून महाराष्ट्रात , गुजरातमध्ये मोठ्या उत्साहात साजरा करतात. संपूर्ण भारतात वेगवेगळ्या नावांनी, प्रकाराने हा उत्तरायणाचा उत्सव वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. सूर्याचे किरण पृथ्वीवर सरळ येणार, उष्णता वाढणार याची जागृती हा सण करून देतो.

मकरसंक्रांतीला सारे एकमेकांना तिळगूळ देतात आणि शुभेच्छा देतात. रथसप्तमीपर्यंत हळदीकुंकू करतात. सर्व स्त्रिया एकमेकींना घरी बोलावतात, हळदी-कुंकू लावतात, वाण वाटतात. नवीन सुनेचा संक्रांत सण किंवा तिळवा, लहान बाळाचे बोरन्हाण किंवा लूट करतात. त्या निमित्ताने नुकतेच लग्न झालेल्या सुनेची सगळ्या नातेवाईक, मित्रमैत्रिणी यांच्याशी ओळख होते. नवीन सुनेला काळे वस्त्र परिधान करतात. तिला तिळाचे दागिने घालतात. पतंगांचे डेकोरेशन असते. तिळाच्या वस्तू प्रदर्शनात ठेवतात. लहानग्यांना काळा पोशाख देतात. औक्षण केल्यानंतर बोरं, ऊस, चॉकलेट्स, तिळाच्या रेवड्या या खाऊची लूट करतात.

असा हा तिलोत्सव रथसप्तमीपर्यंत चालतो. आता मात्र तिळाला, काळ्या कपड्यांना सायोनारा म्हणायची वेळ येते. हेमंत, शिशिर ऋतू संपून वसंताची तयारी करण्याची वेळ येते. हळूहळू दिवस मोठाही होतो आणि हवेत उष्मा जाणवू लागतो. अशी ही तिलोत्सवाची कहाणी आहे.

**डॉ. उज्ज्वला सतीश देशमुख**/९४२२८०७२४७

### भारतीय खेळाडूंनी सेरेना विल्यम्सचा आदर्श घ्यावा



अमेरिकेची प्रसिद्ध टेनिसपटू सेरेना विल्यम्स सध्या जगभरात चर्चेचा विषय ठरली आहे. आपल्या टेनिस कारकीर्दीत तिने शेकडो पुरस्कार आणि कोट्यवधी रुपयांची संपत्ती कमावली आहे. सध्या वयाच्या ४४ वर्षांच्या टप्प्यावर सेरेनाने उचललेले पाऊल कौतुकाची घटना ठरली आहे. अतिशय शांतपणे तिने आपली पाचशे दशलक्ष डॉलर्सची संपत्ती, सर्व शेअर्स, मालमत्ता, दागिने बेघर लोकांसाठीच्या रुग्णालयासाठी दान केले आहे. केवळ संपत्तीचं नव्हे तर तिने तिच्या तेवीस ग्रॅण्डस्लॅम ट्रॉफीज देखील वितळवून त्याचा पैसा रुग्णालयाच्या उभारणीसाठी खर्च केला आहे. अमेरिकेतील लॉस एंजेलिस या प्रसिद्ध शहरातील स्किड रो भागात कसलाच निवारा नसलेल्या तसेच कुठलाही वैद्यकीय विमा नसलेल्या उपेक्षित लोकांसाठी भव्य रुग्णालय उभारण्याचा संकल्प सिद्धीस जात आहे. बाराशे खाटांचे हे रुग्णालय गोरगरीब रुग्णांसाठी संपूर्णपणे मोफत असणार आहे. सध्या रुग्णालयाचे बांधकाम सुरू असून तेथील बांधकाम कामगारांनी दिलेल्या माहितीनुसार सेरेना गेल्या चार महिन्यांपासून साईटवरच तंबू ठोकून या कामाची पाहणी करीत आहे.

टेनिसच्या क्षेत्रात प्रचंड यश मिळवून तसेच मोठी कीर्ती संपादन करूनदेखील जमिनीवर असलेली खेळाडू म्हणून सेरेनाकडे पाहिले पाहिजे. आपण कमावलेला पैसा आणि संपत्ती हे समाजाचेच देणे असल्याची भावना व्यक्त करीत ती संपत्ती पुन्हा समाजालाच अर्पण करण्याची सेरेनाची दानशूर वृत्ती अनुकरणीय ठरते. कारण संपन्न राष्ट्र असलेल्या अमेरिकेतही गरीब लोकांची संख्या कमी नाही. त्यांच्यासाठी भरीव योगदान देणाऱ्या सेरेनाचा आदर्श इतर खेळाडू आणि सेलिब्रेटींनी घेण्यास हरकत नाही. या पृष्ठभूमीवर भारतातील स्थिती पाहता अतिशय खंत वाटते.

क्रिकेटच्या माध्यमातून अब्जावधी रुपये कमावलेल्या स्टार खेळाडूंना अजूनही संपत्ती कमावण्याची हाव दिसून येते. परंतु, ज्या देशाने किंवा ज्या देशातील समाजाने आपणास इथपर्यंत पोहोचवले किंवा आपल्या यशाला कारणीभूत ठरले त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी आपले खेळाडू नेहमीच दडवत आले आहेत. सेरेनासारख्या जगप्रसिद्ध खेळाडूंकडून भारतीय खेळाडूंनी अनेक गोष्टी शिकण्यासाख्या आहेत. सामाजिक बांधिलकी जपण्याकडे प्रत्येकानेच आज लक्ष देण्याची गरज आहे. त्यातही वलयांकित आणि अब्जाधीश खेळाडूंकडून जनतेला खूप अपेक्षा आहेत.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

### मुख्यमंत्री फडणवीसांचा मास्टरस्ट्रोक

बृहन्मुंबई महानगरपालिकेची निवडणूक ही राज्याच्या राजकारणातील सर्वांत प्रतिष्ठेची लढाई मानली जात होती. गेल्या तीन दशकांपासून या आर्थिक सत्तेवर शिवसेना उबाठाचे वर्चस्व होते. मात्र, या सत्तेला सुरुंग लावत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपा-सेना (शिंदे गट) युतीसाठी मुंबईचा गड सर केला. या निवडणुकीत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे दोन्ही बंधू मराठी अस्मिता आणि हिंदी सक्तीच्या मुद्द्यावरून एकत्र आले होते. मात्र मुंबईकरांनी त्यांच्या भावनिक आवाहनापेक्षा विकासाला कौल दिला. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत जनतेने भाजपा-सेना युतीला कौल दिला होता. मात्र, मुख्यमंत्रिपदाच्या अट्टहासापोटी उद्धव ठाकरे यांनी नैसर्गिक युती तोडून काँग्रेस-राष्ट्रवादीशी हातमिळवणी केली. ''शिवसैनिकाला मुख्यमंत्री करण्याचे बाळासाहेबांना दिलेले वचन पूर्ण करण्यासाठी मी हा निर्णय घेतला'' असे समर्थन त्यांनी केले खरे, परंतु भाजपा-सेना युतीला मतदान करणाऱ्या निष्ठावान मतदारांना हा कौलचा अपमान वाटला.

उद्धव ठाकरे यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात कायदा-सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला. साधूंची हत्या, सुशांत सिंह राजपूत प्रकरण, मनसुख हिरेन प्रकरण आणि गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर झालेला १०० कोटींच्या वसुलीचा आरोप, यामुळे सरकारची प्रतिमा डागाळली. सोशल मीडिया पोस्टवरून झालेली कारवाई आणि हिंदुत्वापासून झालेली फारकत यामुळे शिवसेनेत मोठा उठाव झाला. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली ५० आमदारांनी बाहेर पडत भाजपासोबत नवे सरकार स्थापन केले.

सत्तांतरानंतर फडणवीस-शिंदे सरकारने पायाभूत सुविधा आणि लाडकी बहीणसारख्या योजनांद्वारे जनतेचा विश्वास संपादन केला. लोकसभा निवडणुकीत संविधान बदलणार या खोट्या प्रचारामुळे भाजपाला काही जागा गमवाव्या लागल्या. मात्र विधानसभा आणि महापालिका निवडणुकीत त्यांनी या चुका दुरुस्त केल्या. दुसरीकडे, ठाकरे बंधूंनी पुन्हा मराठी माणूस आणि मुंबई तोडणार ही जुनीच रट लावून धरली. मात्र, ज्या राज ठाकरेंना विधानसभेत एकही जागा जिंकता आली नाही, त्यांच्याशी युती करूनही मुंबईकरांनी उद्धव ठाकरेंना प्रतिसाद दिला नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडलेली कामांची शिदोरी मतदारांना भावली. हा विजय म्हणजे केवळ सत्तापालट नसून, मुंबईकरांनी विकासाच्या राजकारणावर मारलेली मोहर आहे.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

### ऋतू बसंत उपजे नवेली

काक: कृष्ण पिक: कृष्ण
को भेदो पिक काकयो:
वसंत समये प्राप्ते काक: काक पिक: पिक...

आपण लहापणापासून हे सुभाषित ऐकत आलोय. कावळा आणि कोकिळ दोघेही काळे असल्यामुळे दोघांमध्ये फरक करणे कठीण असते परंतु वसंत ऋतूचे आगमन होताच ऋतुबदलाने प्रसन्न होऊन कोकिळ गाऊ लागतो आणि कावळा काव काव करतो तेव्हा दोघांतील फरक लक्षात येतो. अशा अर्थाचा हा श्लोक आहे.

म्हणजे सगळ्यात आधी पशुपक्ष्यांना वसंत आपली चाहूल देतो. खरं तर ही चाहूल लागते ती माघातच. संक्रांतीनंतर सूर्याचं उत्तर गोलार्धात संक्रमण झाल्यानंतर वातावरण ऊबदार व्हायला लागतं. झाडांना नवी पालवी फुटते. आंब्याला मोहोर येऊ लागतो आणि साऱ्या सृष्टीत चैतन्य पसरू लागतं. या उल्हसित चित्तवृत्तीचे उत्सवात रूपांतर न झाले तरच नवल. वसंत पंचमी हा उत्सव भारतात सर्वत्र साजरा करतात. हा दिवस देवी सरस्वती आणि लक्ष्मी यांचा जन्मदिवसही मानला जातो. पै वसंताचे रिगवणे झडाचेनी साजेपणे या माउलींच्या ओवीत सांगितल्याप्रमाणे साऱ्या सृष्टीचं शिशिरात हरवून गेलेलं वैभव पुन्हा दोन्ही हातांनी तिला भरभरून देणाऱ्या वसंत ऋतूची चाहूल कुणाच्याही न कळत 'मी येतोय, कमिंग सून' असं वारंवार रिमाइंडर न देता अलगद येतो. तो कळतो तो मोहरीच्या झाडातून, नव्या पालवीतून, आंब्याच्या मोहराच्या तुऱ्यातून, अलगद येणाऱ्या मोगऱ्याच्या मंद झुळकीतून.

साद कोकिळ घालतो, कधी वसंत येईल, पान गळल्या तरुला नवी पालवी देईल. अशी साद घालताना सगळी धरती उत्साहाने वसंताचे स्वागत करते. संगीतातील बसंत राग चैतन्य निर्माण करतो आणि त्या स्वरातून आपल्याही मनातील वसंताला नवी पालवी फुटून उत्साहाच्या लहरी निर्माण करतात. म्हणूनच आपल्या विभूती सांगताना भगवान श्रीकृष्णांनी ऋतूंमध्ये मी वसंत ऋतू आहे. ऋतूनां कुसुमाकर: असं सांगितलंय. त्यामुळे इतकं मोहक, उत्साहवर्धक असल्यावर शुभही असणारच.

धनश्रीताई लेले सांगतात, एकदा रवींद्रनाथजी पांढरा झब्बा घालून बसले होते. ते अचानक उठून खोलीत गेले आणि केशरी रंगाचा झब्बा घालून आले. इतरांनी आश्चर्याने त्यांच्याकडे बघितल्यावर ते म्हणाले, ''मला मोगऱ्याचा मंद सुगंध आला म्हणजे निसर्गाने वसंताची चाहूल दिली मग त्याचे स्वागतही त्याच्या रंगानेच करायला हवे ना, म्हणून हा बदल.'' अलगद येणारा वसंतही धन्य आणि तितक्याच नजाकतीने समजून घेणारे रवींद्रनाथही धन्य.

आपणही आपल्या मरगळलेल्या मनाला झटकून टाकू आणि नवचैतन्य आणणाऱ्या वसंत ऋतूला उत्स्फूर्त दाद देऊन जीवनात फुललेल्या कमानीखालून जाऊन सकारात्मक रंगांची उधळण करूया.

कधी सुरा सुरांनी, ऋतुगंध शब्दलेणे,
आनंद शब्दगंध, गाऊ वसंत गाणे...

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

### बालविवाह थांबवा, मुलींना सक्षम करा

समाजाच्या विकासासाठी स्त्रियांचे योगदान नेहमीच महत्त्वपूर्ण राहिलेले आहे. समाजातील महिलांच्या अस्तित्वाची व कार्याची जाणीवपूर्वक दखल घेऊन महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीमुक्ती चळवळ राबवली. स्त्रियांनाही विकासाची संधी मिळावी म्हणून फुले दाम्पत्याने मुलींच्या शिक्षणासाठी पहिली शाळा काढून स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. त्यामुळे स्त्रियांचे अस्तित्व आज समाजात टिकून आहे. स्त्रीच्या कर्तबगारीमुळेच मानवाने चंद्रावर पाऊल ठेवण्यात यश प्राप्त केले आहे. या यशात अंतराळात जाऊन मोलाचे योगदान देणारी पहिली भारतीय महिला म्हणजे कल्पना चावला. या सोबतच इतरही विविध क्षेत्रांत अनेक महिलांनी आपल्या प्रतिभेचे दर्शन घडविले आहे. भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी तसेच बचेंद्री पाल, पी. व्ही. सिंधू, हिमा दास असो की, किरण बेदीप्रमाणे स्वत:ला सिद्ध करणाऱ्या कर्तबगार महिला असोत. त्या कोणत्याच क्षेत्रात कमी नाही. यांच्याप्रमाणेच अनेक मुली एकीकडे आपले व आपल्या कुटुंबाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जिवाचे रान करतात आणि यश संपादन करून स्त्रीशक्तीला सिद्ध करतात. तर दुसरीकडे मात्र समाजाकडून मुलींचा बालविवाह केला जातो व त्यांच्या विकासाला खीळ बसवली जाते. यामुळे मुलींच्या व पर्यायाने देशाच्या विकासात मोठी बाधा निर्माण होते. ही बाधा निर्माण करणाऱ्या बालविवाहाच्या अनेक घटना आताच्या विज्ञान युगातही मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने ''बालविवाहमुक्त महाराष्ट्र आपला संकल्प अभियान'' राबविण्यात येत आहे. बालविवाह एक मोठी सामाजिक समस्या आहे. ज्यामुळे मुलींच्या हक्कांवर, आरोग्यावर आणि तिच्या भविष्यावर खोलवर परिणाम होतो. बालविवाहामुळे मुलीचे शिक्षण खंडित होते. अल्पवयातच गर्भधारणा व लैंगिक शोषणाला तिला सामोरे जावे लागते. म्हणूनच बालविवाह ही एक कुप्रथा आहे. प्राचीन काळातील जटिल धार्मिक बंधने, रूढी, परंपरा यामुळे बालविवाह घडून येत होते. ही प्रथा बंद करण्यासाठी १२ व्या शतकातील महात्मा बसवेश्वरांपासून राजा राममोहन रॉय, केशव चंद्र अशा थोर समाजसुधारककांनी बालविवाह प्रथेला कडाडून विरोध केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातून कायद्याच्या रूपाने स्त्रीला प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने अधिकार दिला. त्याचप्रमाणे शासनाने बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ अंमलात आणून बालविवाहाला बंदी घातलेली आहे. बालविवाहामुळे मुलींच्या शिक्षण घेण्याच्या, खेळण्या-बागडण्याच्या बालवयातच विवाहाचा आघात त्यांच्या माथी मारला जातो. रूढी, परंपरा, धार्मिक बंधने, अज्ञान, प्रेमविवाह, परिवारातील अनेक सदस्यांची जबाबदारी अशा अनेक कारणांमुळे बालविवाह घडून आल्याचे दिसतात. तसेच ग्रामीण भागातील अनेक मुलींचे शिक्षण पूर्ण होत नाही. उच्च शिक्षणाच्या संधी गावापासून दूर असतात. त्यातच दळणवळणाच्या, जाण्यायेण्याच्या साधनांचा अभाव असतो. त्यामुळे शिक्षण थांबते व कुटुंबात मुलींच्या लग्नाची घाई केली जाते. त्यामुळेही मुलींना बालविवाहाला बळी पडावे लागते. मुलींचे शिक्षण पूर्ण होण्यावर भर देणे गरजेचे आहे. एक मुलगी शिकली की कुटुंब शिकतं, कुटुंब शिकलं की समाज आणि समाज शिकला की देश प्रगतिपथावर जातो. म्हणून सशक्त, सुदृढ देशाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी बालविवाह थांबलेच पाहिजे.

**राजश्री खाजोने**/९६६५६८०६३९

### ठाकरे बंधू वाचाळवीर ठरले

महाराष्ट्रातील महानगरपालिका निवडणुकीत महायुतीने अभूतपूर्व यश संपादन केले आणि पुन्हा एकदा सर्वांगीण विकास हाच मुद्दा मतदारांना पटवून देण्यात यशस्वी ठरले. भारताची आर्थिक राजधानी मुंबईवर सलग २७ वर्षे राज्य केलेल्या ठाकरे कुटुंबीयांना मतदारांनी भाषावाद, प्रांतवादपेक्षा सुशासन, सुरक्षा आणि विकासाला प्राधान्य दिल्याने हा निर्णय ऐतिहासिक ठरतो. या निर्णयाने उबाठाचे अस्तित्व नाकारले आहे. मोठ्या सभा आयोजित करून व्यक्तिगत टीका, व्यंगात्मक व अभद्र भाषा वापरून मतदारांना जिंकता येत नाही, हे ठाकरे बंधूंना आता कळले नाही आणि त्यांनी त्यांच्यात सुधारणा केली नाही तर उरले सुरले कार्यकर्ते देखील सोबत राहणार नाहीत, हा इशारा या निवडणुकीने दिला आहे. मुंबईमध्ये या पुढाऱ्यांना मतदारांनी सत्ते पासून दूर ठेवले यासाठी देशातील सर्व नागरिक त्यांच्या ऋणात राहतील. ७२ हजार कोटींचा अर्थसंकल्प असलेले हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर या वाचाळवीरांच्या तावडीतून काढल्यामुळे मुंबईचे सर्व मतदार अभिनंदनास पात्र आहेत.

**संजय पाठक**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

# उबाठा, शप, सेना, राष्ट्रवादी फेल; जबाबदारी कोणाची?

## ● माकप, वंचित, मनसेचाही सोलापूर शहरातून सुफडासाफ; जबाबदारी स्वीकारून शहर पदाधिकारी देणार का राजीनामा

## ● शिंदेसेना केवळ ४ तर काँग्रेस २ अन् राष्ट्रवादी १ हे आकडे नामुष्कीजनकच; आता जिपमध्ये जिल्हा पदाधिकाऱ्यांची अग्निपरीक्षा

**तभा वृत्तसेवा । सोलापूर, दि. १७ जानेवारी-**

**लोकसभेला शिंदे शिवसेना आणि अजित राष्ट्रवादी यांना उमेदवारीचीच संधी नव्हती तर विधानसभेलाही या दोन्ही पक्षांना जिल्ह्यात एकही आमदार विजयी करता आला नाही. नगरपरिषदांच्या निवडणुकीत निम शहरी भागात काही प्रमाणात या पक्षांनी यश मिळवले पण महापालिकेला मात्र शिवसेना ४, राष्ट्रवादी एक हे आकडे शहरात मिरवणाऱ्या पदाधिकाऱ्यांसाठी नामुष्कीजनकच म्हणावे लागतील. ४८ जागा लढवून फक्त दोन नगरसेवक निवडून येणे म्हणजे जवळपास ४५ वर्षे महापालिकेवर सत्ता मिरवणाऱ्या काँग्रेससाठी तर खूपच नामुष्कीची बाब आहे. मनसे, माकप, वंचित यांचा तर या निवडणुकीत सुफडासाफ झाला आहे. राज्याच्या सत्तेतील महायुतीत सहभागी मित्रपक्ष असतानाही शिंदे सेना व अजित राष्ट्रवादीच्या शहर पदाधिकाऱ्यांनी भाजपासोबत जागा वाटपात तोडगा काढता आला नाही. भाजपा देईल तितक्या जागा जरी लढवल्या असत्या तरी या दोन्ही मोठ्या राजकीय पक्षांचा सन्मान राखला गेला असता. शरद पवार राष्ट्रवादी, उध्दव बाळासाहेब ठाकरे सेना या दिग्गज पक्षांना सोलापूरकरांनी स्पष्ट नाकारले. विशेष म्हणजे बहुतांश विरोधी पक्षांची राजकीय ताकद कमी होवूनही त्यांचे आपसातील मतभेद कमी न झाल्याने पदरी अपयश पडल्याचे चित्र आहे. या नामुष्कीची जबाबदारी स्वीकारून पदाधिकाऱ्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी याच पक्षाचे कार्यकर्ते करीत आहेत. वर्षेनुवर्षे हेच पदाधिकारी खुर्चीवर असल्यानेच पक्षाची ही अवस्था असून आता तरी वरिष्ठांनी लक्ष देवून नव्याने संधी द्यावी, अशी मागणी होत आहे.**






सन १९६४ मध्ये सोलापूर महापालिका अस्तित्वात आल्यानंतर मधला पुलोदचा काही काळ अपवाद वगळता सोलापूर महापालिकेवर सन २०१७ पर्यंत काँग्रेसची जवळपास एकहाती सत्ता होती. तर १९९९ साली शरद पवारांकडून राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेनंतर काँग्रेसबरोबर राष्ट्रवादीदेखील मनपाच्या सत्तेत सोबत होती. २०१७ मध्ये झालेल्या महापालिका निवडणुकीत महापालिकेच्या १०२ नगरसेवकांपैकी ४९ जागांवर विजय मिळवून भाजपाने एकहाती सत्ता आणली. केंद्र, राज्य आणि महापालिकेत भाजपाचीच सत्ता असल्याने सोलापूरच्या विकासाला गती मिळाली. परंतु भाजपाच्या नगरसेवकांमध्ये देखील दोन गट पडल्याने म्हणावा तसा विकास झाला नाही. वास्तविक पाहता २०२२ सालीच मनपा निवडणुका होणे अपेक्षित होते पण न्यायप्रविष्ठ प्रकरणामुळे तब्बल तीन वर्षे उशीराने म्हणजे डिसेंबर २०२५ मध्ये महापालिका निवडणुकांना मुहुर्त लागला. इतक्या मोठ्या गॅपमुळे यंदाच्या निवडणुकीत १०२ जागांसाठी तब्बल ६४० उमेदवारांनी नशिब आजमावले. परंतु दरम्यानच्या या कालावधीत राज्याच्या राजकारणात प्रचंड खलबते होवून पूलाखालून बरेच पाणी वाहून गेले. शिवसेना फूटून दोन सेना झाल्या तर राष्ट्रवादीही फूटून दोन झाल्या. भाजपाच्या विरोधात मोठी ताकद निर्माण केलेल्या विरोधी पक्षातच मोठी फूट पडल्याने राजकारण ढवळून निघाले.

राज्याच्या सत्तेत सध्या भाजपा- शिंदे शिवसेना- अजित राष्ट्रवादी हे तीन पक्ष आहेत. तर विरोधातील महाविकास आघाडीत काँग्रेस-उबाठा-शरद पवार असे प्रमुख पक्ष होते. महापालिका निवडणुकीच्या तोंडावरच युती अन् आघाड्यांचेही सूर बिखरले आणि भाजपाने अनेक महापालिकांमध्ये स्वबळाचा नारा दिला. शहाणपणा दाखवत शिंदे सेनेने काही महापालिकेत भाजपाशी हातमिळवणी करीत संधान साधले. मात्र अजित पवार राष्ट्रवादी मात्र या निवडणुकीत पुरती एकाकी पडली. शेवटी अजितदादांना काका शरद पवारांचा पुन्हा आधार घ्यावा लागला. काँग्रेसने देखील महाविकास आघाडी तोडत स्वबळाचा नारा दिला. मत विभागणी टाळण्यासाठी काँग्रेसने यंदा वंचितला सोबत घेतले पण हे मनोमिलन फारसे उपयोगात आल्याचे निकालानंतर दिसले नाही. सोलापूर महापालिकेत शिंदे सेना आणि अजित राष्ट्रवादी एकत्र आले. तर काँग्रेस-उबाठा-शरद राष्ट्रवादी यांची महाविकास आघाडी येथे कायम राहिली. उबाठासोबत मनसे तर काँग्रेससोबत वंचितही होती. परंतु या राजकीय गोळाबेरजेचा सोलापुरात काहीच उपयोग झाला नाही. याउलट या स्थिरावलेल्या पक्षांपेक्षा जास्त जागा सोलापुरात एमआयएमने जिंकल्याचे दिसून आले.

सोलापूर महापालिकेत भाजपाची मोठी ताकद असून त्यांचे गतवेळी ४९ नगरसेवक होते तसेच त्यांच्याकडे सक्षम महिला उमेदवारांची मोठी फळी आहे. विशेष म्हणजे शहरातील तीनही आमदार भाजपाचे आहेत. भाजपाची ही ताकद ओळखून उर्वरित सर्वच विरोधी पक्षांनी खलबते साधली असती तर कदाचित महापालिकेत विरोधी पक्षनेते पद मिळाले असते इतकी तरी संख्या यांना गाठता आली असती. परंतु असे काहीच झाले नाही. याउलट महापालिकेच्या १०२ पैकी ८७ जागा जिंकून भाजपाने ऐतिहासिक विजय तर मिळवलाच पण सर्वच विरोधी पक्षांचे राजकीय नाक कापल्याचे दिसून आले. गतवेळी एकत्रित शिवसेनेचे २१ नगरसेवक होते पण सेना फुटल्यामुळे शिंदेसेनेचे ४ नगरसेवक विजयी झाले तर उबाठा पार भुईसपाट झाली. दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येवूनही सोलापूरकांनी त्यांना नाकारले. याचे मोठे कारण म्हणजे उबाठा सेनेतील पक्षातंर्गत वाद ऐन निवडणुकीत उफाळले. उबाठाच्या तीन प्रमुख पदाधिकाऱ्यांनी पक्षाची साथ सोडली. यापैकी गणेश वानकर आणि संतोष पाटील दोघांनी भाजपाच्या साथीला जात नगरसेवकपद पदरात पाडून घेतले तर पुरुषोत्तम बरडे यांनी मुलीला भाजपाकडून उमेदवारी मिळवून तिचा उघड प्रचार केला पण त्यांना यश आले नाही. ऐन निवडणुकीच्या तोंडावर उबाठामध्ये उघडपणे वादावादी आणि आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडल्याने उबाठा सेनेची अशी राजकीय अवस्था झाल्याचे दिसून आले.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे आणि खा. प्रणिती शिंदे यांनी आपल्या कार्यकर्त्यांसाठी जोर लावला पण त्यांना यश आले नाही. काँग्रेसला तर केवळ दोनच नगरसेवकांवर समाधान मानावे लागले. चेतन नरोटे व नृसिंह आसादे या दोघांनी आपल्या वैयक्तिक संबंधावरच ही निवडणूक खेचून आणल्याची चर्चा होती.

अजित पवार राष्ट्रवादीने तर या निवडणुकीत मोठा गवगवा केला. कृषी मंत्री दत्ता भरणे आणि उपसभापती आण्णा बनसोडे यांच्यावर सोलापूरची जबाबदारी सोपवली. शहराध्यक्ष संतोषभाऊ पवार आणि कार्याध्यक्ष जुबेर बागवान या जोडगोळीवरही निवडणुकीची मदार होती. अजित राष्ट्रवादीची मदार यंदा मुस्लिम मतांवरही होती. परंतु या निवडणुकीत केवळ एकच जागा अजित राष्ट्रवादीची विजयी झाली अन् तो उमेदवार देखील भाजपाचा पण ऐनवेळी भाजपाकडून उमेदवारी न मिळाल्याने राष्ट्रवादीत आला आणि त्यानेच राष्ट्रवादीची राजकीय लाज राखण्याचा थोड्या प्रमाणात प्रयत्न केला. मुस्लिम समाजाचे जवळपास वीस उमेदवार तर दलित समाजाचेही उमदेवार अजित राष्ट्रवादीने रिंगणात उतरवले होते. परंतु राष्ट्रवादीला मराठा-मुस्लिम-दलित या मतदारांनी साथ दिली नसल्याचे स्पष्ट झाले.

शरद पवार यांचा सोलापूरशी पूर्वीपासूनच मोठा घनिष्ठ संबंध असून सोलापूरच्या राजकारणात त्यांचा शब्द प्रमाण होता. परंतु सोलापूर शहराने शरद पवारांना नाकारले तर ग्रामीणमध्ये मोहिते-पाटलांनी शरद राष्ट्रवादीचे अस्तित्व टिकवून ठेवले आहे.

अशा या दिग्गज राजकीय पक्षांची भाजपाने पुरती वाट लावली असून महापालिका निवडणुकीत ओढावलेल्या नामुष्कीजनक पराभवाची जबाबदारी स्वीकारून या पक्षाच्या शहर पदाधिकाऱ्यांनी किमान लाजेकाजे तरी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा अथवा वरिष्ठांनी घ्यावा, अशी मागणी त्यांच्याच पक्षाचे कार्यकर्ते करीत आहेत.

### पदाधिकाऱ्यांनी राजीनामा दिला तरी पक्ष स्वीकारतील का?

महापालिका निवडणुकीत नामुष्कीजनक पराभवाची जबाबदारी स्वीकारून पदाधिकाऱ्यांनी राजीनामा दिला तरी त्यांचे पक्ष स्वीकारतील का असा प्रश्न आहे. कारण या पक्षांकडे अगोदरच खूप कमी पदाधिकारी, कार्यकर्ते उरले आहेत. या पक्षांनी राजीनामा स्वीकारले अथवा घेतले तरी ते भाजपाच्या गोटात जाणार हे निश्चित आहे. त्यापेक्षा सोबत असतील ते मावळे म्हणून मनपा निवडणुकीत अपयशी ठरलेल्या पदाधिकाऱ्यांना या पराभूत राजकीय पक्षांना त्यांना सांभाळून घ्यावे लागणार हे मात्र निश्चित आहे. भाजपाच्या रणनितीपुढे विरोधक हतबल झाल्याचे मात्र दिसून येत आहे.

### जिल्हा परिषद निवडणुकीत ग्रामीण पदाधिकाऱ्यांची अग्निपरीक्षा

महापालिका निवडणुकीत शहरात हाराकिरी झालेल्या शिवसेना, राष्ट्रवादी, काँग्रेस, शरद राष्ट्रवादी, उबाठा-मनसे या पक्षाच्या ग्रामीण पदाधिकाऱ्यांना आता जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपाचा सामना करावा लागणार आहे. निवडणुका जिंकण्याचे भाजपाचे यशस्वी तंत्र जिप निवडणुकीतही कमाल दाखवू शकते. कारण महापालिका विजयाचे शिल्पकार पालकमंत्री जयकुमार गोरे, आ. सचिनदादा कल्याणशेट्टी, आ. देवेंद्रदादा कोठे हेच त्रिकुट आता जिल्हा परिषद निवडणुकीचीही धुरा सांभाळणार आहेत. त्यामुळे विरोधी पक्षासह मित्रपक्षांच्या ग्रामीण पदाधिकाऱ्यांना आता अग्निपरीक्षेला सामोरे जावे लागणार आहे. जिल्ह्यात शरद राष्ट्रवादीचे चार आमदार असल्याने त्यांची रणणिती काय असणार हे महत्वाचे ठरणार आहे. अजित राष्ट्रवादी काकांसोबत आल्यास त्यांची ताकत वाढणार आहे. पण उबाठा, काँग्रेसचा एकही आमदार नसल्याने त्यांचा मात्र या निवडणुकीत कस लागणार आहे.


बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra
प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5

आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
Zonal Office, Agarwal Palace, First Floor, D Mart-Bharati Vidyapith Road, Opp. Patanjali Mall, Jule Solapur, Solapur - 413004.
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal sol@mahabank.co.in

नियम - ८ (१)
ताबा सूचना

याद्वारे बँक ऑफ महाराष्ट्रचा अधिकृत अधिकारी, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, २००२ अंतर्गत, आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ३ सह वाचलेल्या कलम १३ च्या उप-कलम (१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि जामीनदारांना सदर सूचना मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत संपूर्ण देय रक्कम परत करण्याची मागणी करणारी मागणी सूचना दिनांक १३/१०/२०२५ रोजी जारी केली होती.

कर्जदाराने रक्कम परत करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचित करण्यात येते की, मी, सदर कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट नियम, २००२ च्या नियम ८ अंतर्गत मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, दिनांक १४/०१/२०२६ रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला या मालमत्तांशी कोणताही व्यवहार न करण्याची ताकीद देण्यात येत आहे आणि मालमत्तांशी केलेला कोणताही व्यवहार बँक ऑफ महाराष्ट्रच्या वर नमूद केलेल्या रकमेच्या भाराच्या अधीन असेल.

सुरक्षित मालमत्ता सोडवण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात, कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे वेधले जाते.

| अ. क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| १ | **शाखा- जुळे सोलापूर**<br>**कर्जदार -**<br>**१.सौ. स्नेहल महांतेश हिरेमठ**<br>प्लॉट क्रमांक बी-४६, द्वारका नागरी सहकारी गृह निर्माण संस्था विजापूर रोड सोलापूर ४१३००४<br>**दुसरा पत्ता**<br>C/o, राजपूत सागर गोविंद ब्लॉक क्र. ३९/३, सिमला नगर विजापूर रोड सोलापूर ४१३००४<br>**२.श्री. महांतेश काशिनाथ हिरेमठ**<br>प्लॉट क्रमांक बी-४६, द्वारका नागरी सहकारी गृह निर्माण संस्था विजापूर रोड सोलापूर ४१३००४<br>**दुसरा पत्ता**<br>C/o, राजपूत सागर गोविंद ब्लॉक क्र. ३९/३, सिमला नगर विजापूर रोड सोलापूर ४१३००४ | **गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन**<br>**सर्व तुकडे आणि पार्सल-**<br>प्लॉट क्रमांक बी-४६, एस. क्रमांक (३४९/२अ) ४/२अ द्वारका नागरी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादा (अ) सोलापूर नेहारू नगर ता. उत्तर सोलापूर विजापूर रोड सोलापूर ४१३००४<br>**मालकीचे: श्रीमती स्नेहल महांतेश हिरेमठ**<br>**चतु:सीमा खालीलप्रमाणे: -**<br>पूर्व: ३ मीटर रस्ता<br>पश्चिम: एस. क्रमांक ३४९/१<br>दक्षिण: प्लॉट क्रमांक सी-४७<br>उत्तर: प्लॉट क्रमांक बी-४५<br>CERSI मालमत्ता आयडी २०००३४००९७४२ | **मागणी सूचना:**<br>**दिनांक १३.१०.२०२५.**<br>**खाते शिल्लक:**<br>रु. ३१,२९,९००.00+ लागू न केलेले व्याज<br>**एकूण: रु. ३१,२९,९००.00/-**<br>**(एकतीस लाख एकोणतीस हजार नऊशे फक्त)**<br>**सांकेतिक ताबा दिनांक :**<br>**१४.०१.२०२६** |

ठिकाण: सोलापूर
दिनांक: १४.०१.२०२६

सही/-
मुख्य व्यवस्थापक आणि
अधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.


## आनंद चंदनशिवे यांच्या पराभवाने प्रभागात हळहळ

### ▶▶ कार्यालयासमोर महिलांचा आक्रोश; अश्रू अनावर

### ▶▶ भावुक चंदनशिवे म्हणाले, लोकसेवा सुरूच राहील

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे उमेदवार तथा तीन टर्म नगरसेवक आनंद चंदनशिवे यांचा पराभव झाल्याने त्यांच्या प्रभागात तीव्र भावना उमटल्या. शहरातील अनेक नागरिकांच्या, विशेषतः महिलांच्या समस्या सोडविणारा, विकासकामांचा धडाडीने पाठपुरावा करणारा कर्तव्यदक्ष नगरसेवक हरल्याने प्रभागातील महिला व नागरिकांना दु:ख अनावर झाले. अनेक महिलांनी त्यांच्या कार्यालयासमोर येऊन आपले दु:ख व्यक्त केले.



तीन टर्म नगरसेवक म्हणून चंदनशिवे यांनी रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, नागरी सुविधा यांसह वैयक्तिक पातळीवर नागरिकांच्या समस्या तातडीने सोडवण्यावर भर दिला. एखादी महिला असो वा सामान्य नागरिक, समस्या मंडताच तत्काळ तोडगा काढण्याची त्यांची कार्यपद्धती सर्वश्रुत होती. त्यामुळेच त्यांच्या पराभवाची बातमी समजताच अनेक महिला त्यांच्या मिलिंद नगरातील कार्यालयासमोर जमा झाल्या. आम्हाला पराभव मान्य नाही. आम्हाला अशाच कर्तव्यदक्ष नगरसेवकाची गरज होती,

अशा भावना व्यक्त करत महिलांनी अश्रूंना वाट मोकळी करून दिली. यामुळे परिसरात भावनिक वातावरण निर्माण झाले.

महिलांचा आक्रोश पाहून आनंद चंदनशिवेही भाऊक झाले.यावेळी बोलताना आनंद चंदनशिवे म्हणाले, निवडणुकीत हार-जीत होतच असते. मी पराभूत झालो असलो तरी लोकसेवेचे काम थांबणार नाही. रात्रंदिवस नागरिकांसाठी काम करत राहीन, असा विश्वास त्यांनी उपस्थितांना दिला.

कर्तव्यदक्ष, संवेदनशील आणि नागरिकांच्या सुख-दु:खात सहभागी होणाऱ्या नगरसेवकाच्या पराभवाने हा प्रभाग अस्वस्थ असून, हा पराभव केवळ एका उमेदवाराचा नसून जनतेच्या अपेक्षांचा असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.


**हेरिटेज मणिधारी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित सोलापूर**
**जाहीर निविदा सूचना**

या संस्थेच्या दिनांक २८.९.२०२५ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभा मंजूर ठराव अन्वये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम मंजूर झाले आहे. संचालक मंडळ सभा दिनांक १४ डिसेंबर २०२५ ठराव अन्वये आपल्या सोसायटी संपूर्ण परिसरात प्लॉटधारक सभासदांचे सुरक्षितेसाठी सीसी टी व्ही कॅमेरे बसविण्याचे ठरले आहे त्यानुसार आपल्या सोसायटीत सी सी टी व्ही कॅमेऱ्यांचा सेट बसविणे. या कामासाठी अनुभवी ठेकेदारांकडून खालील वर्णनाचे मोहरबंद निविदा संस्थेच्या कार्यालयात दिनांक २४ जानेवारी २०२६ रोजी कार्यालयीन वेळेत सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत संस्थेच्या कार्यालयात निविदा आणून द्यायचे आहेत.

| अ. क्र | कामाचे वर्णन | अंदाजित रक्कम | बयाणा रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | १ हेरिटेज मणीधारी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित सोलापूर संस्थेचा संपूर्ण परिसर ३२ चैनल कॅमेरा सेटचा पूर्ण काम<br>बुलेट कॅमेरा २ mp IP नग २० आणि बुलेट कॅमेरा ४ mp IP नग ४ एकूण २४ बुलेट कॅमेरा व टीव्ही FOUR k 55 इंच नग १ त्या करिता लागणारे संपूर्ण केबल वायर G I तार इलेक्ट्रिकल साहित्य फिटींग्ज आवश्यक असलेले संपूर्ण सुपर क्वॉलिटी साहित्य व फिटींग करून चाल करुन देणे. | रुपये ४,५०,०००/- | १०% रुपये ४५,०००/- | ३० दिवस |

| No. | Description | Qty |
|---|---|---|
| 1 | HIKVISION 32CH NVR DS-7632NI-K2 | 1.00 pcs |
| 2 | WESTERN DIGITL 4TB HDD | 1.00 pcs |
| 3 | UNV 2MP IP BULLET CAMERA IPC 8122-PF40 | 20.00 pcs |
| 4 | UNV 4MP IP BULLET CAMERA IPC2314LE-ADF40KM-WP | 4.00 pcs |
| 5 | D-LINK 04 PORT POE SWITCH | 12.00 pcs |
| 6 | SYROTECH SY-GPON-2PORT-OLT | 1.00 pcs |
| 7 | SYROTECH GOPON-1000R-ONU | 12.00 pcs |
| 8 | OUTDOOR RACK | 12.00 pcs |
| 9 | D-LINK 9U RACK | 1.00 pcs |
| 10 | OFC CABLE 4CORE AS PER ACTUAL | 1.200.00 m |
| 11 | SERVICE WIRE FOR POWERSUPPLY AS PER ACTUAL | 700.00 m |
| 12 | CAT6 CABLE AS PER ACTUAL | 150.00 m |
| 13 | PANASONIC 55" TV | 1.00 pcs |
| 14 | CAMERA HOUSING STAND | 24.00 pcs |
| 15 | MICROTEK 2350 INVERTER | 1.00 pcs |
| 16 | EXIDE 150L BATTERY | 2.00 pcs |
| 17 | MICELENICE AND INSTALLATION | 1.00 pcs |

या कामासबंधी अधिक माहिती व नकाशा संस्थेच्या कार्यालयात वेळेत पहावयास मिळतील. कोणतीही निविदा मंजूर करणे अगर निविदा नामंजूर करणेचा सर्व हक्क व अधिकार संस्थेच्या संचालक मंडळाने राखून ठेवला आहे.

**टीप** : निविदासोबत कामाचे शासनमान्य प्रमाणपत्र, अनुभव दाखला, आयकर व जी.एस.टी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
दि. १७/०१/२०२६

सही/-
श्री. राजकुमार कलशेट्टी
(बी.ई. इलेक्ट्रिकल), कन्सल्टींग इंजिनियर

सही/-
कु.अंजली सिद्राम माशाळकर,
चेअरमन


## बार्शी पोलीस स्टेशनमधील बेवारस वाहनांचा मंगळवारी जाहीर लिलाव

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १७ जानेवारी-**

बार्शी शहर पोलीस ठाणे आवारात बेवारस वाहन जमा करण्यात आले आहे. सदर वाहनांचा लिलाव करण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली आहे. त्याबाबत तहसीलदार बार्शी यांची परवानगी मिळालेली आहे. बार्शी शहर पोलीस ठाणे येथील २८ बेवारस मोटासायकल वाहने यांचा जाहीर लिलाव मंगळवार दि. २० जानेवारी रोजी दुपारी १ वा. करण्यात येणार आहे. लिलावाची आलेली रक्कम ही शासनास जमा करण्यात येणार आहे. तरी इच्छुक व्यवसायिकांनी ब्ब्ब्ब बार्शी शहर पोलीस ठाणे येथे हजर रहावे. जाहीर लिलावाकरीता इच्छुक व्यावसायिक यांना अटी व शर्तीचे पालन करावे लागेल, असे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी सांगितले.


बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra
प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5

आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
Zonal Office, Agarwal Palace, First Floor, D Mart-Bharati Vidyapith Road, Opp. Patanjali Mall, Jule Solapur, Solapur - 413004.
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal sol@mahabank.co.in

नियम - ८ (१)
ताबा सूचना

याद्वारे बँक ऑफ महाराष्ट्रचा अधिकृत अधिकारी, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, २००२ अंतर्गत, आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ३ सह वाचलेल्या कलम १३ च्या उप-कलम (१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि जामीनदारांना सदर सूचना मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत संपूर्ण देय रक्कम परत करण्याची मागणी करणारी मागणी सूचना दिनांक १३/१०/२०२५ रोजी जारी केली होती.

कर्जदाराने रक्कम परत करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचित करण्यात येते की, मी, सदर कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट नियम, २००२ च्या नियम ८ अंतर्गत मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, दिनांक १४/०१/२०२६ रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला या मालमत्तांशी कोणताही व्यवहार न करण्याची ताकीद देण्यात येत आहे आणि मालमत्तांशी केलेला कोणताही व्यवहार बँक ऑफ महाराष्ट्रच्या वर नमूद केलेल्या रकमेच्या भाराच्या अधीन असेल.

सुरक्षित मालमत्ता सोडवण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात, कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे वेधले जाते.



| अ. क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| १ | **शाखा- जुळे सोलापूर**<br>**कर्जदार -**<br>**१.श्री. सचिन रविकुमार राठोड**<br>प्लॉट नं २५नवीन सर्व्हे नं २३/२बी/२/२.शाहिन हाऊसिंग सोसायटी राजस्व नगर नेहरू नगर जवळ सोलापूर ४१३००४<br>बी ६, खोली क्रमांक ५३ मरोळ पोलीस कॅम्प विजय नगर, अंधेरी पूर्व मुंबई ४०००५९<br>**२.श्री. रविकुमार निवृत्ती राठोड**<br>प्लॉट नं २५ नवीन सर्व्हे नं २३/ २बी/ २/२ शाहीन हाउसिंग सोसायटी राजस्व नगर, नेहरू नगर जवळ सोलापूर ४१३००४ | **गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन**<br>प्लॉट क्रमांक २५ जुना सर्वे क्रमांक ३५७/२बी/२/२, नवीन सर्वे क्रमांक २३/२बी/२/२ शाहीन गृहनिर्माण संस्था राजस्व नगर नेहरू नगर जवळ सोलापूर ४१३००४<br>**मालकीचे: श्री. सचिन रविकुमार राठोड आणि श्री. रविकुमार निवृत्ती राठोड**<br>**चतु:सीमा खालीलप्रमाणे: -**<br>पूर्व: प्लॉट क्रमांक २६<br>पश्चिम: प्लॉट क्रमांक २४<br>दक्षिण: एस. क्रमांक २३/२बी/२/३<br>उत्तर: ९ मीटर रस्ता<br>CERSI मालमत्ता आयडी २०००५१५६८४१५ | **मागणी सूचना:**<br>**दिनांक १३.१०.२०२५.**<br>**खाते शिल्लक:**<br>रु. १६,९९,६५५.00+ लागू न केलेले व्याज.<br>**एकूण: रु. १६,९९,६५५.00+ लागू न केलेले व्याज.**<br>**(सोळा लाख नव्याण्णव हजार सहाशे पंचावन्न रुपये फक्त)**<br>**सांकेतीक ताबा तारीख:**<br>**१४.०१.२०२६** |

ठिकाण: सोलापूर
दिनांक: १४.०१.२०२६

सही/-
मुख्य व्यवस्थापक आणि
अधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





## चला आयुष्य वाढवूया, फिटनेसकडे वळूया

**भाग - ३९**

### कमी गतीतून मोठी सहनशक्ती; म्यॅफीटोण मेथड

आजच्या धावपटूंच्या जगात वेग, अंतर आणि वेळ यांचा अतिरेक दिसतो. ''जास्त वेग म्हणजे जास्त प्रगती'' या गैरसमजामुळे अनेक खेळाडू ओव्हरट्रेनिंग, दुखापत आणि मानसिक थकव्याला सामोरे जातात. अशा परिस्थितीत प्रसिद्ध क्रीडा तज्ज्ञ डॉ. फिल मॅफेटोन यांनी विकसित केलेली माफेटोण मेथड (मॅफ मेथड) ही प्रशिक्षण पद्धत धावपटूंसाठी मार्गदर्शक ठरते.

मॅफ पद्धतीचा पाया म्हणजे शरीराची एरोबिक क्षमता वाढवणे. धावण्याची खरी ताकद ही फुफ्फुसांची व हृदयाची कार्यक्षमता आणि शरीराची ऊर्जा वापरण्याची पद्धत यावर अवलंबून असते. सतत जास्त तीव्रतेने ट्रेनिंग केल्यास शरीर साखरेवर अवलंबून राहते, तर मॅफ पद्धतीमुळे शरीर फॅटचा प्रभावी वापर करायला शिकते. यामुळे धावपटू दीर्घकाळ न थकता धावू शकतो. या पद्धतीत प्रत्येक व्यक्तीसाठी विशिष्ट हार्ट रेट ठरवली जाते, जिला मॅफ हार्ट रेट म्हणतात.

**मॅफ हार्ट रेट कशी काढायची?**
सूत्र: १८०-वय = मॅफ हार्ट रेट.
उदाहरण: वय = ३५ वर्षमॅफ एचआर = १८०-३५ = १४५ धावणे/व्यायाम १४५बीपीएम किंवा त्याखाली ठेवायचा.

**ॲडजस्टमेंट (महत्त्वाचे):**
आजार, दुखापत, जास्त थकवा - ५ बीपीएम नवशिके / ब्रेकनंतर सुरू करणारे १० बीपीएम अनेक वर्षे सातत्याने ट्रेनिंग, इजा नाही +५बीपीएम

**ट्रेनिंग कसे करायचे?**
१००% ट्रेनिंग मॅफ एचआर झोनमध्ये पेस हळू असेल, चालणेही लागू शकते (हे सामान्य आहे)रनिंग, सायकलिंग, वॉकिंग सर्वांसाठी वापरता येते.सुरुवातीला इगो बाजूला ठेवावा.

**मॅफ टेस्ट म्हणजे काय?**
ठराविक ट्रॅक/रस्त्यावर त्याच हार्ट रेटवर (मॅफ ) दर महिन्याला पेस चेक करणे. जर त्याच एचआरवर पेस सुधारत असेल = फिटनेस वाढतोय

**फायदे**
-ऐरोबीक क्षमता वाढते
-फॅट लॉस सुधारतो
-हार्मोनल बॅलन्स सुधारतो
- इजा आणि ओव्हरट्रेनिंग कमी
-अल्ट्रा / मॅरेथॉनसाठी उत्तम

**तोटे / मर्यादा**
-सुरुवातीला पेस खूप कमी वाटतो
-स्पीड ट्रेनिंग वेगळ्या टप्प्यावर करावे लागते
- संयम आवश्यक

**कोणासाठी योग्य?**
-मॅरेथॉन /अल्ट्रा रनर्स
-वजन कमी करायचे असेल
-वारंवार इजा होत असतील
-मजबूत बेस तयार करायचा असेल

थोडक्यात सांगायचं झाले तर मॅफ ट्रेनिंग सराव पद्धतीने कायम सराव ठेवल्यास प्रगती होते हळू हळू पेस सुधारणार होते त्या सह हृदय पण सदृढ बनते.

**- अतिश शहा**
फिटनेस ट्रेनर आणि अल्ट्रामॅरेथॉनर
चॅलेंजर स्पोर्ट्स फाउंडेशन, सोलापूर.
संपर्क - ९१७५८२८२०३

# वैभव सूर्यवंशीचा विश्वविक्रम

## १९ वर्षांखालील विश्वचषकात घडविला इतिहास



### सामन्यात पावसाचा व्यत्यय

◆ **बुलरावायो, १७ जानेवारी**

भारताचा १४ वर्षीय युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी याने शनिवारी १९ वर्षांखालील विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत बांगलादेशविरुद्ध खेळताना एका मोठ्या विक्रमाला गवसणी घातली. वैभवने केवळ ६७ चेंडूंमध्ये ७२ धावांची तुफानी खेळी केली, यात ६ चौकार आणि ३ षटकारांचा समावेश आहे. आपल्या नेहमीच्या आक्रमक शैलीत फलंदाजी करत वैभवने अवघ्या ३० चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले.

**विश्वचषकातील सर्वात तरुण अर्धशतकवीर**

१४ वर्षे २९६ दिवस वय असलेल्या वैभवने पुरुषांच्या १९ वर्षांखालील विश्वचषक सामन्यात ५० हून अधिक धावा करणारा सर्वात तरुण खेळाडू होण्याचा मान मिळवला आहे. यापूर्वी हा विक्रम अफगाणिस्तानच्या शाहिदुल्ला कमालच्या (१५ वर्षे १९ दिवस) नावावर होता. या यादीत पाकिस्तानचा बाबर आझम आता तिसऱ्या क्रमांकावर घसरला आहे.

**कोहलीचाही विक्रम मोडला**

वैभवने केवळ वयाचाच विक्रम मोडला नाही, तर यूथ वन-डे क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या भारतीय फलंदाजांच्या यादीत त्याने विराट कोहलीला मागे टाकले आहे. वैभवने २० सामन्यांत १,०४७ धावा केल्या आहेत, तर कोहलीने २८ सामन्यांत ९७८ धावा केल्या होत्या. भारताकडून या यादीत विजय झोल (१,४०४ धावा) अव्वल स्थानावर आहे, तर जागतिक स्तरावर बांगलादेशचा नजमुल हुसेन शांतो (१,८२० धावा) अव्वल क्रमांकावर आहे

◀(वृत्तसंस्था)

**१९ वर्षांखालील विश्वचषकांत सर्वांत कमी वयात ५० पेक्षा अधिक धावा करणारे खेळाडू**

- वैभव सूर्यवंशी (भारत) : १४ वर्षे २९६ दिवस ( विरुद्ध बांगलादेश, २०२६)
- शाहिदुल्ला कमाल (अफगाणिस्तान) : १५ वर्षे १९ दिवस (विरुद्ध विंडीज , २०२४)
- बाबर आझम (पाकिस्तान) : १५ वर्षे ९२ दिवस (विरुद्ध विंडीज, २०१०)

**भारतीय कर्णधाराने हस्तांदोलन टाळले**

सामन्यापूर्वी दोन्ही संघांमधील तणावपूर्ण संबंधांची झलक पाहायला मिळाली. भारतीय कर्णधार आयुष म्हात्रे आणि बांगलादेशचा अझीझुल हकीम तमीम यांनी सामन्यापूर्वीची पारंपारिक हस्तांदोलन टाळले. दुसरीकडे, नाणेफेकीच्या वेळीही आश्चर्यकारक बदल पाहायला मिळाला. अजीझुल हकीम अंतिम अकरामध्ये असूनही नाणेफेकीसाठी उपकर्णधार झवाद अबरार मैदानात आला. पावसाच्या व्यत्ययानंतर झालेल्या नाणेफेकीत अबरारने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. बुलावायोच्या खेळपट्टीवरील ओलावा लक्षात घेऊन त्याने हा निर्णय घेतल्याचे सांगितले. ■

# मेग लॅनिंग, फोबी, शिखाच्या खेळीमुळे यूपी वॉरियर्सचा सलग दुसरा विजय

### महिला प्रीमियर लीग

◆ **मुंबई, १७ जानेवारी**

डी. वाय. पाटील स्टेडियमवर शनिवारी खेळल्या गेलेल्या महिला प्रीमियर लीग क्रिकेट सामन्यात कर्णधार मेग लॅनिंग आणि फोबी लिचफिल्ड यांच्यातील ११९ धावांच्या भागीदारीमुळे यूपी वॉरियर्सने मुंबई इंडियन्सविरुद्ध सलग दुसरा विजय मिळवला. यूपीने मुंबईवर २२ धावांनी मात केली. हंगामाची सुरुवात सलग तीन पराभवांनी झाल्यानंतर यूपी वॉरियर्सने आपली विजयी घोडदौड कायम राखली.

प्रथम फलंदाजी करताना यूपीच्या मेग लॅनिंग व लिचफिल्डने अर्धशतके झळकावली, त्यानंतर मुंबई इंडियन्सने त्यांना १८७/८ धावांवर रोखले. तथापि, फलंदाजीच्या क्रमात केलेल्या बदलामुळे मुंबई इंडियन्सचा संघ लक्ष्याचा पाठलाग करताना अपयशी ठरला. मुंबईच्या संघाला २० षटकांत ६ बाद १६५ धावांपर्यंतच मजल मारता आली.

गतविजेत्या संघाला नवी मुंबईतील आपल्या शेवटच्या सामन्यात हंगामातील तिसऱ्या पराभवाला सामोरे जावे लागले.

यूपी वॉरियर्स हा महिला प्रीमियर लीगमध्ये मुंबई इंडियन्सवर साखळी फेरीत सलग दोन विजय मिळवणारा दुसरा संघ ठरला. गत वर्षी दिल्ली कॅपिटल्सने हा पराक्रम केला होता, त्यावेळीही दिल्ली संघाचे नेतृत्व मेग लॅनिंगनेच केले होते. मुंबई इंडियन्सकडून अमेलिया केरने नाबाद ४९ धावांची खेळी केली, परंतु संएघाला विजय मिळवून देण्यास पुरेशी ठरली नाही. यूपी वॉरियर्सकडून क्रांती गौड, शिखा पांडे, सोफी एक्लेस्टोन, दीप्ती शर्मा व क्लो ट्रायोनने प्रभावी मारा केला.

◀(वृत्तसंस्था)



**सामनावीर मेग लॅनिंग**
**४५ चेंडूंत ७० धावा**

# वेन मॅडसेन इटली टी-२० विश्वचषक संघाचा कर्णधार

◆ **नवी दिल्ली, १७ जानेवारी**



अनुभवी फलंदाज वेन मॅडसेन ७ फेब्रुवारी ते ८ मार्च दरम्यान भारत आणि श्रीलंकेत होणाऱ्या पुरुष टी-२० विश्वचषकात इटली क्रिकेट संघाचे नेतृत्व करणार आहे.

इटालियन क्रिकेट महासंघाने यापूर्वीच मॅडसेन याची संघाचा कर्णधार म्हणून पुष्टी केली होती. मॅडसेन हा काऊंटी क्रिकेटमध्ये डर्बीशायरकडून खेळतो आणि इटालियन पासपोर्ट धारक आहे.

माजी ऑस्ट्रेलियन खेळाडू जो बर्न्सला समस्यांमुळे स्पर्धेच्या संघातून वगळण्यात आले होते. माजी दक्षिण आफ्रिकेचा फलंदाज जॉन-जॉन स्मट्सचाही इटलीच्या संघात समावेश करण्यात आला आहे. स्मट्सने २०१७ ते २०२१ दरम्यान दक्षिण आफ्रिकेसाठी सहा एकदिवसीय आणि १३ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत आणि तो त्याच्या पत्नीमुळे इटलीकडून खेळण्यास पात्र ठरला आहे. वेगवान गोलंदाज अष्टपैलू ग्रॅण्ट स्टुअर्ट सुद्धा इटलीकडून खेळेल.

इटलीचा संघ ९ फेब्रुवारी रोजी कोलकाता येथील ईडन गार्डन्सवर बांगलादेशविरुद्ध गट क च्या सामन्याने टी-२० विश्वचषकात पदार्पण करेल, त्यानंतर तीन दिवसांनी मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर नेपाळचा सामना करेल. इटली १६ फेब्रुवारी रोजी कोलकाता येथे २०१० च्या इंग्लंड संघाचा सामना करेल, त्यानंतर १९ फेब्रुवारी रोजी त्याच मैदानावर दोन वेळच्या विजेत्या वेस्ट इंडीजचा सामना करेल.

२०२५ च्या युरोप प्रादेशिक अंतिम फेरीत उपविजेता ठरल्यानंतर इटलीने आपल्या पहिल्या आयसीसी स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. इटली संघाला जॉन डेव्हिसन (कॅनडा), केविन ओब्रायन (आयर्लण्ड) आणि डग्लस ब्राउन (स्कॉटलंड) सहाय्यक प्रशिक्षक म्हणून मार्गदर्शन करतील.

**इटली संघः** वेन मॅडसेन (कर्णधार), मार्कस कॅम्पोपियानो (यष्टिरक्षक), जियान पिएरो मीड, झैन अली, अली हसन, क्रिशन जॉर्ज, हॅरी मॅनेन्टी, ॲन्थनी मोस्का, जस्टिन मोस्का, सय्यद नक्वी, बेंजामिन मानेंटी, जसप्रीत सिंग, जेजे स्मट्स, ग्रॅण्ट स्टीवार आणि ग्रॅण्टस्वार.

◀(वृत्तसंस्था)

# भारत मालिका विजयाची परंपरा कायम राखणार

### न्यूझीलंड पहिली मालिका जिंकण्यास उत्सुक

◆ **इंदूर, १७ जानेवारी**

रविवारी अहिल्यादेवी होळकर स्टेडियमवर भारत आणि न्यूझीलंड यांच्यादरम्यान निर्णायक तिसरा एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना खेळला जाणार आहे. सध्या तीन सामन्यांची वन-डे मालिका १-१ अशी बरोबरीत आहे. अशा परिस्थितीत भारत घरच्या मैदानावर मालिका विजयाची परंपरा कायम राखण्यास, तर पाहुणा न्यूझीलंड आपली पहिला मालिका विजय नोंदविण्यास उत्सुक आहे. एकंदरीत भारतीय संघाच्या घरच्या मैदानावरच्या वर्चस्वाची कसोटी लागणार आहे.

मार्च २०१९ पासून भारताने घरच्या मैदानावर कोणतीही द्विपक्षीय एकदिवसीय मालिका गमावलेली नाही. तेव्हा ऑस्ट्रेलियाने ०-२ अशी पिछाडी भरून काढत दिल्लीतील निर्णायक सामन्यासह ३-२ ने मालिका जिंकली होती. पण तो इतिहास आता धोक्यात आला आहे.

न्यूझीलंडसाठीही परिस्थिती तितकीच रोमांचक आहे. न्यूझीलंड संघाने १९८९ पासून द्विपक्षीय एकदिवसीय सामन्यांसाठी भारताचा दौरा केला आहे, परंतु त्यांनी भारतात कधीही मालिका जिंकलेली नाही आणि ही त्यांची ही प्रतीक्षा संपवण्याची कदाचित सर्वोत्तम संधी आहे.

भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांना त्यांच्या कार्यकाळात अनेक नकोसे विक्रम झाल्यानंतर घरच्या मैदानावर आणखी एक पराभव पत्करावासा वाटणार नाही. गंभीर यांच्या नेतृत्वाखाली भारताने घरच्या मैदानावर पाच कसोटी सामने गमावले, तसेच श्रीलंकेत पहिल्यांदाच एकदिवसीय मालिका गमावली.

राजकोटमधील दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात न्यूझीलंडने नियंत्रण मिळवित भारतावर सहज विजय नोंदविला. डॅरिल मिचेलचे आक्रमक नाबाद शतक विजयासाठी महत्त्वपूर्ण ठरले, यावेळी भारतीय गोलंदाज सपशेल अपयशी ठरले.

इंदूर येथील मैदानाच्या सीमा लहान आहे व या खेळपट्टीवर गोलंदाजांना फार कमी मदत मिळते. फिरकी गोलंदाजीला सामोरे जाण्याच्या भारताच्या क्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. संघात खोलवर फलंदाजी व ताकद असूनही फिरकी गोलंदाजीविरुद्ध संघाला अस्वस्थता जाणवत आहे.

ज्या मैदानावर धावसंख्या ३५० च्या पुढे सहज जाऊ शकते, अशा मैदानावर ही शांत षटके सामन्याची गती निर्णायकपणे बदलू शकतात.

**रोहित शर्माच्या कामगिरीवर लक्ष**

या मालिकेत वाईट फॉर्मशी संघर्ष करीत असलेल्या रोहित शर्मावर सर्वांचे लक्ष असेल. डावाच्या सुरुवातीला त्याचा अत्यंत आक्रमक दृष्टिकोन हे भारताच्या अलीकडील एकदिवसीय क्रिकेटच्या विचारसरणीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य राहिले आहे, परंतु वारंवार लवकर बाद झाल्यामुळे त्याच्यावर थोडा दबाव वाढला आहे.

दरम्यान, विराट कोहली हा भारताच्या वन-डे फलंदाजीचा केंद्रबिंदू आहे. वरिष्ठ खेळाडूंसाठी भारताची पुढील ५० षटकांची स्पर्धा जुलैमध्ये इंग्लंड दौऱ्यावर होण्याची शक्यता असल्याने, चाहते आणखी एका रो-को शोची आशा बाळगून आहेत.



शुभमन गिल



मायकेल बेसवेल

**भारत वि. न्यूझीलंड तिसरा वन-डे सामना आज**
**स्थळ : अहिल्यादेवी होळकर स्टेडियम, इंदूर**
**वेळ : दुपारी १.३० वाजतापासून । थेट प्रसारण : स्टार स्पोर्ट्सवर**

**नितीश की, आयुष ?**

नितीश कुमार रेड्डी आणि आयुष बडोनी यांच्यातील निवड संघ व्यवस्थापनासाठी एक डोकेदुखी आहे.रेड्डी वेगवान गोलंदाजीचा एक अतिरिक्त पर्याय देतो व त्याच्यात मोठे फटके मारण्याची क्षमता आहे, तर आयुष फिरकीविरुद्ध अधिक जबरदस्त फलंदाजी व मधल्या षटकांमध्ये संयम राखण्याची क्षमता देतो. डावखुरा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगला संघात स्थान देण्याची शक्यता आहे. नवीन चेंडू स्विंग करण्याची, स्टम्पवर मारा करण्याची व डेथ षटकांमध्ये यॉर्कर टाकण्याची अर्शदीपची क्षमता भारताला बळ देते.

मोहम्मद सिराजची नवीन चेंडूने गोलंदाजी करण्याची भूमिका पाहता त्याला वगळणे कठीण आहे.

केएल राहुलचे स्थान निश्चित आहे व तो पाचव्या क्रमांकावर चांगली कामगिरी करतो व त्याला त्याच स्थानावर ठेवणे महत्त्वाचे आहे.

मायकेल ब्रेसवेलच्या नेतृत्वाखालील न्यूझीलंड संघात प्रचंड आत्मविश्वास आणि स्पष्टता आहे. डेव्हॉन कॉनवेच्या पाठिंब्याने, मिचेलच्या वर्चस्वाने न्यूझीलंड संघात प्रतिस्पर्ध्यानुसार रणनीती अंमलात आणण्याची क्षमता आहे. न्यूझीलंडने आपल्या गोलंदाजीतील वैविध्य व हार्ड लेंथचा प्रभावीपणे वापर केला आहे.

शुभमन गिल आणि त्याच्या संघासाठी आव्हान केवळ मालिका जिंकणे हे नाही, तर डावपेचांमधील लवचिकता आणि परिस्थितीचे भान दाखवणे हे आहे. ◀(वृत्तसंस्था)

# खाशाबांची १०१ चित्रे रेखाटून अनोखी मानवंदना

### पुण्यात राज्य क्रीडा दिन उत्साहात साजरा

◆ **पुणे, १७ जानेवारी**

पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व लोकसेवा इंग्लिश मीडियम स्कूल आयोजित उपक्रमात ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव यांची १०१ चित्रे रेखाटून राज्य क्रीडा दिनानिमित्त त्यांना अनोखी मानवंदना देण्यात आली.

पाषाण येथील लोकसेवा ई स्कूलमध्ये खाशाबा जाधव यांच्या १०१ जयंती निमित्त १०१ विद्यार्थीनी एकाच वेळी त्यांची १०१ चित्रे साकरली. याप्रसंगी पॅरा ऑलिम्पिक रौप्य पदक विजेता सचिन खिलारी, लोकसेवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष दीपक पायगुडे, प्रा. संजय दुधाणे, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, प्राचार्य पी. एच. षाफीमोन, क्रीडा अधिकारी दादासाहेब देवकाते आदी मान्यवर उपस्थित होते.

खाशाबा जाधव यांचे विद्यार्थ्यांनी काढलेल्या रंगीत तैलचित्राचे पूजन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. खाशाबांची सर्वात्तम चित्रे साकारणाऱ्या १० विद्यार्थीना स्मृतिचिन्ह देऊन तर १०१ बाल चित्रकारांचा खाशाबांचे चरित्र पुस्तक भेट देऊन सचिन खिलारी यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कला शिक्षिक शंकर साळुंखे, शुभांगी कुलकर्णी, स्वाती पवार, शितल लाडवते यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

आदर्श असणाऱ्या खाशबा जाधव यांचा वारसादार मी झालोय असे सचिन खिलारी म्हणाले. खाशाबांना पदकानंतर ४ वर्षांनी शासकीय नोकरी मिळाली होती. मला पदक जिंकताच चार दिवसात नोकरी मिळाली. शासन सुविधा देत असल्याने महाराष्ट्रात आता खाशाबांसारखे खेळाडू निर्माण होत आहे. प्रबळ इच्छाशक्ती आणि कष्ट करण्याची जिद्द असेल तर आपल्या देशाला ऑलिम्पिकमध्ये नक्कीच पदके मिळतील असा विश्वासही खिलारी यांनी व्यक्त केला.

◀(तभा वृत्तसेवा)

### ५७ वी फिट इंडिया संडे ऑन सायकल हैदराबादमध्ये

**हैदराबाद** : युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाच्या अंतर्गत फिट इंडिया चळवळीच्या वतीने, भारत सरकारच्या तंदुरुस्तीला जनआंदोलन म्हणून प्रोत्साहन देण्याच्या सुरू असलेल्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून, रविवार, १८ जानेवारी रोजी अनेक शहरांमध्ये फिट इंडिया संडे ऑन सायकल च्या ५७ व्या पर्वाचे आयोजन केले जाईल. ■



भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील तिसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यापूर्वी मध्य प्रदेशच्या इंदूर येथील होळकर क्रिकेट स्टेडियमवर सराव सत्रादरम्यान भारताचा विराट कोहली (डावीकडे) आणि कुलदीप यादव

# सौराष्ट्र, विदर्भ यांच्यात तुल्यबळ लढत

## विजय हजारे चषक अंतिम सामना

◆ **बंगळुरू, १७ जानेवारी**

येथे रविवारी बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्सच्या मैदानावर, एकमेकांना कडवी टक्कर देणारे सौराष्ट्र व विदर्भ अनुक्रमे तिसऱ्या आणि पहिल्या विजय हजारे चषक विजेतेपदासाठी आमने-सामने येत आहे. त्यामुळे ही एक रोमांचक व तुल्यबळ लढत होणे अपेक्षित आहे.

पूर्वीच्या तुलनेत, सौराष्ट्र व विदर्भ या दोन्ही संघांमध्ये कोणताही स्टार खेळाडू नाही, परंतु त्यांचे फलंदाज आणि गोलंदाजांनी या स्पर्धेत आतापर्यंत एका उत्तम चाललेल्या यंत्राप्रमाणे कामगिरी केली आहे, ज्यामुळे त्यांना अंतिम फेरीच्या मार्गावर काही बलाढ्य संघांना पराभूत करण्यात यश आले आहे.

सौराष्ट्र संघाचा कर्णधार हार्विक देसाई ५६१ धावांसह संघाचा सर्वाधिक धावा करणारा खेळाडू आहे व विश्वराज जडेजाने पंजाबविरुद्धच्या उपांत्य सामन्यात धडाकेबाज शतक ठोकून संघाला विजय मिळवून दिला.

दुसरीकडे, विदर्भाच्या फलंदाजीला अमन मोखाडे व ध्रुव शोरीने आधार दिला. स्पर्धेत सर्वाधिक मोखाडे ७८१ धावा करणारा खेळाडू, तर शोरी ५१५ धावा करणारा खेळाडू आहे. कर्नाटकविरुद्धच्या उपांत्य सामन्यात सलामीवीर मोखाडेचे शतक हे डाव उभारणी व दडपणाशिवाय धावांचा पाठलाग करण्याच्या कौशल्याचे उत्तम उदाहरण आहे. रविकुमार समर्थनेही मधल्या फळीत काही उपयुक्त योगदान दिले असून त्याने एकूण ४२७ धावा केल्या आहेत.



हर्ष दुबे



हार्विक देसाई

फलंदाजीच्या बाबतीत या दोन संघांमध्ये फारसा फरक नाही आणि गोलंदाजीच्या बाबतीतही अशीच परिस्थिती आहे.

वेगवान गोलंदाज अंकुर पनवार (२१) व चेतन साकरियाने (१५) सौराष्ट्रचा नवीन चेंडूवरील मारा प्रभावी ठेवला आहे.

विदर्भ या स्पर्धेत नचिकेत भुते (१५) व यश ठाकूर (१५) यांच्यावर अवलंबून आहे आणि अंतिम सामन्यातही या युवा वेगवान गोलंदाजांकडून अशाच कामगिरीची त्यांना आशा असेल. दर्शन नळकांडे (१२) सुद्धा विदर्भाला मधल्या व अखेरच्या षटकांमध्ये एक विश्वसनीय वेगवान गोलंदाजीचा पर्याय देतो. त्याने उपांत्य सामन्यात अखेरच्या टप्प्यात कर्नाटकला नामोहरम केले. विदर्भाचा युवा कर्णधार आणि डावखुरा फिरकीपटू हर्ष दुबेची फलंदाजांना आवर घालण्याची क्षमता उपयोगी पडू शकते.

◀(वृत्तसंस्था)

### फेडरर, अगासीने केले प्रेक्षकांचे मनोरंजन

**मेलबर्न** : ऑस्ट्रेलियन ओपन टेनिस स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यादरम्यान शनिवारी रात्री रॉजर फेडरर, आंद्रे अगासी, लेटन हेविट, पॅट्रिक राफ्टर आणि ॲशले बार्टीने एका रोमांचक प्रदर्शनीय दुहेरी सामन्याने प्रेक्षकांचे मनोरंजन केले आणि संपूर्ण वेळ हसत खेळत सामना खेळला. टेनिसप्रेमींनी फेडररचे जोरदार स्वागत केले. त्याने मायक्रोफोन हातात घेऊन प्रेक्षकांना अशा प्रकारे अभिवादन केले, जणू काही तो कधी दूर गेलाच नव्हता. मला तुमची आठवण येत होती आणि परत येऊन खूप छान वाटत आहे. आम्ही जिथे थांबलो होतो, तिथूनच सुरुवात झाली आहे, खूप आठवणी आहेत आणि पुन्हा त्यात रमून जाणे छान वाटत आहे, असे तो म्हणाला. फेडररने बॅटल ऑफ द वर्ल्ड नंबर १ या विशेष सामन्यात ग्रॅण्ड स्लॅमच्या उद्घाटन सोहळ्यात भाग घेतला.

# हरयाणा थंडर्सचा पंजाब रॉयल्सवर विजय

### प्रो रेसलिंग लीग

◆ **नोएडा, १७ जानेवारी**

हरयाणा थंडर्सने प्रो-रेसलिंग लीगमध्ये आपल्या पदार्पणातच एक दमदार छाप सोडली, त्यांनी नोएडा इनडोअर स्टेडियमवर झालेल्या पहिल्याच सामन्यात पंजाब रॉयल्सचा ७-२ अशा मोठ्या फरकाने पराभव केला.

सर्व वजन गटांमध्ये आपले वर्चस्व दाखवत, हरयाणा थंडर्सने सुरुवातीपासूनच सामन्यावर नियंत्रण मिळवले आणि ते शेवटपर्यंत कायम ठेवले. त्यांनी अचूक रणनीती आणि सातत्यपूर्ण गुणांची कमाई करत विजेतेपदाच्या दिशेने आगेकूच केली. पंजाब रॉयल्सला सामन्यात लय मिळवणे कठीण झाले, कारण हरयाणाच्या कुस्तीपटूंनी सुरुवातीपासून शेवटपर्यंत सामन्याची गती आणि दिशा नियंत्रित केली.

पुरुषांच्या ८६ किलो गटातील पहिल्या सामन्यात अशिरोव अशरफने तारिएल जीला ६-५ ने पराभूत केले. पंजाबने चंद्रमोहनच्या माध्यमातून प्रत्युत्तर दिले. चंद्रमोहनने पुरुषांच्या ७४ किलो गटात परविंदरला १३-६ ने हरवले, तरी हरयाणाने लवकरच पुन्हा नियंत्रण मिळवले आणि मागे वळून पाहिले नाही. महिलांच्या ५७ किलो गटात नेहा सांगवानने पंजाबची कर्णधार रोक्साना झासिनावर ८-० असा निर्दोष विजय मिळवला आणि तिला योग्यरित्या प्लेअर ऑफ द मॅच म्हणून गौरवण्यात आले.

◀(वृत्तसंस्था)



हरयाणा व पंजाबदरम्यानच्या कुस्ती लढतीतील एक क्षण

**इरिना कोलियोडेन्कोची ॲनावर मात**

इरिना कोलियाडेन्कोने महिलांच्या ६२ किलो गटात ॲना गोडिनेझवर १५-२ असा मोठा विजय मिळवला व सामन्याची गती पूर्णपणे हरयाणाच्या बाजूने वळविली. त्यानंतर पुरुषांच्या ५७ किलो गटात अंकुशने चिरागविरुद्ध ५-२ असा विजय मिळवला. त्यानंतर तुमूर तुल्गाने पुरुषांच्या ६५ किलो गटात इस्लाम गुसेनोवला १५-० ने पराभूत करून हरयाणाची आघाडी आणखी वाढवली. महिलांच्या ७६ किलो वजनी गटातील लढत काजल आणि प्रिया मलिक यांच्यात २-२ अशी अटीतटीच्या बरोबरीत संपली, परंतु महिलांच्या ५३ किलो गटात युई सुसाकीने हंसिका लांबाविरुद्ध पुढे चाल मिळाल्याने पंजाबच्या उशिरा पुनरागमनाच्या सर्व आशा संपुष्टात आल्या. पंजाब रॉयल्सवर या दमदार विजयासह, हरयाणा थंडर्सने २०२६ मोहिमेची शानदार सुरुवात केली. ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### जळोलीच्या जिल्हा परिषद शाळेस संगणक, झेरॉक्स मशीन भेट

**करकंब, दि. १७ जानेवारी-**

जळोली जिल्हा परिषद प्राथमिक शाळेय शिक्षक बाळासाहेब खांडेकर यांच्या प्रयत्नातून अकलूज येथील प्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ डॉ. राजीव गांधी यांनी विद्यार्थ्यांसाठी एक संगणक भेट दिला. तर हृदयरोग तज्ञ डॉ.निनाद फडे यांनीही शाळेसाठी एक झेरॉक्स मशीन भेट देत अनमोल योगदान दिले. पुढील काळात शाळेची पटसंख्या जास्तीत जास्त वाढली पाहिजे यासाठी प्रयत्न असणार असून पालकांनीही यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन शिक्षकांनी केले. डॉ. गांधी यांनी डोळ्यांसबंधी होणाऱ्या आजाराविषयी माहिती देत डोळ्यांविषयी काळजी कशी घ्यावी याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी मुख्याध्यापक जयवंत कापसे, शिक्षक ज्ञानेश्वर दुधाणे,नागनाथ गायकवाड,सिध्देश्वर लोंढे, कैलास नरसाळे, बाळासाहेब खांडेकर, शिक्षिका देवकी कलढोणे (दुधाणे) यांनी डॉ. गांधी यांचे आभार मानले.



### पंढरीत श्रीविठ्ठल रखुमाई परिवर्तन दिनानिमित्त लाडू वाटप

**पंढरपूर, दि.१७ जानेवारी -**

श्रीविठ्ठल रूक्मिणी मंदिराला १४ जानेवारी २०१४ ला कायदेशीर मार्गाने मुक्ती मिळाली. वारकरी लोकांच्या ताब्यात श्रीविठ्ठल मंदिर आले याचा आनंद आहे, त्याची आठवण म्हणून श्रीविठ्ठल रूखमाई आंदोलनाच्या माध्यमातून कार्यक्रम घेण्यात येत आहेत असे प्रतिपादन ह.भ.प.डॉ.सुहास महाराज फडतरे यांनी केले. श्रीविठ्ठल रूक्मिणी मंदिरासमोर संत नामदेव पायरी याठिकाणी श्रीविठ्ठल रूखुमाई मुक्तीदिन साजरा करण्यात आला. दरम्यान सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास भजन करीत श्रीविठ्ठल रूक्मिणीमातेचे दर्शन घेत संत नामदेव पायरी येथे आरती करण्यात आली. आरतीनंतर याठिकाणी लाडू प्रसाद वाटप करण्यात आला. श्रीविठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीने पहिल्यांदा हा दिवस परिवर्तन दिवस म्हणून साजरा केला. मात्र, दुसऱ्या वर्षी ही परंपरा खंडीत झाल्याचे सांगत यंदा हा दिवस केल्याचे श्रमिक मुक्ती दलाचे जिल्हाध्यक्ष मोहन अनपट यांनी सांगितले. यावेळी श्रीविठ्ठल रूखुमाई मुक्तीदिन साजरा करते वेळी संभाजी ब्रिगेडचे राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य किरण घाडगे, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब बागल, श्रमिक मुक्ती दलाचे जिल्हाध्यक्ष मोहन अनपट, विवेक पाटील, भगवान महाराज बागल, संदीप मांडवे, सुधाकर कवडे, शेखर आटकळे, स्वप्निल गायकवाड, गोरख बागल, छगन कांबळे, महादेव सावंत, तुकाराम जाधव, हेमंत देवकर, शिवाजी रेडे, किरण कत्रे, आकाश मांडवे आदी उपस्थित होते.

### चोपडी जिल्हा परिषद गटातून एक अर्ज दाखल

**सांगोला, दि. १७ जानेवारी -**

शुक्रवार दि.१६ जानेवारी पासून सांगोला तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीचे नामनिर्देशन सुरु झाले आहे. शनिवार दि.१७ जानेवारी रोजी चोपडी जिल्हा परिषद गटामधुन १ अर्ज प्राप्त झाला आहे अशी माहिती जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या सहा.निवडणूक निर्णय अधिकारी बाळूताई भागवत यांनी दिली.

# माळशिरस तालुक्यात उमेदवार निवडीसाठी हालचालींना वेग

## अकलूजच्या शिवरत्न, मांडवेच्या श्रीराम व वेळापूरच्या गरुड बंगल्यावर वाढली वर्दळ

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १७ जानेवारी-**

माळशिरस तालुक्यात होणाऱ्या आगामी जिल्हा परिषदेच्या ९ गटासाठी व पंचायत समितीच्या १८ गणांच्या उमेदवार निवडीसाठी सध्या तालुक्यात जोरदार हालचाली सुरू आहेत. निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर हालचालींनी वेग घेतला आहे. तालुक्यात निवडणूक दुरंगी होणार का तिरंगी याकडे लक्ष लागले आहे.







राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट व भाजपा ( महायुती ) आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या सुद्धा हालचाली सुरु आहेत. तर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट व अजित पवार गट एकत्र निवडणूका लढणार असल्याची सुद्धा कुजबुज सुरु आहे. सध्या शिवरत्न बंगलयावरुनच माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहीते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली खा.धैर्यशील मोहीते पाटील, जयसिंह मोहीते पाटील, अर्जुनसिह मोहीते पाटील उमेदवार निवडीची चाचपणी करीत आहेत. तर भाजपच्या वतीने माजी आमदार राम सातपुते हे पदाधिकाऱ्यांसमवेत जिल्हा परिषद व पंचायत समीतीसाठी उमेदवार निवडीची चाचपणी करीत आहेत.

या अगोदर त्यांनी जिल्हा परिषद गट व पंचायत समीती गणातील प्रत्येक गावातील कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यां बरोबर सविस्तर चर्चा केली आहे. तर माळशिरस तालुक्याचे विद्यमान आमदार उत्तमराव जानकर हे आपल्या वेळापूर येथील गरुड बंगलयावरुनच उमेदवार निवडीची प्रक्रीया राबवित आहेत. मोहीते पाटील व आमदार उत्तमराव जानकर गटाची आगामी जिल्ह्य परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी युती होणार असल्याची तालुक्यात चर्चा आहे.

पण उमेदवारी दाखल झाल्यानंतरच याबाबत अंतीम चित्र स्पष्ट होणार आहे. तर अकलूज येथील प्रतापगडावर अजित पवार गटाचे डॉ. धवलसिह मोहिते-पाटील, ज्येष्ठ नेते के. के. पाटील, सोमनाथ वाघमोडे, अतुल सरतापे यांच्याही उमेदवार निवडीसाठी जोरदार हालचाली सुरु आहेत. यामुळे तालुक्यात जिल्हापरिषद निवडणुकीत तिरंगी लढतीत २७ उमेदवार उभे राहण्याची शक्यता आहे. तर पंचायत समितीला ५४ आणि अपक्ष असे उमेदवार उभे राहण्याची शक्यता आहे.

या तिन्ही गटाकडून तसेच अपक्ष उमेदवार सुद्धा या निवडणुकीत मोठ्या संख्येने उभे राहण्याची शक्यता आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख २१ जानेवारी आहे. तर माघार २७ तारखेला आहे. त्यानंतरच चित्र स्पष्ट होईल. तालुक्यात सध्या भाजपमध्ये जोरदार इनकमिंग सुरू आहे. यामुळे तालुक्यात भाजप जोरदार तयारीनिशी निवडणुकीत उतरणार असे चित्र आहे.

# कारीमध्ये सुवासिनी अन् विधवा भगिनींचा एकत्र 'हळदी-कुंकू' सोहळा

## 'एकता महिला मंचा'कडून जुन्या रुढींना मूठमाती; पुरोगामी विचारांचा जागर

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १७ जानेवारी-**

ग्रामीण भागात आजही सण-उत्सवांच्या बाबतीत अनेक जुन्या रूढी-परंपरांचे जोखड पाहायला मिळते. मात्र, सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील 'कारी' येथे 'एकता महिला मंचा'ने या परंपरांना छेद देत एक ऐतिहासिक सामाजिक क्रांती घडवून आणली आहे. मकर संक्रांतीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या अनोख्या 'हळदी-कुंकू' सोहळ्यात सुवासिनी आणि विधवा भगिनींनी एकत्र येत सामाजिक समतेचा नवा आदर्श समाजासमोर ठेवला आहे.

**'मी विधवा नव्हे, मी स्त्री!' - एका नव्या जाणिवांचा उदय**

सामान्यतः हळदी-कुंकवाच्या मंगल कार्यात विधवा महिलांना डावलण्याची अनिष्ट प्रथा आजही अनेक ठिकाणी पाळली जाते. मात्र, स्त्री ही केवळ स्त्री असते, तिच्या वैयक्तिक आयुष्यातील परिस्थितीवरून तिचा सन्मान ठरवू नये हा पुरोगामी विचार घेऊन एकता महिला मंचाने ही भिंत पाडून टाकली. 'मी विरंगुळा' आणि 'मी विधवा नव्हे, मी स्त्री' या संकल्पनेतून १६ आणि १७ जानेवारी २०२६ रोजी पार पडलेल्या या सोहळ्यात दोन्ही घटकांतील महिलांनी एकमेकींना तिळगुळ देऊन आणि हळदी-कुंकू लावून उत्सवाचा आनंद द्विगुणित केला.



**परिवर्तनाची 'मशाल' पेटवणारे हात**

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी एकता महिला मंचाच्या प्रमिला जाधव, प्रतिभा जगदाळे, स्वाती जोगदंडकर, सुवर्णा व्हटकर, स्वाती व्हटकर, कलीम मुलाणी, अंजुम सय्यद, मुस्कान मुलाणी, प्रियंका शिंदे, ताहीरा मुलाणी, साजिदा मुलाणी, डॉ. रेश्मा डोके, मुख्याध्यापिका हिराबाई क्षीरसागर यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रमिला जाधव यांनी सूत्रसंचालन केले. स्वाती जोगदंडकर यांनी आभार मानले. जुनाट परंपरांना आळा घालून महिलांमध्ये जनजागृती करण्यासाठीच हा मंच सदैव कार्यरत राहील, असा विश्वास प्रभाकर क्षीरसागर यांनी व्यक्त केला.

**खेळ, स्पर्धा आणि सेल्फीचा जल्लोष**

दैनंदिन घरगुती कामातून महिलांना विरंगुळा मिळावा, यासाठी विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते. संगीत खुर्ची आणि उखाणे स्पर्धा यामध्ये महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विशेष आकर्षण असलेल्या 'सेल्फी पॉईंट'वर फोटो काढण्यासाठी तरुणींपासून ते ज्येष्ठ महिलांपर्यंत सर्वांचीच झुंबड उडाली होती.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पांगरी ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. विश्वरूपी यादव, पांगरी पोलीस स्टेशनच्या पोलीस कॉन्स्टेबल सोनियादेवी मुंडे, महिला पोलीस कॉन्स्टेबल फपाळ, सरपंच नीलम कदम, उपसरपंच खासेराव विधाते, सिस्टर वाघमारे, सामाजिक कार्यकर्ते रिजवान सय्यद आणि एकता महिला मंचाचे प्रमुख प्रभाकर क्षीरसागर उपस्थित होते. महिलांनी आरोग्याकडे लक्ष देणे ही काळाची गरज आहे. अशा उपक्रमांमुळे महिलांमध्ये सामाजिक बांधिलकी आणि आत्मविश्वास निर्माण होतो, असे मार्गदर्शन वैद्यकीय अधिकारी डॉ. यादव यांनी केले. तर सोनियादेवी मुंडे यांनी महिलांना कायदेशीर हक्कांची माहिती दिली.

### होस बेळकु हा कन्नड गीतांचा कार्यक्रम आज सोलापुरात

**सोलापूर, दि.१७ जानेवारी-**



श्री सिद्धरामेश्वर यात्रेनिमीत्त सोलापुरातील खास कन्नड़ रसिकासाठी सदाबहार स्टुडिओ यांच्या वतीने रविवार, दि. १८ जानेवारी रोजी सायंकाळी ६.३० वाजता हुतात्मा स्मृती मंदिर येथे होस बेळकु - २ हा लोकप्रिय कन्नड चित्रपट गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. आमदार विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे. संगीत रसिकांनी कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे अवाहन सदाबहार स्टुडिओचे चालक-गायक नागराज कनकी यांनी केले आहे.

### बार्शीत जिल्हा परिषद व पंचायत समितीत आजही अर्ज दाखल नाही

**बार्शी, दि. १७ जानेवारी -**

बार्शीतील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीसाठी दोन दिवसांत खालीलप्रमाणे अर्ज विक्री झाली आहे. उपळाई ठोंगे- २३, पांगरी- २०, पानगाव- १९, उपळे दुमाला- २२, मालवंडी- १२, शेळगाव (आर) - १९ असे एकूण दोन दिवसांत ११४ उमेदवारी अर्जाची विक्री झाली आहे तर एकही उमेदवारी अर्ज दाखल झालेला नसल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार एफ. आर. शेख यांनी दिली.

# संग्राम नगरमध्ये 'जिजाऊ नगर' कॉलनीचे उद्घाटन

**टेंभुर्णी, दि.१७ जानेवारी-**

संग्राम नगर येथे नव्याने विकसित करण्यात आलेल्या कॉलनीस 'जिजाऊ नगर' असे नाम करण करण्यात आले. या कॉलनीचे उद्घाटन अकलूज नगरपरिषदेचे नगरसेवक सयाजीराजे संग्रामसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते झाले.



राजमाता जिजाऊ जयंतीचे औचित्य साधून आयोजित कार्यक्रम ाची सुरुवात राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन व जिजाऊ वंदनेने झाली. यावेळी जिजाऊ ब्रिगेडच्या पुणे विभागीय अध्यक्ष प्रा. डॉ. मिनाक्षी जगदाळे, संग्राम नगर ग्रामपंचायतीचे सरपंच अजित रेवंडे, उपसरपंच राचकर, प्रहार संघटनेचे संपर्कप्रमुख अमोल जगदाळे, युवासेना जिल्हाध्यक्ष गणेश इंगळे यांच्यासह सचिन गायकवाड, समर्थ जगदाळे, राजू सोनवणे, अनिल कदम, शहाजी वाघ, डॉ. संतोष काटकर, डॉ. मंगेश शिंदे, डॉ. विशाल साळुंखे, अभिजीत वाघ, आकाश मुंजाळ, गणेश कदम, सचिन लोखंडे, सतीश रेवंडे, बबन शेंडगे, हनुमंत रेवंडे, गुणवंत अंधारे, सुमंत अंधारे, राजेश कांबळे, शकील भाई दस्तगीर, जिजाऊ ब्रिगेड उपाध्यक्ष सुषमा पाटील, पल्लवी काटकर, विद्या मुंगुसकर, विद्या साळुंखे, मनीषा कदम, विनोदिनी अंधारे, उज्वला आडणे, रेशमा ननवरे आदी उपस्थित होते. अमोल जगदाळे यांनी प्रास्ताविक केले. राजू सोनवणे यांनी आभार मानले.

# कर्मयोगी इन्स्टिट्यूटमध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१७ जानेवारी -**

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होऊन त्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा झाला.



यानिमित्त ग्रंथप्रदर्शन, तांत्रिक व अवतांत्रिक पुस्तकांचे वाचन, पुस्तक परीक्षण तसेच थोर शास्त्रज्ञ व साहित्यिकांच्या ग्रंथांचे व पुस्तकांचे प्रदर्शन आयोजिले होते. यावेळी प्राचार्य डॉ.एस. पी. पाटील यांनी मार्गदर्शन केले. या उपक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये ग्रंथालयाचा वापर वाढला असून वाचनसंस्कृतीला चालना मिळाल्याचे चित्र होते. श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे चेअरमन रोहन परिचारक यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी प्राचार्य डॉ. एस. पी. पाटील, पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. ए. बी. कणसे, रजिस्ट्रार गणेश वाळके, उपप्राचार्य प्रा.जगदीश मुडेगावकर, संशोधन अधिष्ठाता डॉ. अभय उत्पात, शैक्षणिक अधिष्ठाता प्रा.राहुल पांचाळ, विभाग प्रमुख डॉ. एस. एम. लंबे, डॉ.एस. व्ही. एकलारकर, डॉ.अनिल बाबर, प्रा. दीपक भोसले तसेच सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. ग्रंथपाल सहाय्यक गणेश येडगे व चंद्रकांत घाडगे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## निधन वृत्त...

### उमा चिकोडी



**सोलापूर, दि. १७ जानेवारी-**

सोलापूर - रेल्वे लाईन्स येथील रहिवासी श्रीमती उमा सदाशिव चिकोडी (वय-८३) यांचे शनिवार दि. १७ जानेवारीला दुपारी १२.३० च्या सुमारास वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांनी अनेक वर्ष गोपाबाई दमाणी रक्तपेढी येथे सामाजिक कार्यकर्त्या म्हणून सेवा बजावली. रक्तदानाचे अनेक शिबिरे आयोजित करण्यात त्यांनी पुढाकार घेतला होता. त्यांच्या पश्चात मुलगा, सून यासह दोन विवाहित मुली, जावई, नातू असा परिवार आहे. जुन्या पिढीतील प्रसिद्ध स्व.डॉ. सदाशिव चिकोडी यांच्या त्या पत्नी होत.

### किसन गायकवाड



**सोलापूर, दि. १७ जानेवारी-**

निवृत्त कार्यकारी अभियंता जलसंपदा विभाग सोलापूर किसन बाबुराव गायकवाड यांचे शनिवार दिनांक १७ रोजी सायंकाळी पाच वाजता आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८३ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, एक मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. महाराष्ट्राचे सहाय्यक परिवाहन आयुक्त रवी गायकवाड व पुष्प ॲकॅडेमीचे प्रदीप गायकवाड यांचे ते वडील होत. अंत्ययात्रा रविवार दि. १८ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता अंत्रोळीकर नगर क्र. २, होटगी रोड येथील त्यांच्या निवास्थानापासून निघेल.

### प्राचार्य वसंत कामाठी



**सोलापूर, दि. १७ जानेवारी-**

जिल्ह्यात हजारो शिक्षक घडवणारे प्राचार्य वसंत नारायण कामाठी (यादव) यांचे शुक्रवारी वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९० वर्षांचे होते. कामाठी हे शिवाजी अध्यापक विद्यालयात प्राचार्य होते. १९९४ साली ते निवृत्त झाले. त्यांच्या पश्चात दोन मुली, एक मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे. प्रतिथयश बांधकाम व्यावसायिक निलेश यादव यांचे ते वडील होत.

# संघाचे हिंदुत्व सर्वांना सामावून घेणारे

**मला समजलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ भाग - १७**

**- डॉ. सचिन लादे, पंढरपूर**
पुणे विभाग सहप्रचार प्रमुख रा.स्व.संघ.
मो.क्र.७५८८२१६५२६

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ म्हणजे हिंदुत्ववादी संघटना एवढी ओळख खरंतर पुरेशी आहे, परंतु अनेक भ्रामक कल्पना समाजात रुजविल्या गेल्यामुळे संघाला जातीवादी संघटना म्हणून देखील ओळखले जाते. संघ हिंदू समाजाचे संघटन करतो म्हणजे तो कोण्या एका जातीचे संघटन करत नाही. मग संघाचे हिंदुत्व नक्की काय आहे?

-----------------------------

संघाचे संस्थापक डॉ.केशव बळीराम हेडगेवार यांनी अत्यंत विचारपूर्वक हिंदुत्वाची व्याख्या केली आहे. आपण ज्या भारत देशामध्ये राहात आहोत, ज्या भूमीवर आपले वास्तव्य आहे, त्या भूमीचा व देशाचा उत्कर्ष व्हावा हा संघाचा उद्देश आहे. हा उद्देश सफल करण्यासाठी काय करावे लागेल याचा विचार करत असताना या देशाला व या भूमीला जो आपली मातृभूमी, पितृभूमी, पुण्यभूमी, पवित्रभूमी मानतो असे या देशात कोण आहेत? तर केवळ आणि केवळ हिंदूच आहेत. प्राचीन कालखंडापासून या भूमीमध्ये राहणारे, या भूमीचे रक्षण करणारे, या भूमीमध्ये अनेक प्रगत संस्कृत्या घडविणारे हिंदूच होते व हिंदूच आहेत. त्यामुळेच या देशाचा व भूमीचा उत्कर्ष व्हावा ही हिंदू समाजाच्या मनातच दृढ अशी भावना आहे हे संघ निर्मात्यांनी जाणले होते.

या भूमीमध्ये जे महापुरुष होऊन गेले, त्यांना आपला आदर्श मानणारे हिंदूच आहेत. राम, कृष्ण, भगवान गौतम बुद्ध, महावीर यासारख्या महापुरुषांना आपला आदर्श मानणारे, छत्रपती शिवराय, राणा प्रताप यासारख्या राष्ट्रनिर्मात्यांना प्रेरणादायी व्यक्तिमत्व मानणारे केवळ हिंदूच आहेत. येथील परंपरांचा अभिमान हा केवळ हिंदूनाच आहे, त्यामुळेच या राष्ट्राचे व भूमीचे भले होण्याची इच्छा धरणारे व भले करण्यासाठी धडपडणारे केवळ हिंदूच आहेत, म्हणूनच हिंदू समाजाचे आपण संघटन केले पाहिजे हे डॉ. हेडगेवार यांनी जाणले होते व यातूनच त्यांनी हिंदू समाजाचे संघटन करावयाचे ठरविले. या अर्थाने हिंदुत्वाची व्याख्या सहजपणे तयार होते. या भारतभूमीला आपली मातृभूमी, पितृभूमी, पवित्रभूमी, पुण्यभूमी मानणारे व येथील महापुरुषांना आपला आदर्श मानणारे ते सर्व हिंदू अशी संघाची हिंदुत्वाबाबतची सहज सोपी व्याख्या आहे. या व्याख्येमध्ये वेगवेगळ्या जाती - पोटजातीचे लोक सामावले जातात, वेगवेगळ्या उपासना पद्धती - पंथसंप्रदायाचे लोकही सामावले जातात, वेगवेगळा पेहराव करणारे - वेगवेगळ्या भाषा बोलणारे देखील सामावले जातात. याचाच अर्थ संघाचे हिंदुत्व हे सर्वांना सामावून घेणारे आहे.

संघाचे हिंदुत्व म्हणजेच राष्ट्रीयत्व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हिंदू समाजाचे संघटन करतो म्हणजे या देशातील स्वतःला हिंदू न मानणाऱ्या व्यक्तींचे संघटन करत नाही का? असाही प्रश्न उपस्थित केला जातो. परंतु मुळातच संघाची हिंदुत्वाची व्याख्या ही सर्वांना सामावून घेणारी अत्यंत व्यापक अशीच आहे, त्यामुळे ज्या - ज्या व्यक्तीचे या भूमीवर प्रेम आहे व या भूमीचा उत्कर्ष व्हावे असे ज्याला - ज्याला वाटते तो - तो संघदृष्ट्या हिंदूच आहे, त्यामुळेच संघ हिंदू समाजाचे संघटन करतो म्हणजेच या राष्ट्राच्या उन्नतीसाठी धडपडणाऱ्यांचे संघटन करतो. वेगळ्या भाषेत सांगावयाचे तर ज्याच्या मनात राष्ट्रीयत्व आहे तो - तो हिंदू. या अर्थाने विचार केला तर हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व ठरते. सर्वोच्च न्यायालयाने देखील एका प्रकरणांमध्ये हिंदुत्वाची व्याख्या करत असताना भारतातील जीवनपद्धतीलाच हिंदुत्व म्हणता येईल असे म्हटले आहे, म्हणूनच हिंदू समाजाचे संघटन म्हटले की त्याला जातीयवादाशी जोडणे योग्य नाही.

हिंदू हा शब्द आपण व्यापक अर्थाने लक्षात घेतला पाहिजे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यपद्धतीमध्ये कोणत्याही जाती अथवा पंथ - उपासना पद्धतीचा कधीही उल्लेख केला जात नाही. संघ हा अमुक धर्माविरुद्ध काम करतो असे बिंबवले जाते, परंतु प्रत्यक्षात कोणत्याही धर्म अथवा संस्कृतीबाबत संघ कधीही आपले प्रतिकूल मत व्यक्त करीत नाही अथवा कृतीतून तसा संदेश देत नाही. उलट संघ केवळ आणि केवळ संघटन या विषयावरच काम करतो. जी संघटना संघटन करण्याचा विचार करते त्याच्या कार्यपद्धतीमध्ये तोडणे ही गोष्ट नसतेच. भारत हा देश बहु संस्कृतिक, बहुपरंपराप्रिय, बहु उपासना पद्धती आचरण करणाऱ्या, बहुभाषा बोलणाऱ्या व बहु विचारधारा असणाऱ्यांचा आहे. त्यामुळे अशा बहुवैविध्य असणाऱ्या देशामध्ये संघटन करताना सर्वांना आपलेसे करण्यासाठी मोठी कसरत करावी लागते. या देशातील गिरी - वनामध्ये राहणारा वनवासी (आदिवासी), यांना देखील संघाने आपलेच मानले आहे तर आजपर्यंत अस्पृश्य म्हणून उपेक्षिला गेलेल्या अनुसूचित जातीमधील समाजाला कायमच संघाने संघटित करताना प्राधान्य दिले आहे. आपल्या उपजीविकेसाठी वन - वन हिंडणाऱ्या भटक्या जमातीला देखील संघाने आपलेसे केले आहे. नगर वस्तीमध्ये राहणाऱ्या बहुसंख्य लोकांना संघाने सामावून घेतले आहे. वेगवेगळ्या जात प्रवर्गांमध्ये विभागल्या गेलेल्या इतर मागास वर्गातील अनेक जाती - पोटजातींना संघाने आपलेसे केले आहे. अहिंसेच्या मार्गाने खलिस्तानची निर्मिती करू पाहणाऱ्या व दुफळी निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या शीख बांधवांनाही संघाने हिंदुत्वाच्या झेंड्याखाली एकवटले आहे. वेगळ्या उपासना पद्धतीचा मार्ग अवलंबणाऱ्या बौद्ध व जैन परंपरेतील समाजदेखील संघामध्ये मोठ्या प्रमाणात कार्यरत आहे. राष्ट्रीय मुस्लिम विचार मंचच्या माध्यमातून मुस्लिम समुदायातील बांधव तसेच ईसाई समुदायातील राष्ट्रीय विचार करणारे लोक संघाच्या कार्यात सक्रिय आहेत व ते अनेक जबाबदाऱ्या पार पाडत आहेत. संपूर्ण देशभरामध्ये अशा बहुवैविध्य असणाऱ्यांना संघटित करणारी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही एकमेव संघटना असावी असे निश्चित वाटते. भारतातील कोणत्याही राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक पक्ष अथवा संघटनांपेक्षा संघाच्या विचारसरणीवर या सर्व प्रकारच्या लोकांचा अधिक विश्वास आहे हे अनेकदा सिद्ध झाले आहे. या सर्वांना बरोबर घेऊन या राष्ट्राच्या परम वैभवासाठी संघ सातत्याने झटतो आहे, काम करतो आहे, या देशाच्या उत्कर्षासाठी स्वयंसेवक सातत्याने कार्यरत आहेत म्हणूनच संघाच्या सहज सोप्या हिंदुत्वाच्या व्याख्येची सातत्याने सर्वांना प्रचिती येते व संघाचे हिंदुत्व हे जातीयवादी नसून ते राष्ट्रीयत्व आहे हे अनेकदा सिद्ध झाले आहे, सिद्ध होत आहे व सिद्ध होत राहील.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





# पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे मुख्यमंत्र्यांनी केले अभिनंदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला मिळालेल्या अभूतपूर्व यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे पेढा भरवून अभिनंदन केले. या ऐतिहासिक विजयासाठी योगदान देणाऱ्या भाजपाच्या लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, नेते आणि कार्यकर्त्यांचे कौतुक केले.

महानगरपालिका निवडणुकीत भाजपाने सत्ता मिळवल्यानंतर शनिवारी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन आभार मानले.

पालकमंत्री म्हणून पदभार घेतल्यापासून जयकुमार गोरे यांनी सोलापूरच्या रखडलेल्या विकासकामांसाठी शासन दरबारी पाठपुरावा केला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने लोकप्रतिनिधी, पक्षाचे पदाधिकारी यांच्यासमवेत पक्षबांधणी सुरु केली होती. जुन्या व नव्या सहकाऱ्यांना सोबत घेत सोलापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीची रणनीती आखली. त्यास आ.सचिन कल्याणशेट्टी, आ.देवेंद्र कोठे आणि शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांनी सक्रिय प्रतिसाद दिले. त्यामुळे मनपा निवडणुकीत पक्षाला मोठा विजय मिळाला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही प्रचार काळात सोलापूर शहरात सभा घेऊन सोलापूरच्या जनतेला विकासाबद्दल आश्वस्त केले. त्याचा परिणाम म्हणून सोलापूरच्या जनतेने भाजपाला ऐतिहासिक विजय मिळवून दिला. आगामी काळात सोलापूरची विस्तारित विमानसेवा, समतोल पाणीपुरवठ्याच्या सर्व योजना, आयटी पार्क, एमआयडीसीतील सुविधा असे उर्वरित सर्व विषय मार्गी लावण्यासाठी भाजपा सरकार कटीबध्द असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली, असे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले.









# प्रशासकीय कारकीर्द संपली; नूतन नगरसेवकांच्या आगमनाची वेळ आली...

सोलापूर : गेल्या ८ वर्षापासून सोलापूर महानगरपालिकेवर प्रशासकराज अर्थात प्रशासकीय कारकीर्द होती. या ना त्या कारणास्तव निवडणूक पुढे ढकलत गेले. त्यामुळे नगरसेवक होऊ पाहणाऱ्यांना प्रदीर्घ प्रतिक्षा करावी लागली. अखेर सोलापूर महापालिकेच्या २६ प्रभागातील एकूण १०२ जागांसाठी गुरुवार, १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान तर शुक्रवार, १६ जानेवारी २०२६ रोजी मतमोजणी झाली. या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने घवघवीत यश संपादन करत एकहाती सत्ता मिळविली. सोलापूर महानगरपालिकेच्या १०२ नगरसेवकांची नावे शासकीय अध्यादेशात लवकरच समाविष्ट करण्यात येणार आहे. प्रशासकीय कारकीर्द संपून नूतन नगरसेवकांचा कारभार सुरु होणार आहे. नूतन पदाधिकाऱ्यांच्या आगमनाची जवळ येवून टेपल्याने प्रशासनाची लगबग सुरु आहे. महापालिका सभागृहासह महापौर, उपमहापौर, सभागृह नेते, विरोधी पक्षनेते, स्थायी समिती कक्ष आदी कार्यालयाचे नूतनीकरणाचे काम युध्दपातळीवर सुरु आहे. त्या-त्या कार्यालयात सुरु असलेल्या कामांचे छायाचित्र टिपले आहे केवल तिवारी यांनी.

## महत्वाचे...



### खंडोबाचीवाडी येथे आज किशोर व किशोरी गट खो-खो स्पर्धा

**सोलापूर,दि. १७ जानेवारी -**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सोलापूर म्युचर खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने किशोर व किशोरी गट (१४ वर्षाखालील) खो-खो स्पर्धांचे आयोजन रविवारी १८ जानेवारीला खंडोबाचीवाडी येथे खंडोबा मंदिराच्या पाठीमागील मैदानावर करण्यात आले आहे. बाळराजे खो-खो क्लब खंडोबाचीवाडी यांच्या वतीने ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. मुले व मुली दोन्ही संघातील विजयी संघांना प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थ व उत्तेजनार्थ बक्षीस अनुक्रमे ११, ०००/-, ७७७७/-, ५५५५/-, ३३३३/-, ३०००/- व ट्रॉफी देण्यात येणार आहे. संपूर्ण स्पर्धेदरम्यान उत्कृष्ट खेळ करणाऱ्या मुले व मुली संघातील खेळाडूंना वैयक्तिक उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू, उत्कृष्ट संरक्षक व उत्कृष्ट आक्रमक खेळाडू निवडून बक्षीसे देण्यात येणार आहेत. स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी किशोर गुंड (मो. ९९२१७७०३०३) यांच्याशी संपर्क साधावा.

### चेष्टेच्या कारणावरुन वाद; दोन वाहनांची जाळपोळ

**सोलापूर,दि. १७ जानेवारी -**

चेष्टेच्या कारणावरून झालेल्या वादातून एका तरुणाने घरासमोर उभ्या असलेल्या दोन दुचाकींना आग लावून जाळून टाकल्याची घटना विष्णु मिल चाळ परिसरात घडली. याप्रकरणी आकाश विनोद जाधव (वय-२२, रा.विष्णु मिल चाळ, डोणगाव रोड, सोलापूर) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. मंथन दिनेश गुंड (वय २३, रा. विष्णु मिल चाळ, सोलापूर) याने फिर्यादीची चेष्टा केल्याचा जाब फिर्यादीने आरोपीच्या मित्राकडे विचारला होता. या रागातून आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करत घर व मोटारसायकल जाळून टाकण्याची धमकी दिली. धमकीनंतर काही वेळातच आरोपीने फिर्यादीच्या घरासमोरील एम.एच.१३ ई.डी. ४२७५ आणि एम.एच.१३ बीके २६६३ या दोन दुचाकीना आग लावून जाळून टाकल्याचे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पाटोळे करीत आहेत.

### डंपरच्या धडकेत सायकलस्वाराचा मृत्यू

**सोलापूर,दि. १७ जानेवारी -**

माधव नगर रोडवर शनिवारी सकाळी भीषण अपघात घडला. भरधाव वेगात येणाऱ्या डंपरने सायकलस्वाराला जोरदार धडक दिल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. मृत सायकलस्वार हा रोजप्रमाणे आपल्या कामावर जात असताना हा अपघात झाला. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, डंपर चालकाने वाहतुकीचे कोणतेही नियम न पाळता बेदरकारपणे वाहन चालवले. डंपरने सायकलस्वाराला चिरडले, यात त्याचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. काही वेळातच पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत मृतदेह ताब्यात घेतला. शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला. दरम्यान, डंपर चालक अपघातानंतर घटनास्थळावरून फरार झाल्याची माहिती आहे.

# चौथे फातिमाबी शेख मुस्लिम मराठी साहित्य संमेलन उत्साहात

## कवीसंमेलन, पुस्तक, स्मरणिका प्रकाशन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ जानेवारी-**

ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्था महाराष्ट्र शाखा अहिल्यानगरच्या वतीने चौथे युगस्त्री फातेमाबी शेख मुस्लिम मराठी साहित्य संमेलन कवयित्री मेहमूदा रसूल शेख यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाले. यावेळी स्पंदन स्मरणिका, युगस्त्री फातिमाबी शेख, काव्यसप्तक हा काव्यसंग्रह, काळ काळांत, अहमदनगर साहित्यिक सूची, सोबत काहीच येत नाही, सांस्कृतिक सावल्या समिक्षा या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले

डॉ.श्रीपाल सबनीस याप्रसंगी बोलताना म्हणाले, सावित्रीबाईच्या पत्रामध्ये असणारा फातिमाबी शेख यांचा उल्लेख त्यांचं अस्तित्व असणारा महत्त्वाचा पुरावा आहे. फातिमाबी शेख यांचे काळजातले स्थान कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. मुस्लिम मराठी स्त्री साहित्यिक मोठ्या प्रमाणात लिहित आहेत. हा मराठी सांस्कृतिक संचिताचा गौरव आहे. फातिमाबी शेख साहित्यरत्न पुरस्कार सायराबानो चौगुले यांना, समाजभूषण पुरस्कार शहाजान शेख, आदर्श शिक्षक पुरस्कार निलोफर फणीबंद यांना प्रदान करण्यात आला. दरम्यान, यशवंत पगारे, कृष्णा क्षीरसागर, ज्योत्स्ना डासाळकर, दादासाहेब शेख, बा.ह. मगदूम, सुमैय्या चौधरी, आलिया गोहर यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी शफी बोल्डेकर, हाशम पटेल, डॉ.सय्यद जब्बार पटेल यांची उपस्थिती होतीवर्तमान चिंतन मांडताना हिंदू मुस्लिम भाईचारा कुठे हरवला या विषयीचे चिंतन करताना आमची हिंदू मुस्लिम संत साहित्य परंपरा जपण्याची गरज असल्याचे प्रतिपादन संमेलनाध्यक्षा मेहमूदा शेख यांनी केले. प्रा.डॉ.राहुल हांडे यांनी फातिमाबी शेख यांच्या जीवनकार्याविषयी मनोगत व्यक्त केले.फातिमाबीची जयंती शाळा कॉलेजात, सरकारी निमसरकारी दप्तरात साजरी व्हावी, फातिमा शेख च्या नावे विद्यापीठ होण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे फातिमाबी शेख प्रातिनिधिक काव्य संग्रहाच्या संपादिका अनिसा सिकंदर यांनी सांगितले.

संमेलनाध्यक्ष नुरजहाँ शेख यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन संपन्न झाले. यावेळी महाराष्ट्राच्या विविध जिल्हयातून आलेल्या कवींना प्रमाण पत्र, स्मृतीचिन्ह देऊन सन्मान करण्यात आले. प्रास्ताविक खाजाभाई बागवान यांनी केले. सूत्रसंचालन खाजाभाई यांनी केले. आभार शफी सय्यद यांनी मानले.

# प्रलंबित देयक अदा करा अन्यथा कर माफ करा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि. १७ जानेवारी -**

राज्यातील कंत्राटदार, सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांचे शासनाने सुमारे ७७,६०० कोटी देणे थकित ठेवल्याने शासनाने आता कंत्राटदार यांची जी.एस.टी.माफ करण्यासह सर्व वित्तीय संस्थाचे कंत्राटदारांनी व्यवसायासाठी घेतलेले कर्ज माफ करण्याची मागणी केली आहे.



दरम्यान, महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटनाने देशाचे अर्थमंत्री व महाराष्ट्रचे मुख्यमंत्री दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे ही मागणी केली आहे. मागणी मान्य न झाल्यास कोल्हापुरात फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात कोल्हापूर मध्ये राज्यातील कंत्राटदार,सुबे अभियंता यांची राज्यस्तरीय बैठक घेऊन संघटनेची पुढील दिशा ठरवली जाईल असे सांगण्यात आले आहे.

# भाजपाची चढती कमान, काँग्रेसची उलटी गिनती

## १९९७ ते २०२६ या २९ वर्षांत भाजपाची अभूतपूर्व भरारी | भाजपचा २६ ते ८७ जागांचा चढता आलेख | काँग्रेसची ३२ ते २ अशी झाली घसरण

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. १७ जानेवारी-**

सोलापूर महापालिकेच्या यंदाच्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपाने तब्बल ८७ जागा जिंकत महाविजय मिळविला. या निवडणुकीत मातब्बर उमेदवार गारद झाले. सोलापूर महापालिकेवर भाजपने पुन्हा आपले वर्चस्व सिध्द केले. सन १९९७ ते २०२६ या काळात झालेल्या सोलापूर महापालिकेच्या सहा निवडणुकीतील निकाल पाहता भाजपाने २६ ते ८७ जागांपर्यंत मोठी मजल गाठली आहे. भाजपाच्या वाढत्या यशाची चढती कमान दिसून येते. तर याउलट ३२ ते २ जागा अशी उलटी गिनती काँग्रेस पक्षाची झाली असल्याचे दिसून येते.


सोलापूर महापालिका निवडणुकीचा एकूणच धांडोळा घेतला असता भाजपाने सातत्यपूर्ण अशी संख्यात्मक वाढीची परंपरा राखली आहे. सन १९८५ मध्ये सोलापूर महापालिकेत पुलोद प्रयोग यशस्वी झाला. त्यावेळी भाजपा हा सत्तेत राहिला होता. त्यानंतरच्या काळात काँग्रेस आणि काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीची सत्ता सोलापूर महापालिकेत होती. सन २०१७ मध्ये झालेल्या निवडणुकीत भाजपाने ४९ जागा जिंकत पालिकेवर आपला झेंडा फडकविला. यावेळी भाजपाने प्रथमच महापालिकेवर एकहाती सत्ता प्रस्थापित केली होती.

सन १९९७ ते २०२६ या कालखंडाचा विचार केला असता सोलापूर महापालिकेच्या एकूण सहा निवडणुका पार पडल्या आहेत. सोलापूर महापालिकेच्या सन १९९७ मधील सार्वत्रिक निवडणुकीत ९० जागांच्या सभागृहात काँग्रेस ३२ जागांसह सर्वात मोठा पक्ष ठरला. भाजपाने २६ जागा मिळवत मजबूत विरोधी भूमिका घेतली. शिवसेनेला ११ जागांवर समाधान मानावे लागले. जनता दल (३), समाजवादी पार्टी (२), माकप

| सन २०२६ मधील पक्षीय बलाबल | |
|---|---|
| भाजपा | ८७ (+३८) |
| एमआयएम | ०८ (-०१) |
| शिवसेना शिंदे | ०४ (-१७) |
| काँग्रेस | ०२ (-१२) |
| राष्ट्रवादी काँग्रेस अ.प. | ०१ (-०३) |
| बसपा | ०० (-०४) |
| माकपा | ०० (-०१) |
| एकूण | १०२ |

(३), आरपीआय (२) आणि मजरेवाडी नागरी विकास आघाडी (१) अशा विविध पक्षांचे प्रतिनिधित्व सभागृहात दिसून आले होते. सन २०१७ पर्यंत भाजपाने खंबीर विरोधी पक्षाची भूमिका वठवली होती.

भाजपाने सन १९९७ मध्ये झालेल्या महापालिका निवडणुकीत २६ जागा, सन २००२ मध्ये २९ , सन २००७ मध्ये १५ जागा मिळविल्या. या निवडणुकीत भाजपच्या संख्येत घट झाली होती. सन २०१२ मध्ये



झालेल्या महापालिका निवडणुकीत भाजपाने २५ जागा पटकावल्या. दहा जागा अधिकच्या जिंकल्या होत्या. सन २०१७ मध्ये झालेल्या सोलापूर महापालिकेच्या निवडणुकीत भाजपाने दुप्पट जागा जिंकल्या. ४९ जागांवर विजय मिळवत सोलापूर महापालिकेत एकहाती सत्ता प्रस्थापित केली होती. आमदारद्वय विजय देशमुख, सुभाष देशमुख यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढविण्यात आली होती.



सन १९९७ ते २०१७ या काळात सोलापूर महापालिकेच्या चार सार्वत्रिक निवडणुका झाल्या. यादरम्यान, भाजप आणि काँग्रेसचा राजकीयदृष्ट्या आलेख हा चढ-उताराचा असल्याचा दिसून येतो. सोलापूर महापालिकेत सन २००२ ते २०१२ या कार्यकाळात काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचे निर्विवाद वर्चस्व होते. या कालखंडात काँग्रेस पक्ष महापालिकेतील केंद्रबिंदू राहिला. शहराच्या राजकारणावर पारंपरिक नेतृत्वाची पकड स्पष्टपणे दिसून आली. त्यानंतर मात्र म्हणजे २०१७ मध्ये भाजपाने ऐतिहासिक विजय मिळवत काँग्रेस-राष्ट्रवादीच्या दीर्घकालीन वर्चस्वाला छेद देत दिला.

दरम्यान, मार्च २०२२ पासून सोलापूर महापालिकेत प्रशासकीय राजवट लागू झाली. तीन वर्षे, दहा महिन्याच्या दीर्घ प्रशासकीय राजवटीनंतर अखेर निवडणूक घेण्यात आली. १६ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या मतमोजणीद्वारे धक्कादायक निकाल पुढे आले. भाजपाने विरोधकांचा सुपडासाफ करत तब्बल ८७ जागा जिंकल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली, पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वाखाली आमदार देवेंद्र कोठे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार विजयकुमार देशमुख, आमदार सुभाष देशमुख यांच्या माध्यमातून भाजपाने हा अभुतपुर्व, ऐतिहासिक विजय मिळविला आहे.

सन १९९७ च्या निवडणुकीत ३२ जागा मिळवलेल्या काँग्रेसला यंदाच्या निवडणुकीत केवळ दोन जागा मिळाल्या. आतापर्यंतच्या इतिहासातील काँग्रेसचा हा मोठा दारुण पराभव मानला जातो. याच निवडणुकीत भाजपाने महाविजय मिळविला आहे. राजकीय प्रवासातील ही ऐतिहासिक घटना मानली जात आहे. 'एमआयएम'ने आठ जागा जिंकत दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष राहिला आहे. सन २००२ मध्ये काँग्रेसला ४२ जागा मिळाल्या होत्या. त्यानंतर सन २००७ मध्ये- ४० जागा, सन २०१२-४५ जागा, सन २०१७-१४ जागा मिळाल्या होत्या. यंदाच्या निवडणुकीत काँग्रेसला अवघ्या दोन जागांवर समाधान मानावे लागले. याउलट भाजपाच्या संख्यात्मक वाढीचा आलेख चढता राहिला आहे.

### सन २०१७ मधील पक्षीय बलाबल

सन २०१७ मध्ये सोलापूर महापालिकेत प्रथमच भाजपाची सत्ता स्थापन झाली होती. तेव्हा १०२ जागांपैकी भाजपाकडे ४९ जागा होत्या. शिवसेना २१, काँग्रेस १४, राष्ट्रवादी काँग्रेस ४, एमआयएम ९, बसपा ४ आणि माकप १ असे पक्षीय बलाबल होते.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## पत्रकार उत्तम कांबळे यांना शिवशंभु पुरस्कार

त.भा. वृत्तसेवा,

लातूर, १७ जानेवारी : येथील ज्येष्ठ पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त समाजभूषण भुजंग उर्फ उत्तम माधवराव कांबळे यांना शिवशंभु हा पुरस्कार जाहीर झाला असून हा पुरस्कार वीर शिवशंभु संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने रविवार दि.१८ जानेवारी २०२६ रोजी गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर येथील श्री पांडुरंग लॉन्स जामगाव रोड येथे हा पुरस्कार संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात येणार आहे.

याप्रसंगी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, खा. ओमप्रकाश निंबाळकर, मराठवाडा पदवीधर मतदार संघाचे आ. सतिश चव्हाण, गंगापूर नगर परिषदेचे नगराध्यक्ष संजयभाऊ जाधव, शिवशंभु संघटनेचे प्रदेशाध्यक्ष हनुमंत वडजे पाटील, राष्ट्रीय युवती अध्यक्ष शरदचंद्र पवार गट श्रीमती सक्षणाताई सलगर, आ. विलासबापू भुमरे पैठण आणि महिला जिजाऊ फाउंडेशन अध्यक्ष सौ. सुवर्णाताई जाधव आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. या पुरस्काराबद्दल लहू शिंदे, पत्रकार ॲड. बालाजी जगदाळे, श्रीहरी कांबळे, विजय गायकवाड, शेशराव करखेलीकर, गणेश कांबळे, लक्ष्मण तिकटे, देविदास वाघमारे, राजेंद्र बनासे आदींनी अभिनंदन केले आहे.



# ‘जवाहर नवोदय’ प्रकरणाची चौकशी आता एसआयटी करणार : तांबे

त.भा. वृत्तसेवा,

लातूर, १७ जानेवारी : लातूरच्या जवाहर नवोदय विद्यालयातील मयत विद्यार्थिनी कु. अनुष्का पाटोळे हिच्या मृत्यू प्रकरणाची चौकशी करण्यासाठी राज्य सरकारने एसआयटीची स्थापना केली आहे. या एसआयटीच्या अध्यक्षपदी नांदेड जिल्ह्यातील भोकरच्या अति. पोलीस अधीक्षक अर्चना पाटील यांची नियुक्ती करण्यात आली असून त्या आता या प्रकरणाची चौकशी करणार असल्याची माहिती पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी शनिवारी पत्रकारांशी बोलताना दिली.

सदर प्रकरणाचा तपास लातूर पोलीस दलाकडून अतिशय कसून



केला जात आहे. सुरुवातीला लातूर शहर उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे या प्रकरणाचा तपास करत होते. मयताच्या कुटुंबीयांनी व्यक्त केलेल्या शंका आणि मागणीनुसार मयताचे शवविच्छेदन इन कॅमेरा आणि त्यांच्या परिचयातील एका डॉक्टरच्या उपस्थितीत करण्यात आले होते. मयताच्या शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर मृत्यूचे कारण आत्महत्या

**भोकरच्या अति. पोलीस अधीक्षक अर्चना पाटील एसआयटीच्या अध्यक्षा**

हेच आल्याने त्यादिशेने तपास केला जात आहे. मयत विद्यार्थिनीला न्याय मिळाला पाहिजे या दृष्टीने हे कार्य वेगवान सुरु आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मनपा निवडणुकीच्या अनुषंगाने लातूर दौऱ्यावर आले असता मयत विद्यार्थिनीच्या कुटुंबियांना भेट दिली. त्यावेळी कुटुंबीयांनी या प्रकरणाचा तपास महिला अधिकाऱ्यांकडून व्हावा अशी मागणी केली होती, असे अमोल तांबे यांनी सांगितले. लातूर पोलीस दलात महिला पोलीस उपाधीक्षक दर्जाची अधिकारी नसल्याने दि. १२ जानेवारी रोजी एसआयटीची स्थापना करून त्या समितीच्या अध्यक्षपदी अर्चना पाटील यांची नियुक्ती करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. घडलेली घटना महिला वसतीगृहातील असून चौकशीही विद्यार्थिनींची, महिला कर्मचाऱ्यांची केली जाणार आहे. त्यामुळे सदर प्रकरणाचा तपास एका महिला पोलीस अधिकाऱ्याकडे सोपविण्याची आवश्यकता वाटली. जेणेकरून विद्यार्थिनी निःसंकोचपणे माहिती देऊ शकतील. जवाहर नवोदय विद्यालयाच्या वसतिगृहातील विद्यार्थिनींच्या साक्षी घेण्यात आल्या असून त्या न्यायालयातही नोंदविण्यात आल्या आहेत. या गुन्ह्यातील बारकाव्यांना उजेडात आणण्याचे काम सूक्ष्मपणे सुरु आहे. हे प्रकरण आता एसआयटीकडे सुपूर्द करण्यात आले असले तरी लातूर पोलीस दल त्यांना पुरेपूर सहकार्य करेल, असेही तांबे यांनी नमूद केले. या प्रकरणी जे कोणी जबाबदार असतील त्यांच्यावर कठोर कार्यवाही व्हावी व मयत विद्यार्थिनीला न्याय मिळावा, हा मुख्य उद्देश आहे.

आजपर्यंतच्या या तपासात सदरील विद्यार्थिनीला आत्महत्येस प्रवृत्त केले गेल्याचे निदर्शनास आले आहे. मयत मुलीला मृत होण्याच्या आदल्यादिवशी अपमानास्पद वागणूक दिल्याच्या कारणावरून सदर प्रकरण घडल्याची शक्यताही तांबे यांनी वर्तवली.

या प्रकरणी नियुक्त करण्यात आलेल्या एसआयटीच्या प्रमुख अर्चना पाटील यांनी यावेळी आपली टीम या प्रकरणाचा कसून तपास लावेल व मयत विद्यार्थिनीला न्याय मिळवून देण्याचे काम करेल, असा विश्वास व्यक्त केला.

## ‘बी.एड. सीईटी’चे अर्ज भरण्याची मोफत सुविधा

त.भा. वृत्तसेवा,

लातूर, १७ जानेवारी : बी. एड. २०२६-२७ प्रवेशासाठी सीईटी परीक्षेचे ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. इच्छुक उमेदवारांना येत्या २३ जानेवारीपर्यंत अर्ज दाखल करता येणार आहे. येथील शिवनगरातील राजमाता जिजामाता बी.एड. कॉलेज येथे सीईटी परीक्षेचे मोफत ऑनलाइन अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून याचा लाभ घ्यावा, असे आवाहन कॉलेजतर्फे करण्यात आले आहे.

बी.एड. प्रवेशासाठी आवश्यक असलेली सीईटी परीक्षा २७ ते २९ मार्च या कालावधीत होणार आहे. सीईटी परीक्षा नोंदणीसाठी अपार आयडी अनिवार्य आहे. सीईटी परीक्षेसाठी येत्या २३ जानेवारीपर्यंत ऑनलाइन अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. येथील शिवनगरातील राजमाता जिजामाता बी.एड. कॉलेजतर्फे सीईटी परीक्षेचे ऑनलाईन अर्ज भरण्याची मोफत सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. आवश्यक कागदपत्रांसह २३ जानेवारीपर्यंत कॉलेजमध्ये उपस्थित राहून विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे व कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. एम. चव्हाण यांनी केले आहे.

## राजकीय पक्ष, उमेदवारांनी निवडणूक आयोगाच्या निर्देशांचे पालन करावे : जिल्हाधिकारी

त.भा. वृत्तसेवा,

लातूर, १७ जानेवारी : राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे सर्व राजकीय पक्ष, उमेदवार यांनी पालन करणे आवश्यक आहे. या नियमांबाबत राजकीय पक्षांनी आपल्या पदाधिकाऱ्यांना, उमेदवारांना माहिती द्यावी. या नियमांचे पालन करून निवडणूक प्रक्रिया शांततामय व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे केले.

लातूर जिल्हा परिषद व त्या अंतर्गत १० पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या राजकीय पक्ष पदाधिकारी यांच्या बैठकीत जिल्हाधिकारी बोलत होत्या. अप्पर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, निवासी

**जिल्हा परिषद, पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६**

उपजिल्हाधिकारी केशव नेटके, सामान्य प्रशासनच्या उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, निवडणूक निर्णय अधिकारी शरद झाडके अविनाश कोरडे, सुशांत शिंदे, मंजुषा लटपटे, रोहिणी नऱ्हे-विरोळे, संदीप कुलकर्णी, गणेश पवार, अहिल्या गाठाळ, संगीता टकले, स्वाती दाभाडे यांच्यासह आदर्श आचारसंहिता कक्ष नोडल अधिकारी तथा जिल्हा परिषदेचे अपर मुख्य कार्यकारी अधिकारी अस्लम तडवी, निवडणूक खर्च कक्षाचे नोडल अधिकारी राजेंद्र नागणे यांच्यासह विविध




राजकीय पक्षांचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

नामनिर्देशन पत्र भरण्यापासून ते निवडणूक निकाल जाहीर होईपर्यंतच्या प्रत्येक टप्प्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने विविध नियम ठरवून दिले आहेत. या नियमांचे पालन करणे सर्वांसाठी बंधनकारक आहे. तसेच निवडणूक कार्यक्रम घोषित झाल्यापासूनच जिल्हा परिषद व संबंधित पंचायत समिती क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक तालुक्यात पथके स्थापन केली आहेत. त्यामुळे राजकीय पक्ष, उमेदवार यांनी आवश्यक परवानगी घेवूनच प्रचार सभा, रॅली याचे आयोजन करावे, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले.

काही ठिकाणी नवीन मतदान केंद्र करण्यात आली असल्याने संबंधित मतदारांना याबाबत माहिती देण्यात येत आहे. तसेच दुबार मतदारांकडून घोषणापत्र भरून घेण्याची कार्यवाही सुरू आहे. प्रचार विषयक विविध परवानग्या देण्यासाठी प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकारी स्तरावर कक्ष कार्यान्वित करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

राजकीय पक्ष, उमेदवार यांच्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या दिशानिर्देशांची, तसेच निवडणूक विषयक महत्वाच्या नियमांची माहिती यावेळी उपस्थित राजकीय पक्ष पदाधिकारी यांना देण्यात आली.

## सोपान यादवराव ठाकूर यांचा गुणवंत शिक्षक पुरस्काराने सन्मान

त.भा. वृत्तसेवा,

लातूर, १७ जानेवारी : मूळचे निलंगा तालुक्यातील गौरचे रहिवासी असलेले विद्यार्थीप्रिय



शिक्षक सोपान यादवराव ठाकूर यांना शनिवार, दि. १७ जानेवारी रोजी गुणवंत शिक्षक सन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

सोपान यादव यांचे संपूर्ण कुटुंबच अव्याहतपणे शिक्षण क्षेत्रामध्ये ज्ञानदानाचे पवित्र कार्य करत आले आहेत. त्यांचे वडील यादवराव ठाकूर हेही एक विद्यार्थीप्रिय तसेच उपक्रमशील शिक्षक म्हणून सेवारत होते. आपल्या सेवाकार्यात यादव गुरुजींनी असंख्य विद्यार्थ्यांना सहकार्य करण्याचे काम निरपेक्षपणे केलेले आहे. त्यांचे असंख्य विद्यार्थी आज विविध शासकीय-निमशासकीय क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत आहेत. ज्ञानदान हेच आपल्या जीवनाचे सार मानून चालणाऱ्या यादवराव गुरुजींनी आपल्या मुली-मुलांनाही शिक्षण क्षेत्रात विद्यादानाचे कार्य करण्यास प्रेरित केले.

त्यांचे चिरंजीव सोपान ठाकूर हे मागच्या सतरा वर्षांपासून नाशिक जिल्ह्यात विद्यादानाचे पवित्र कार्य करत आहेत. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या तालुकास्तरीय त्रैवार्षिक अधिवेशनात त्यांचा मानचिन्ह , शाल श्रीफळ देऊन गौरविण्यात आले.

हा गौरव आपला एकट्याचा नसून आपल्याला सहकार्य करणाऱ्या सर्व सहकारी, कुटुंबीय यांचा असल्याची भावना याप्रसंगी त्यांनी व्यक्त केली. सध्या सेवानिवृत्त जीवन व्यतीत करणारे आपले पिताश्री यादवराव ठाकूर यांच्या सततच्या प्रेरणे आणि प्रोत्साहनामुळे आपण शिक्षण क्षेत्रात चांगली कामगिरी करू शकत असल्याचेही त्यांनी बोलून दाखविले.

या पुरस्काराबद्दल दयानंद ठाकूर, सौ. बबिता ठाकूर, श्रीहरी जाधव, सुचिता ठाकूर, गोविंद ठाकूर, भागवत कवठेकर, अमोल सावंत, मनोज जांभळदरे, गोपाळ जांभळदरे, तुकाराम चामे यासह संपूर्ण कुटुंबिय, मित्रमंडळींकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करण्यात येत आहे.

## भाजपातर्फे सौ. सरिता भिसे, सौ. मनीषा सरवदेंची उमेदवारी जाहीर

त.भा. वृत्तसेवा,

लातूर, १७ जानेवारी : रेणापूर बरोबरच लातूर पंचायत समितीवर यावेळी भाजपचा झेंडा फडकणार असून रेणापूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या चार आणि पंचायत समितीच्या आठही जागेवर भाजपाचा विजय होणार असा आत्मविश्वास व्यक्त करून भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी कामखेडा जिल्हा परिषद मतदार संघातून सौ. सरिता शंकरराव भिसे, कामखेडा पंस गणातून शरद दरेकर, मोटेगाव पंस गणातून संतोष चव्हाण यांची तर पोहरेगाव जिल्हा परिषद गटातून सौ. मनीषा दशरथ सरवदे निवाडा पंस गणातून प्रा. विष्णू गोरे यांची भाजपाच्या वतीने उमेदवारी जाहीर केली.

भारतीय जनता पार्टीच्या वतीने कामखेडा जिल्हा परिषद मतदार संघाचा विजय संकल्प मेळावा शुक्रवारी सायंकाळी रेणापूर तालुक्यातील मौजे भोकरंबा येथे भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाला. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार ॲड. त्र्यंबकनाना भिसे हे होते.

याप्रसंगी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष भागवत सोट, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा कराड, सेवानिवृत्त सनदी अधिकारी शंकरराव भिसे, भाजपाचे नवनाथ भोसले, रेणापूरच्या नगराध्यक्षा शोभा आकनगिरे, माजी सभापती अनिल भिसे, भाजपाचे दशरथ सरवदे, मंडलाध्यक्ष शरद दरेकर, सरपंच संघटनेचे अध्यक्ष विजय गंभीरे, सरपंच राजू हाके, उपसरपंच राजू शेख, विष्णू गोरे, ज्ञानोबा भिसे, राम मोरे, अजय गुडे यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. मोठ्या उत्साहाच्या वातावरणात पार पडलेल्या या मेळाव्यास अनेक गावचे सरपंच लोकप्रतिनिधी, भाजपाचे कार्यकर्ते, पदाधिकारी यांच्यासह हजारोचा जनसमुदाय उपस्थित होता.

रमेशआप्पा सर्व सामान्यांना चोवीस तास उपलब्ध असणारे सक्षम आमदार आहेत त्यांच्या माध्यमातून मतदार संघात विकासाची अनेक कामे होत असल्याचे सांगून त्र्यंबकनाना भिसे म्हणाले की, केंद्र आणि राज्य शासनाच्या योजना गरजूपर्यंत शेवटच्या माणसापर्यंत पोहोचण्यासाठी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती भाजपाच्या ताब्यात घेणे गरजेचे असून येत्या पाच तारखेला रेणापूर तालुक्यातील सर्वच्या सर्व भाजपाचे उमेदवार विजयी करून रमेशआप्पा कराड यांच्या पाठीशी ताकद उभी करावी असे आवाहन केले.

युवा नेते ऋषिकेशदादा कराड यावेळी बोलताना म्हणाले की, विकास कामासाठी




या मतदारसंघाला वीस वर्ष संघर्ष करावा लागला रमेशआप्पांच्या माध्यमातून या मतदार संघात विकास कामे होत असताना दिसत आहेत. शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी कायमस्वरूपी सुरू ठेवण्यासाठी मतदारांनी भाजपाच्या पाठीशी कर्ज म्हणून आशीर्वाद द्यावेत. येणाऱ्या काळात निश्चितपणे अपेक्षेपेक्षा अधिक काम करून व्याजा सगट कर्जाची परतफेड करण्याची क्षमता भाजपाची आहे. विधानसभा निवडणुकीत ज्याप्रमाणे रमेशआप्पा कराड साहेबांवरती विश्वास टाकला त्याचप्रमाणे जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत भाजपाच्या उमेदवारावर विश्वास ठेवून आशीर्वाद द्यावेत असे आवाहन केले.

यावेळी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ भोसले, जिल्हा चिटणीस दशरथ सरवदे यांनी आपले मनोगत व्यक्त करून रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वात भाजपाला साथ द्यावी असे आवाहन केले. प्रारंभी माजी सभापती अनिल भिसे यांनी आपल्या प्रास्ताविकातून मेळाव्याच्या आयोजनामागची भूमिका विषद केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे, प्रा. धायगुडे यांनी केले तर शेवटी श्रीमंत नागरगोजे यांनी आभार मानले.

## चित्रकला, निबंध स्पर्धांमध्ये जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

त.भा. वृत्तसेवा,

लातूर, १७ जानेवारी : ‘हिंद-दी-चादर’ श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त लातूर जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयांमध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करून श्री गुरु तेग बहादुर साहिब यांचा इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविला जात आहे. यानिमित्त आज विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या कार्यावर आधारित निबंध लेखन व चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविल्याचे पाहायला मिळाले.

नांदेड येथे २४ व २५ जानेवारी रोजी ‘हिंद-दी-चादर’ श्री गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त विशेष कार्यक्रम होणार आहेत. या कार्यक्रमांची तसेच श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या कार्याची माहिती घरोघरी पोहोचविण्यासाठी यासह विविध स्पर्धांचे आयोजन केले जात आहे.



शिक्षण विभागामार्फत विशेष जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत शाळा व महाविद्यालयांमध्ये श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या जीवनावर आधारित माहितीपट, गीत दाखविणे लातूर जिल्ह्यात शनिवारी सकाळच्या सत्रात विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये प्रभात फेरी काढून ‘हिंद-दी-चादर’ श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या कार्याची माहिती तसेच नांदेड येथे आयोजित कार्यक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आली. श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या कार्याची महती सांगणारी घोषवाक्य असलेले फलक हाती घेत विद्यार्थ्यांनी या प्रभात फेरीत सहभाग नोंदविला.

विद्यार्थ्यांनी रेखाटला श्री गुरु तेग बहादुर साहिब यांचा जीवनपट

जिल्हा परिषद शाळांसह जिल्ह्यातील शासकीय, निमशासकीय व खासगी शाळांमध्ये झालेल्या निबंध लेखन व चित्रकला स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. यावेळी विद्यार्थ्यांनी श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या कार्याची महती आपल्या निबंधांमधून मांडून त्यांच्या गौरवशाली इतिहासाला उजाळा दिला. तसेच चित्रकलेतून श्री गुरु तेग बहादुर साहिब यांचे चित्र रेखाटून त्यांचा जीवनपट मांडण्याचा प्रयत्न केला.

## नशामुक्त भारत अभियानांतर्गत राजर्षी शाहू महाविद्यालयात जनजागृती

त.भा. वृत्तसेवा,

लातूर, १७ जानेवारी : राष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून नशामुक्त भारत अभियान राबविण्याच्या दृष्टीने लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, राजर्षी शाहू महाविद्यालय आणि ५३ महाराष्ट्र बटालियन राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू महाविद्यालयात जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश संजय भारूका यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या कार्यक्रमाला जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्यंकटेश गिरवलकर, राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, एनसीसीचे डॉ. महेश वावरे, सुभेदार हरेंद्रसिंग, नायब सुभेदार संतोष पाटील, महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी आणि एनसीसी कॅडेट्स मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात श्री. गिरवलकर यांनी अंमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे सामाजिक, मानसिक आणि शारीरिक दुष्परिणाम याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. जीवनाला हो म्हणा, नशेला नाही म्हणा हे ब्रीद सांगून त्यांनी सर्व उपस्थितांना नशामुक्त भारतासाठी शपथ घेण्यास प्रवृत्त केले. अंमली पदार्थांचे सेवन ही सामाजिक व्याधी आहे. अंमली पदार्थांची तस्करी दहशतवादाला प्रोत्साहन देते, भ्रष्टाचार वाढवते आणि राष्ट्राच्या भविष्यास हानिकारक ठरते. अंमली पदार्थ विरोधी लढा हा सामाजिक न्यायाचा महत्त्वाचा भाग आहे, असे त्यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# चाकूर येथे भव्य दीक्षांत समारंभ सोहळा संपन्न

**त.भा. वृत्तसेवा,**

**चाकूर, १७ जानेवारी :** सहायक प्रशिक्षण केंद्र, सीमा सुरक्षा बल, चाकूर येथे भव्य दिक्षांत समारंभ सोहळा ता.१७ जानेवारी रोजी श्री. छत्रपती शिवाजी

## अठरा राज्यातील ३३४ जवानांनी घेतली देशसेवेसाठी शपथ

महाराज परेड मैदानावर ३३४ जवानांचा भव्य शपथग्रहण व दीक्षांत परेड सोहळा उत्साहात पार पडला. शिस्त, शौर्य आणि राष्ट्रभक्तीचे दर्शन घडविणाऱ्या या परेडची सलामी महानिरीक्षक विनीत कुमार यांनी स्वीकारली, तर परेडचे नेतृत्व नवआरक्षक अम्बर पांडे यांनी केले.

या नवआरक्षकांनी ०३ मार्च २०२५ ते १७ जानेवारी २०२६ या कालावधीत ४४ आठवड्यांचे कठोर व सखोल मूलभूत प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले. हे प्रशिक्षण महानिरीक्षक विनीत कुमार व कमांडंट मदन पाल सिंह यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली पार पडले.

देशाच्या विविध १८ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमधून आलेल्या या जवानांमध्ये पश्चिम बंगाल, ओडिशा,



बिहार, आसाम, गुजरात, राजस्थान, केरळ, पंजाब, उत्तर प्रदेश, जम्मू-काश्मीर, मध्य प्रदेश, झारखंड, मेघालय, गोवा, त्रिपुरा, हिमाचल प्रदेश आणि दमन-दीव येथील नवआरक्षकांचा समावेश आहे.

प्रशिक्षण काळात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या नवआरक्षकांना यावेळी गौरविण्यात आले. बॅच क्रमांक १९३ मधून 'ओव्हरऑल फर्स्ट'चा सुवर्णपदक व चषक आरक्षक सिबा सुंदर यांना, तर 'ओव्हरऑल सेकंड'चा रौप्यपदक आरक्षक अम्बर पांडे यांना प्रदान करण्यात आला. याच बॅचमधून उत्कृष्ट सहनशक्तीसाठी (बेस्ट इन एंड्युरन्स) आरक्षक जीवन ज्योती, तर नेमबाजी व फायरिंगमध्ये उत्कृष्ट कामगिरीसाठी आरक्षक संजय कुमार साकेत यांना सन्मानित करण्यात आले.

बॅच क्रमांक १९४ मधून 'ओव्हरऑल फर्स्ट'चा सुवर्णपदक व चषक आरक्षक प्रजापत्ती भाविन यांना, 'ओव्हरऑल सेकंड'चा रौप्यपदक आरक्षक गुलशन कुमार यांना देण्यात आला. उत्कृष्ट सहनशक्तीसाठी आरक्षक खैर शैलेशभाई, फायरिंगमध्ये उत्कृष्टतेसाठी आरक्षक गुजरिया सत्विकभाई, तर बेस्ट इन टर्नआऊट व ड्रिलसाठी आरक्षक सौमेद्र महापात्र यांना सन्मानित करण्यात आले. बॅच १९३ मधून बेस्ट इन टर्नआऊट व ड्रिलचा पुरस्कार तसेच आजच्या भव्य परेडचा 'परेड कमांडर ट्रॉफी' आरक्षक अम्बर पांडे यांनी पटकावली.

या ४४ आठवड्यांच्या प्रशिक्षणात जवानांना शारीरिक दक्षता, शस्त्र व दारुगोळा हाताळणी, फील्ड क्राफ्ट, नकाशा वाचन, फील्ड इंजिनिअरिंग, अंतर्गत सुरक्षा कर्तव्य, सीमा व्यवस्थापन, कायदे व मानवाधिकार यांचे सखोल प्रशिक्षण देण्यात आले.

यावेळी महानिरीक्षक विनीत कुमार यांनी नवआरक्षकांना संबोधित करताना सांगितले की, प्रशिक्षणानंतर हे जवान भारत-पाकिस्तान व भारत-बांगलादेश आंतरराष्ट्रीय सीमेच्या सुरक्षेसाठी तैनात केले जाणार आहेत. कठीण परिस्थितीतही देशाच्या सीमांचे रक्षण करण्याची क्षमता या जवानांमध्ये असल्याचा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.देशसेवेसाठी आपले सुपुत्र पाठवल्याबद्दल जवानांच्या आई - वडिलांना नमन करत त्यांच्या त्यागाचे व देशसेवेतील योगदानाचे कौतुकही त्यांनी केले. तसेच कार्यक्रमास उपस्थित मान्यवर, विद्यार्थी व माध्यम प्रतिनिधींचे आभार मानले.

दीक्षांत परेडनंतर नवजवानांनी मल्लखांब, शारीरिक प्रात्यक्षिके आणि देशभक्तीने भारलेले सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

# एमपीएससी-यूपीएससी परीक्षांकडे तरुणांचा वाढता कल : ताठे

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, १ जानेवारी :** अलीकडे सरकारी नोकरीमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये चढाओढ लागलेली आहे. यात भरपूर पदे आहेत परंतु अभ्यासाचे व वेळेचे नियोजन, मेहनत करण्याची तयारी, यामुळे विद्यार्थी मागे पडत आहेत. पद, पैसा, प्रतिष्ठा यातूनच विद्यार्थी राज्य व केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांकडे वळालेला आहे. असे मत 'द युनिक अकॅडमी' पुणे येथील मार्गदर्शक दिनेश ताठे यांनी व्यक्त केले.

निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने आयोजित कार्यशाळेत ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. ते पुढे म्हणाले की कोणताही मोठा अधिकारी एखादा महत्त्वपूर्ण निर्णय




घेऊन बदल घडवून आणू शकतो. हेच खऱ्या अर्थाने सामाजिक उत्तरदायित्व असते. लोकसेवा आयोगाच्या परीक्षा दिल्या म्हणजे सर्वांनाच नोकरी लागेल असे नसले तरी, ती व्यक्ती देशाचा एक सुजाण नागरिक बनू शकतो. ज्याला सत्ता, कायदे, नियम, याबाबत माहिती असल्याने समाजात त्याला चांगले स्थान तर असतेच पण, अधिकाऱ्यांवर सुद्धा अंकुश राहू शकतो. कोणताही व्यक्ती मार्कांनी नाही तर विचारांनी मोठा होतो त्यामुळे प्रत्येकाने आपली स्वतःचे मत व विचार निर्माण करावा व त्या मतावर कींवा विचारावर ठाम असावे असेही ते म्हणाले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष विजय पाटील निलंगेकर, तसेच सचिव बब्रुवानजी सरतापे यांनी शुभेच्छा दिल्या.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कर्मवीर कदम यांची उपस्थिती होती. आपल्या अध्यक्षीय समारोपात त्यांनी विद्यार्थ्यांना स्वतःची क्षमता ओळखून क्षेत्र निवडण्याचा, संधी मिळाली तर तिचा सोनं करण्याचा, अडचणीवर मात करून यशस्वी होण्याचा सल्ला दिला. याप्रसंगी विचार मंचावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. भास्कर गायकवाड, प्रा. प्रशांत गायकवाड, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे डॉ. ज्ञानेश्वर चौधरी यांची उपस्थिती होती.

स्पर्धा परीक्षेचे महत्त्व, अभ्यास कसा करावा, हे समजून घेण्यासाठी महाविद्यालयातील हजारो विद्यार्थी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती या कार्यक्रमाला होती.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक डॉ. सुभाष बेंजलवार, प्रा. विष्णू रेड्डी, प्रा. दर्शन पाटील यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. मोनिका सोमवंशी हिने तर आभार प्रा. दत्ता पवार यांनी मानले.



# औसा पालिकेचा कारभार बहीण-भावाच्या हाती

**तभा वृत्तसेवा**

**औसा दि. १७ जानेवारी :** अगदी परवाच पार पडलेल्या औसा नगरपालिकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने २३ पैकी १७ जागा जिंकुन निर्विवाद वर्चस्व मिळवले.तर नगराध्यपदी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष यांच्या भगिणी प्रा. परवीन शेख यांनी विजय मिळवून एक हाती मिळवली. यानंतर औसा नगरपालिकेने आपल्या राजकीय इतिहासात महत्त्वाचा टप्पा नोंदवला असून पालिकेच्या उपाध्यक्षपदी जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. अफसर शेख यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्यामुळे पालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच बहीण-भाऊ सत्तास्थानी येऊन औसा शहराच्या कारभाराची सूत्रे हाती घेतली आहेत.

पिठासन अधिकारी तथा नगराध्यक्षा परवीन शेख यांच्या अध्यक्षतेखाली उपाध्यक्ष व स्वीकृत सदस्य निवडीसाठी विशेष बैठक घेण्यात आली. उपाध्यक्ष पदासाठी डॉ. अफसर शेख यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची निवड बिनविरोध घोषित करण्यात आली.

या बैठकीत दोन स्वीकृत सदस्यांचीही निवड करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेसकडून अब्दुल हमीद सय्यद व जुनेद खुर्शीद सय्यद यांना संधी देण्यात आली. नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे १७ नगरसेवक निवडून आले होते. भाजपचे ५ व शिवसेना शिंदे गटाच्या सेनेचा १ नगरसेवक असा विरोधी पक्षाचा आकडा ६ आहे. आता दोन स्वीकृत सदस्यांच्या समावेशामुळे राष्ट्रवादी काँग्रेसची संख्या १७ वरुन १९ वर पोहोचली असून पालिकेत स्पष्ट बहुमत निर्माण झाले आहे.तर राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष तथा नूतन उपनगराध्यक्ष डॉ.अफसर शेख यांना नगराध्यक्ष व उपाध्यक्षपदाचा अनुभव आहे.

**जबाबदारी वाढली**

या निवडणुकीत शहरवासियांनी दिलेला मतदानरुपी कौल आणि अध्यक्ष, उपाध्यक्ष पदावरील अनुभविक उमेदवारामुळे शहरातील समस्यावर शहरवासियांच्या आशा, अपेक्षा वाढल्या आहेत. आपल्या अनुभवाच्या जोरावर अध्यक्ष, उपाध्यक्ष आपली जबाबदारी पुर्ण करतील असा विश्वास बहुमताच्या आकडेवारीतून दिसत असला तरी विरोधकांना टिकेची संधी न देता कार्यकाळ पुर्ण करणे कसोटी ठरणार काय? अशी चर्चा होत आहे.

# उदगीरमध्ये नवनिर्वाचित नगराध्यक्षा, उपनगराध्यक्ष, नगरसेवकांचा सत्कार

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १७ जानेवारी :** येथील नगर परिषदेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व भारतीय जनता पार्टी या युतीला शहरातील जनतेने मोठा विश्वास दाखवून एक हाती सत्ता दिली त्यामुळेच आपण सर्व नगरसेवक एवढ्या मोठ्या संख्येने निवडून आला आहात आता आपल्या सर्वांची जबाबदारी आहे ती शहरातील सर्वसामान्य घटकापर्यंत मूलभूत सुख सुविधा पोहोचविण्याची त्यामुळे सर्व नगरसेवकांनी प्रभागातील सर्वसामान्यांची सेवा करुन लातूर जिल्ह्यात आपल्या उदगीर नगर परिषदेचे नाव मोठे करावे असे मत माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.

ते उदगीर शहरातील उदयगिरी लॉयन्स नेत्र रुग्णालयाच्या सभागृहात आयोजीत लॉयन्स क्लबस इंटरनॅशनल व लॉयन्स क्लब उदगीर, उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्ररुग्णालय, उदगीर द्वारा आयोजित उदगीर नगरपरिषद निवडणुक २०२५ मध्ये निवडून आलेल्या नुतन नगराध्यक्षा व सर्व नुतन नगरसेवकांच्या सत्कार समारंभाप्रसंगी बोलत होते.

यावेळी उदयगिरी लॉयन्स नेत्र रुग्णालयाचे अध्यक्ष डॉ. रामप्रसाद लखोटिया, नगराध्यक्षा सौ. स्वाती हुडे, उपनगराध्यक्षा सौ.शितल शिंदे, प्रदीप बेद्रे, सचिन हुडे, नरसिंग शिंदे, अॅड.बालाजी आदेप्पा, सुभाष वाकुडे, शशिकांत पेन्सलवार, अॅड.व्यंकट मोरे, बालाजी सोलापुरे, प्रभाकर पेन्सलवार, अॅड.राजकुमार नावंदर, डॉ.भाग्यश्री घाळे, डॉ.शेख अजहर, दिपक बलसुरकर, विजयकुमार पाटील, बाबुराव माशाळकर, दशरथ शिंदे, आदींसह नवनिर्वाचित नगरसेवक उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार संजय बनसोडे यांनी, उदगीरच्या विकासासाठी शहरातील जनतेने आपल्या सर्वांवर मोठा विश्वास दाखवून मत रुपी आशीर्वाद दिला आहे. त्यांच्या विश्वासाला तडा न जाऊ देता 'उदगीरला स्मार्ट सिटी व ग्रीन




शहर' करून लातूर जिल्ह्यासह महाराष्ट्रात उदगीर नगर परिषदेचा नावलौकिक आपण सर्व नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांनी करावा अशी अपेक्षा व्यक्त करून उदगीरच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांनी हातात हात घालून एकत्रितपणे काम करा असे आवाहन केले.

यावेळी उदगीर शहरातील प्रतिष्ठित नागरिक विविध सामाजिक संघटनेचे कार्यकर्ते व महिला उपस्थित होते.

## शास्त्री विद्यालयात महिला तक्रार निवारण समितीची बैठक

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १७ जानेवारी :** येथील लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात मुख्याध्यापक संजय कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. यावेळी उप मुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर, पर्यवेक्षक कृष्णा मारावार ,किरण नेमट, समिती सदस्य जेष्ठ पत्रकार रामभाऊ मोतीपवळे, सुरेखा गुजलवार, एकनाथ राऊत शोभा नेत्रगावकर अनिता यलमटे आदी उपस्थित होते.

समिती सचिव शोभा नेत्रगावकर यांनी झालेल्या बैठकीच्या वृत्तांताचे वाचन केले. समिती पालक अनिता येलमटे यांनी मुलींच्या सुरक्षिततेसंदर्भात केलेली उपाययोजना त्याबाबतची माहिती दिली .सुरेखा गुजलवार यांनी तरुण पिढीचे वर्तन व त्याचे होणारे परिणाम याबाबत जागृत राहणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले.तर रामभाऊ मोतीपवळे यांनी बैठकीत सविस्तर मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय समारोपात मुख्याध्यापक संजय कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्या विषयी सुचविले. बैठकीचे आभार अनिता यलमटे यांनी मानले.

# अभियंता रमेश मोरे यांचा वाढदिवस साजरा

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १७ जानेवारी :** १९९० पासून २०१६ पर्यंत सलग २५ वर्षे उदगीर नगर परिषदेत अभियंता म्हणून काम केलेल्या अभियंता रमेश मोरे यांचे उदगीरच्या विकासात हातभार लावणाऱ्या अनेक प्रकल्पमध्ये मोलाचे योगदान लाभले असून आगामी काळातही उदगीरच्या विकासासाठी त्यांचे मार्गदर्शन प्रेरणादायी ठरेल अशा प्रतिक्रिया अभियंता रमेश मोरे यांच्या एकसष्टीनिमित्त आयोजित कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केल्या.

उदगीर नगर परिषदेत अनेक वर्षे अभियंता म्हणून काम केलेले अभियंता रमेश मोरे यांच्या एकसष्टीनिमित्त ललित भवन मंगल कार्यालयात अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक दिलीप पाटील नागराळकर, माजी नगराध्यक्ष बस्वराज बागबंदे, मलकापूरचे सरपंच गुरुनाथ बिरादार, सुधीर भोसले, भाजपचे माजी शहराध्यक्ष तथा नगरसेवक मनोज पुदाले, विजय निटुरे, माजी नगरसेवक रामचंद्र मुक्कावार, अॅड. दत्ताजी पाटील, आनंद बुंदे, रेल्वे संघर्ष समितीचे सचिव मोतीलाल डोईजोडे, बिदर जिल्हा मराठी पत्रकार संघांचे अध्यक्ष दयानंद बिरादार, उदगीर रोटरी क्लबचे सचिव विक्रम हलकीकर,




मलकापूर ग्रा. पं. चे सदस्य महेश तोडकर यांची उपस्थिती होती.

यावेळी मोरे परिवाराच्या वतीने ओंकार मोरे, उमाकांत मोरे, महेश मोरे, बब्रुवान मोरे, प्रभाकर मोरे, सचिन जाधव यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रा. मल्लेश झुंगा स्वामी यांनी केले.

# श्रीराम विद्यालयात खाशाबा जाधव जयंती साजरी

**त.भा. वृत्तसेवा,**

**रेणापूर, १७ जानेवारी :** येथील श्रीराम विद्यालय येथे कुस्तीमध्ये पहिले वैयक्तिक ऑलिंपिक विजेते खाशाबा जाधव यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

ही जयंती राज्य क्रिडादिन म्हणून साजरी करण्यात येते. याप्रसंगी प्राचार्य सिध्देश्वर मामडगे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सतिष मोरे, पर्यवेक्षक अनिल कूटवाड, सांस्कृतिक विभाग प्रमुख अमृतेश्र्वर स्वामी यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

याप्रसंगी बोलताना प्राचार्य सिध्देश्र्वर मामडगे म्हणाले की, खाशाबा जाधव यांनी प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्या काळात भारतासाठी कुस्ती मध्ये ऑलिंपिक स्पर्धेत कास्यपदक मिळवले ही अभिमानाची गोष्ट आहे. खाशाबा जाधव यांच्यासारखे अनेक ऑलिंपिक तयार झाले पाहिजेत. यासाठी विद्यार्थ्यांनी खेळामध्ये उत्साहाने भाग घेतला पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सांस्कृतिक



विभाग प्रमुख अमृतेश्वर स्वामी यांनी केले. याप्रसंगी रेणुका अध्यापक महाविद्यालयाचे अध्यापक, विद्यार्थी व पालक यांची उपस्थिती होती.

# नाथ संस्थानच्या दिंडी, पालखीचे मंगळवारी प्रस्थान

**तभा वृत्तसेवा**

**औसा दि. १७ जानेवारी :** औसा येथील नाथ संस्थानचे सद्गुरु श्री. वीरनाथ मल्लनाथ महाराज व सद्गुरु वीरनाथ-मल्लनाथ महाराज यांच्या पालखी, दिंडीचे श्रीक्षेत्र गोपाळपूरातून प्रस्थान होणार आहे.

या वीस दिवशीय दिंडी पालखी सोहळा पिठाधिपती गुरुबाबा महाराज औसेकर यांच्या अधिपत्याखाली व सद् गुरु गहीनीनाथ महाराज औसेकर यांच्या मागदर्शनाखाली बोरफळ येथील पहिल्या मुक्कामासाठी रवाना होणार आहे.वारकरी, शिष्य व भाविकांनी या सोहळ्यात मंगळवार दि. २० रोजी सहभागी व्हावे.असे आवाहन श्री. श्रीरंग महाराज औसेकर व श्री ज्ञानराज महाराज औसेकर यांनी केले आहे.

महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्र प्रदेश या तीन राज्यातील भाविक भक्त, शिष्य गण, टाळकरी, विणेकरी व हजारो वारकऱ्यांच्या सहभागातून सद् गुरु ज्ञानेश्वर महाराज



औसेकर यांच्या समाधीमंदीर स्थळापासून पालखी दिंडीला सुरुवात होणार असून गोपाळपूर पादुका मार्गे जुन्या बोरफळ रस्त्याने पहिल्या मुक्कामासाठी रवाना होणार आहे.

दि. २१ रोजी दुपारी बेलकुंड येथे विश्रांतीसाठी थांबणार असून दुपारी ४ वाजता वाजता आशिव मार्गे उजनी मुक्कामी राहणार आहे. दि.२२ रोजी सकाळी नांदुर्गा येथे न्याहरी व उमरेगव्हाण येथे विश्राती तर केशेगाव येथे मुक्काम होणार आहे. दि. २३ रोजी धारुर येथे न्याहरी व तुळजापूर येथील आई तुळजाभवानीचे दर्शन घेऊन आळजापुर येथे मुक्काम होणार आहे.

दि.२४ रोजी कासारी काटी मार्गे शेळगांव येथे मुक्काम होणार आहे.दि. २५ रोजी मसले चौधरी येथे दुपारची विश्रांती तर नरखेड येथे मुक्काम होणार आहे. दि. २६ रोजी मलीकपेठ दुपारी विश्रांती तर सारोळे तात्याबाचे येथे मुक्काम होणार आहे. पहाटे २ वाजता पंढरपुर येथे पालखी दिंडीचे प्रस्थान होणार असून पिठाधिपती गुरुबाबां महाराजांचे विठ्ठल रुक्मिणी मंदिरात प्रासादिक चक्रीभजन होणार आहे.याचबरोबर दशमी, एकादशी व द्वादशी या तीन दिवसाच्या मुक्कामात काकडा, भजन, प्रवचन व चक्रीभजन असे दैनंदिन कार्यक्रम होणार आहेत.

शनिवार दि. ३१ जानेवारी रोजी दुपारी ३ ते ५ या वेळेत विठ्ठल रुक्मिणी मंदीरातील राऊकात नाथसंस्थानच्या गुरुपरंपरेचे सदगुरु गुरुबाबा महाराज औसेकर यांचे प्रासादिक चक्रीभजन होणार आहे.

रविवार दि. १ रोजी पालखी दिंडी परतीच्या प्रवासासाठी पंढरपुरातून औशाकडे रवाना होणार आहे. व शनिवार दि. ७ रोजी शनिवारी औसा शहरात नगरप्रदिक्षणा करीत गोपाळपुर येथे पोहंचणार आहे.

रविवार दि ८. रोजी सद् गुरु श्री. दासवीरनाथ महाराज स्थापना आणि गोपाळकालानंतर दिडी पालखी सोहळ्याची सांगता होणार आहे.

## बाळासाहेब सगर यांचे निधन



**उदगीर :** येथील रहिवासी असलेले व लातूर येथील जिल्हा मत्स्य व्यवसाय विकास अधिकारी बाळासाहेब व्यंकटराव सगर (वय ४०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर उदगीर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. पत्रकार भगीरथ सगर यांचे ते बंधू होत.

## माधवराव शेवाळे यांचे निधन



**उदगीर :** तालुक्यातील एकुर्का रोड येथील रहिवाशी व जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त कर्मचारी माधवराव व्यंकटराव शेवाळे (वय ८५ वर्षे) यांचे शुक्रवारी सायंकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शनिवारी त्यांच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, दोन मुले, सुना नातवंडे पतवंडे असा परिवार आहे. छत्रपती संभाजीनगर येथील शहिद भगतसिंग क्रीडा व सांस्कृतिक मंडळाचे सचिव गंगाधर शेवाळे यांचे ते वडील होत.

## धनादेश न वटल्याप्रकरणी आरोपीस सहा महिन्यांची शिक्षा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ जानेवारी -**

धाराशिव येथील लोकमंगल मल्टीस्टेट सोसायटीच्या वतीने आरोपी दिनकर साधू डांगे (रा. गडदेवधरी, ता. धाराशिव) यांच्यावर कर्ज न भरल्याप्रकरणी न्यायालयात खटला दाखल करण्यात आला होता.

फिर्यादी लोकमंगल सोसायटीने सांगितले की, आरोपीने सन २०११ मध्ये ३ लाख रुपये कर्ज घेतले होते. परंतु, कर्जाचा भरणा न केल्याने वसुलीपोटी आरोपीने सन २०१५ मध्ये ५,४८,२००/- रुपयांचा धनादेश दिला होता, जो वटला गेला नाही. सोसायटीने आरोपीला नोटीस पाठवून रक्कम भरण्यास सांगितले असता त्याने भरणा केला नाही. यावरून कलम १३८ नि.ई. ॲक्ट अंतर्गत न्यायालयात खटला दाखल करण्यात आला. सुनावनीत फिर्यादी सोसायटीने कागदोपत्री पुराव्यांवरून आरोपीवरील कर्ज व थकीत रक्कम दाखवली. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी शिवराज पाटील, धाराशिव यांच्या समोर सुनावनीनंतर न्यायालयाने आरोपीला सहा महीने कारावास आणि रु. १२ लाख दंड भरण्याचा आदेश पारित केला.

फिर्यादी लोकमंगल मल्टीस्टेटच्या वतीने ॲड. युवराज खैरे आणि ज्ञानेश्वर जमदाडे यांनी खटल्याचे प्रतिनिधित्व केले.

## संक्षिप्त वृत्त...




### स्वामी विवेकानंद शाळेत सामुदायिक तिळगूळ वाटप

**उमरगा, दि.१७ जानेवारी**

उमरगा येथील स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर येथे मकर संक्रांतीनिमित्त इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना सामुदायिक तिळगूळ वाटप करण्यात आले. हा उपक्रम मुख्याध्यापिका सविता लोहार यांच्या म ार्गदर्शनाखाली सर्व शिक्षकांच्या हस्ते पार पडला. शाळेच्या वतीने दरवर्षी मकर संक्रांतीच्या पावन पर्वानिमित्त सर्व विद्यार्थ्यांना सामुदायिक स्वरूपात तिळगूळ वाटप करून सणाचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवले जाते. यावेळी सहशिक्षक व्यंकट वचणे यांनी मकर संक्रांतीचे भारतीय समाजातील सांस्कृतिक व सामाजिक महत्त्व विद्यार्थ्यांना सोप्या शब्दांत समजावून सांगत मार्गदर्शन केले. कार्यक्रम आनंदी व उत्साही वातावरणात संपन्न झाला.

### मद्यधुंद अवस्थेत ट्रक चालविणाऱ्या चालकावर गुन्हा दाखल

**लोहारा, दि.१७ जानेवारी**

लोहारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत मद्यधुंद अवस्थेत वाहन चालविल्याप्रकरणी एका ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा




दाखल करण्यात आला आहे. आरोपी बद्रोद्दीन वाजीदअली शेख (वय ५५, रा. हिमाल नगर, राजेश्वर, ता. जि. बिदर, कर्नाटक) हा दि.१५ जानेवारी रोजी सायंकाळी ७.१५ वाजता आपल्या ताब्यातील ट्रक क्रमांक K-५६-८८२९ हा लोकमंगल कारखाण्याजवळ, लोहारा बु. येथे मद्यधुंद अवस्थेत चालवत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. याप्रकरणी आरोपीने मोटार वाहन कायदा कलम १८५ चे उल्लंघन केल्याने, पोलिसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरून आरोपीविरुद्ध लोहारा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास लोहारा पोलीस करीत आहेत.

## परंड्यात उधार दारू न दिल्याने बारमध्ये हाणामारी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ जानेवारी -**

दारू उधार देण्याच्या कारणावरून वाद घालत चौघांनी मिळून एकाला लाथाबुक्क्यांनी आणि बिअरच्या क्रेटने मारहाण केल्याची घटना परंडा शहरातील लोकप्रिय बिअर बारमध्ये घडली आहे. याप्रकरणी परंडा पोलीस ठाण्यात चौघांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत पोलीसांकडून मिळालेली माहिती अशी की, आरोपी विश्वास उर्फ बापु अंकुश भानवसे, अशोक मच्छिंद्र भानवसे, महेश मच्छिंद्र भानवसे व रोहित विश्वास भानवसे (सर्व रा. काशीमबाग, परंडा, ता. परंडा, जि. धाराशिव) यांनी दि.१४ जानेवारी रोजी सायं. ७ वाजण्याच्या सुमारास परंडा येथील लोकप्रिय बियरबार येथे फिर्यादी बत्तीनी लक्ष्मण गौड (वय ४९, रा. नरसिंग नगर, परंडा) यांच्यावर हल्ला केला.

फिर्यादीनुसार, दारू उधारीच्या कारणावरून वाद झाल्यानंतर आरोपींनी शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी तसेच क्रॅट व काठीने मारहाण करून फिर्यादीस गंभीर जखमी केले. तसेच जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याचेही फिर्यादीत नमूद आहे.

या प्रकरणी फिर्यादी बत्तीनी गौड यांनी दि.१६ जानेवारी रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास परंडा पोलीस करत आहेत.

## नारंगवाडी येथे धाब्याच्या शेडमध्ये चोरी; २० हजार ५०० रुपयांचा माल लंपास

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१७ जानेवारी -**

उमरगा तालुक्यातील नारंगवाडी येथे अज्ञात चोरट्यांनी धाब्याच्या पत्र्याच्या शेडम ध्ये घुसखोरी करून तांदूळ, किराणा साहित्य व बकरे असा एकूण २० हजार ५०० रुपयांचा माल चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.

याबाबत फिर्यादी शंकर दामु मुगळे (वय ४०, रा. नारंगवाडी, ता. उमरगा, जि. धाराशिव) यांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.१४ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजल्यापासून ते दि.१५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ६ वाजेपर्यंतच्या कालावधीत अज्ञात व्यक्तीने त्यांच्या धाब्याच्या पत्र्याच्या



शेडच्या पाठीमागील पत्रा कापून आत प्रवेश केला. यावेळी एक तांदळाचा कट्टा, 'किर्ती गोल्ड'चा एक डब्बा तसेच बकरे असा एकूण २०,५०० रुपयांचा माल चोरून नेण्यात आला. या प्रकरणी फिर्यादी शंकर मुगळे यांनी दि.१५ जानेवारी रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास उमरगा पोलीस करीत आहेत.

## तुळजापूर येथील लॉजवरून महागडे कॅमेरे व आयफोन चोरीस

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१७ जानेवारी -**

तुळजापूर शहरातील दसरा एक्झिक्युटिव्ह लॉजवरून सुमारे ८ लाख ९४ हजार ८९५ रुपये किमतीचे कॅमेरे व मोबाईल चोरीस गेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत तुळजापूर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, नागय्या बसय्या मंडी (वय ३१, रा. चक्रकट्टा हनुमंत मंदिराजवळ, गाजीपूर, कलबुर्गी, ता. कलबुर्गी) हे दि.१५ जानेवारी रोजी सायंकाळी ६.४५ ते ७ वाजण्याच्या दरम्यान तुळजापूर येथील दसरा एक्झिक्युटिव्ह लॉज येथे थांबले असताना, त्यांच्या मालकीचे मौल्यवान साहित्य चोरीस गेले.

चोरीस गेलेल्या साहित्यामध्ये कॅनन डिजिटल कॅमेरा EOS R5 MK II बॉडी, सोनी कॅमेरा मॉडेल ILCE-7M4/BQ (SR नं. ८४६२७७६), सिग्मा 85mm १.४ DG DN लेन्स, सिग्मा 50mm DG DN लेन्स, रिअर फिल्टर होल्डर RF 35mm F1.4 LVCM² केस, तसेच आयफोन यांचा समावेश आहे.

या प्रकरणात आरोपी म्हणून कार्तिक ए स. (रा. तिरुपती जिल्हा, सेलम राज्य, आंध्रप्रदेश) याचे नाव नमूद करण्यात आले आहे. फिर्यादीच्या तक्रारीवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात दि.१६ जानेवारी रोजी गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पुढील तपास तुळजापूर पोलीस करीत आहेत.

## भाजप नगरसेवकांनी घेतले आई तुळजाभवानीचे आशीर्वाद

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१७ जानेवारी -**

भारतीय जनता पक्षाच्या जिल्ह्यातील नवनियुक्त नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष व नगरसेवक यांनी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राची आराध्य दैवत आई तुळजाभवानी मातेचे दर्शन घेतले आणि तिचे आशीर्वाद प्राप्त केले.

या पवित्र दर्शनातून जिल्ह्यातील जनतेच्या सेवेसाठी, विकासासाठी आणि सुशासनासाठी कार्य करण्याची प्रेरणा मिळाली. नुकत्याच पार पडलेल्या नगर पालिका निवडणुकीत भाजपला मिळालेल्या भरघोस जनसमर्थनला या उपस्थितींनी केवळ निवडणूक निकाल म्हणून नाही, तर जनतेने दिलेला ठाम विकासाचा आदेश म्हणून घेतले.



कार्यक्रमात बोलताना नवनिर्वाचित नगरसेवकांनी सांगितले की, शहरांचा सर्वांगीण विकास, मूलभूत सुविधा, पारदर्शक प्रशासन, भ्रष्टाचारमुक्त कारभार आणि नागरिकांच्या सम स्यांना प्राधान्य देणारी धोरणे ही जनतेची अपेक्षा असून, त्यासाठी भाजप नेतृत्वाखालील केंद्र व राज्य सरकारच्या लोकाभिमुख योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे ही आमची जबाबदारी आहे.

यावेळी मा.आ. सुजितसिंह ठाकूर, दत्ताभाऊ कुलकर्णी, नितीन काळे, मल्हार पाटील यांच्यासह भाजपाचे प्रमुख पदाधिकारी, नवनिर्वाचित नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक आणि असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## वाढदिवसाचा खर्च टाळून शाळेची रंगरंगोटी; आदर्श शिक्षिका वर्षा चौधरी यांचा प्रेरणादायी उपक्रम

**लोहारा, दि.१७ जानेवारी -**

लोहारा तालुक्यातील मार्डी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या आदर्श शिक्षिका वर्षा चौधरी यांनी वाढदिवसाचा खर्च टाळत संपूर्ण शाळेची रंगरंगोटी करून समाजासमोर एक प्रेरणादायी आदर्श उभा केला आहे. खर्चिक समारंभांऐवजी शाळेसाठी केलेली ही कृती शिक्षणाविषयीची आस्था, विद्यार्थ्यांप्रतीचे प्रेम आणि शिक्षकाची सामाजिक जबाबदारी अधोरेखित करणारी ठरली आहे.

या रंगरंगोटीमुळे शाळेचे रूप तर बदललेच, पण विद्यार्थ्यांम ध्ये आत्मविश्वास वाढला असून शाळेबद्दलची आपुलकीही दृढ झाली आहे. ग्रामीण शाळांमधील मर्यादित सुविधा असतानाही ही शाळा माझीच आहे या भावनेतून केलेला हा उपक्रम ग्रामस्थांमध्ये विशेष कौतुकाचा विषय ठरला आहे. वर्षा चौधरी यांचा हा उपक्रम इतर शिक्षकांसाठी प्रेरणास्थान ठरत असून, शिक्षण हे आनंददायी आणि शाळा आपली वाटावी हा संदेश त्यांनी कृतीतून दिला आहे.

## काळनिंबाळा येथे 'शेतकरी शेती शाळा' संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१७ जानेवारी -**

वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट यांच्या आयोजनात आणि टाटा कम्युनिकेशनच्या अर्थसहाय्याने काळनिंबाळा येथे 'शेतकरी शेती शाळा' उत्साहात पार पडली.

कार्यक्रमाची सुरुवात खंडू पांढरे यांनी प्रास्ताविक करून केली. त्यांनी संस्थेची माहिती देत, राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती उपस्थित शेतकऱ्यांना दिली. त्यानंतर विठ्ठल ढवळे यांनी नैसर्गिक संसाधनांच्या विकासाद्वारे ग्रामीण समुदायाचे सक्षमीकरण या प्रकल्पाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. यात सेंद्रिय शेती, फळबाग लागवड, महिला सक्षम ीकरणासाठी उपजीविकेच्या संधी, पाणलोट विकास, तसेच ठिबक व तुषार सिंचन तंत्रज्ञानाचा वापर यांचा समावेश होता. शेतकऱ्यांना ऋीाझीशलळीश ॲपच्या वापराबाबत मार्गदर्शनही करण्यात आले.

सेंद्रिय शेतीच्या प्रशिक्षणात माती परीक्षण, बियाण्यांची उगवण क्षमता तपासणी, योग्य पेरणी पद्धती, बीजप्रक्रिया, वेस्ट डीकंपोझर, ड-९ कल्चर, जीवामृत, दशपर्णी अर्क, पक्षीथांबे, सापळा पिके, निंबोळी अर्क, गांडूळ खत यांचा उपयोग स्पष्ट केला गेला. यासोबतच एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन व अन्नद्रव्य व्यवस्थापनाचे फायदे सांगितले गेले. कार्यक्रमाला सरपंच सत्यपाल सूर्यवंशी, सोम शंकर नवटाके, ज्ञानेश्वर बिराजदार, दयानंद स्वामी यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

याप्रसंगी लायकसिंग चव्हाण, रमेश टीकांबरे, संजय पाटील, माणिक कुंभार, गहिनीनाथ सुरवसे, ज्ञानेश्वर दासमे, शिवाजी कुंभार, मधुकर रानमळे, नागप्पा बडूरे, यशवंत बिराजदार, देविदास कुलकर्णी, मारुती कुडकल यांसह मोठ्या संख्येने शेतकरी बांधव सहभागी झाले.

## उपनगराध्यक्ष निवडणुकीत गुलाल उधळल्याचा कारणावरुन परंड्यात हाणामारी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ जानेवारी -**

उपनगराध्यक्ष निवडणूकीच्या वेळी गुलाल उधळल्याच्या जुन्या कारणावरून एका व्यक्तीला काठीने गंभीर मारहाण केल्याची घटना परंडा शहरात घडली आह. याप्रकरणी एका विरोधात परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, आरोपी गौस उर्फ टॅगो मुक्तार शेख (रा. सिकलकर गल्ली, परंडा, ता. परंडा, जि. धाराशिव) याने दि.१४ जानेवारी रोजी रात्री ९.३० वाजण्याच्या सुमारास कुर्डूवाडी रोडवरील शिवरत्न हॉटेल, परंडा येथे फिर्यादी कलीम उत्ताउर रहेमान मुजावर (वय ४८, रा. सोमवार गल्ली, परंडा) यांच्यावर



हल्ला केला.

फिर्यादीनुसार, उपनगराध्यक्ष निवडणुकीत गुलाल उधळण्याच्या कारणावरून वाद झाला. त्यानंतर आरोपीने शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी व काठीने मारहाण करून फिर्यादीस गंभीर जखमी केले. तसेच जीवे ठार मारण्याची धमकी दिली व मोबाईल फोन फोडून नुकसान केले.

या प्रकरणी फिर्यादी कलीम म ुजावर यांनी दि.१६ जानेवारी रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास परंडा पोलीस करत आहेत.

## श्री श्री रविशंकर विद्यामंदिरमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१७ जानेवारी -**

उमरगा शहरातील श्री श्री रविशंकर विद्यामंदिर येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चे वार्षिक स्नेहसंमेलन अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा डॉ. दीपा म ोरे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून उमरगा नगरपरिषदेचे नगराध्यक्ष किरण गायकवाड आणि नगरसेवक शफीभाई चौधरी उपस्थित होते. यांप्रसंगी संस्थेचे संचालक डॉ. सुरेश चव्हाण, डॉ. उदय मोरे, प्रा. सुनंदा महाजन, डॉ. रेणुका मोरे यांनी प्रमुख उपस्थिती लाभली.

सेमी इंग्रजी व CBSE विभागातील विद्यार्थ्यांनी नृत्य, नाटिका व गीतांच्या माध्यम ातून आपल्या सुप्त कलागुणांचे सादरीकरण केले. सामाजिक प्रबोधन, निसर्ग संवर्धन, देशभक्ती, संस्कार तसेच शेतकरी - जगाचा पोशिंदा या विषयावर आधारित नाटक आणि हिंदी-मराठी गीतांनी उपस्थित पालक व मान्यवरांचे लक्ष वेधले.विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांकडून भरभरून दाद मि ळाली, आणि संपूर्ण परिसरातून कार्यक्रमाचे कौतुक होत होते. याप्रसंगी अमृत मोरे, डिंगबर कुलकर्णी, सागर हिरानाथ, गणपत देवकर, माधुरी मडीवळे, संगमेश्वर केदारे, सचिन सूर्यवंशी, उमेश इंगोले, राजेंद्र पोतदार, सुधा भोसले यांच्या आदि उपस्थित होते.

## रुईभर येथे इंदिरा गांधी प्राथमिक शाळेतील चिमुकल्यांचा आनंद मेळावा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ जानेवारी -**

डॉ. आंबेडकर बाल शिक्षण संस्था अंतर्गत येणाऱ्या इंदिरा गांधी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा आनंद मेळावा दि. १७ जानेवारी रोजी उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे उद्घाटन जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य जयप्रकाश कोळगे यांच्या हस्ते करण्यात आले.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधावा या उद्देशाने हा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात खेळ, कला, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच व्यावहारिक शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थ व वस्तूंचे स्टॉल्स उभारले होते. यामुळे त्यांना कमवा आणि शिका या संकल्पनेची ओळख झाली, आत्मविश्वास वाढला तसेच पालक व शिक्षक यांच्यातील समन्वय अधिक दृढ झाला.

अशा मेळाव्यांमधून विद्यार्थ्यांम ध्ये आत्मविश्वास, व्यावहारिक ज्ञान आणि सृजनशीलतेला चालना मिळते.

हा मेळावा केवळ उत्सव न राहता, मुलांच्या उज्वल भविष्यासाठी आवश्यक कौशल्ये व मूल्ये शिकवणारा एक प्रभावी मंच ठरला. मेळाव्यात विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद स्पष्टपणे दिसून येत होता आणि संपूर्ण वातावरण अत्यंत उत्साही व दैदीप्यमान झाले होते. या मेळाव्यात सुमारे २५ हजार रुपयांची उलाढाल झाली.

या आनंद मेळाव्याचा आस्वाद घेण्यासाठी प्राचार्य जयप्रकाश कोळगे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, श्री स्वामी समर्थ कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष कपाळे, इंदिरा गांधी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे यांच्यासह मोठ्या संख्येने पालक वर्ग, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## बावची विद्यालय व वसंतराव शंकरराव काळे कनिष्ठ महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१७ जानेवारी -**

परंडा येथील बावची विद्यालय व वसंतराव शंकरराव काळे कनिष्ठ म हाविद्यालय मध्ये शासनाच्या सूचनांनुसार दि.१७ जानेवारी रोजी माजी विद्यार्थी म ेळावा उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात पार पडला. शासनाने शाळा व महाविद्यालय स्तरावर माजी विद्यार्थी संघ स्थापन करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी मेळावे आयोजित करण्याचे निर्देश दिले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे प्राचार्य नारायण खैरे होते. प्रमुख उपस्थितीम ध्ये वजीद पठाण, सचिन मोरे, प्रमोद डोके, विकास वाघमारे, शुभम रोडगे, प्रभाकर मिरगणे, दत्तात्रय थोरात यांच्यासह विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व



शिक्षकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य नारायण खैरे यांनी शासनाच्या धोरणांची माहिती देत माजी विद्यार्थी संघाची भूमिका स्पष्ट केली.

शिक्षणासोबतच शिस्त, संस्कार, परिश्रम, सामाजिक बांधिलकी आणि शाळेबद्दल कृतज्ञतेची भावना विद्यार्थ्यांम ध्ये रुजविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच माजी विद्यार्थ्यांनी शाळेच्या प्रगतीसाठी सर्वतोपरी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी विकास वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना करिअर, स्पर्धा परीक्षा, व्यक्तिमत्त्व विकास व मूल्यशिक्षण याबाबत मौल्यवान मार्गदर्शन केले. माजी विद्यार्थ्यांमधून अजिक्य कोळगे, सुजित रोडगे व प्रविण गायकवाड यांनी शाळेतील आठवणींना उजाळा दिला व विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी संदेश दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धोंडीराम दुधे यांनी शिस्तबद्ध पद्धतीने केले. प्रस्तावना संजय वलेकर यांनी करताना माजी विद्यार्थी संघाचे महत्त्व स्पष्ट केले.

नागनाथ काळदाते यांनी कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवर, माजी विद्यार्थी, शिक्षकवर्ग व विद्यार्थ्यांचे आभार मानून सांगता केली.

या मेळाव्यामुळे माजी व सध्याच्या विद्यार्थ्यांमध्ये संवाद, एकोपा व आपुलकी निर्माण झाली असून, विद्यार्थ्यांमध्ये आत्म विश्वास व प्रेरणा वाढल्याचे उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## सावरगाव येथे शेतीच्या वाटणीवरून भावावर कोयत्याने वार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ जानेवारी -**

तुळजापूर तालुक्यातील सावरगाव येथे जमिनीच्या वाटणीच्या जून्या वादातून एका तरूणावर कोयत्याने वार करून जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. याप्रकरणी तामलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, आरोपी वैभव उर्फ शंकर विश्वनाथ लिंगफोडे (वय २४, रा. सावरगाव, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) याने दि. १४ जानेवारी रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास सावरगाव येथे फिर्यादी चैतन्य रघुनाथ लिंगफोडे (वय २५, रा. सावरगाव) यांच्यावर हल्ला केला.

फिर्यादीनुसार, शेती वाटणीच्या जुन्या भांडणाच्या कारणावरून आरोपीने शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी व कोयत्याने मारहाण करून चैतन्य लिंगफोडे यांना गंभीर जखमी केले. या प्रकरणी फिर्यादीने दि. १६ जानेवारी २०२६ रोजी दिलेल्या वैद्यकीय जबाबावरून तामलवाडी पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम १०९ व ३५२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

तपासादरम्यान मिळालेल्या माहितीनुसार तामलवाडी पोलिसांनी आरोपी वैभव उर्फ शंकर विश्वनाथ लिंगफोडे यास अटक केली असून, गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### समरजितसिंह ठाकूर यांचा रुपामाता परिवाराच्या वतीने सत्कार

**धाराशिव, दि.१७ जानेवारी -**

परंडा नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी समरजितसिंह ठाकूर यांची निवड झाल्याबद्दल परंडा येथे त्यांचा औपचारिक सत्कार करण्यात आला. मा.आ. सुजितसिंह ठाकूर यांचे सुपुत्र असलेल्या समरजितसिंह ठाकूर यांनी जनशक्ती नगर विकास आघाडीचे उमेदवार म्हणून ही जबाबदारी स्वीकारली आहे. याप्रसंगी रुपामाता उद्योग समूहाचे चेअरमन व भाजपाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य ॲड. व्यंकटराव गुंड-पाटील (रुपामाता परिवार, धाराशिव) तसेच जिल्हा परिषद, धाराशिवचे माजी उपाध्यक्ष सुधाकर गुंड (गुरुजी) यांनी समरजितसिंह ठाकूर यांची सदिच्छा भेट घेत पुष्पहार अर्पण करून अभिनंदन केले. त्यांच्या भावी राजकीय व सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा व आशीर्वाद व्यक्त करण्यात आले. यावेळी ॲड. गुंड-पाटील यांनी उपनगराध्यक्षपदाच्या माध्यमातून परंडा शहराच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

### नळदुर्ग नगरपालिकेच्या स्वीकृत सदस्यपदी सुधीर पोतदार यांची निवड

**नळदुर्ग, दि.१७ जानेवारी -**

नळदुर्ग नगरपालिका निवडणुकीत काँग्रेस पक्षाने नेते अशोक जगदाळे यांच्या नेतृत्वाखाली २० पैकी ९ जागा जिंकत भक्कम उपस्थिती नोंदवली आहे. दि.१६ जानेवारी रोजी पार पडलेल्या उपनगराध्यक्ष व स्वीकृत सदस्यांच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाकडून स्वीकृत सदस्यपदासाठी जगदाळे समर्थक व सुधीर पोतदार यांना उमेदवारी देण्यात आली होती. या निवडणुकीत सुधीर पोतदार यांची नळदुर्ग नगरपालिकेच्या स्वीकृत सदस्यपदी निवड जाहीर झाली. सामाजिक बांधिलकी, निर्भीड पत्रकारिता आणि जनहितासाठी केलेले कार्य ही त्यांची ओळख असून, स्वीकृत सदस्यपदी निवड झाल्याने शहरवासीयांकडून त्यांचे स्वागत व अभिनंदन करण्यात येत आहे.



### तालुका विधिज्ञ मंडळ निवडणुकीत ॲड. जयवंत इंगळे अध्यक्षपदी विजयी

**तुळजापूर, दि.१७ जानेवारी -**

तुळजापूर तालुका विधिज्ञ मंडळ यांच्या निवडणुकीत ॲड. जयवंत इंगळे यांच्या पॅनलने दणदणीत विजय मिळवला. अध्यक्ष पदासाठी झालेल्या निवडणुकीत ॲड. जयवंत शिवाजीराव इंगळे यांना ८७ मते मिळाली, तर विरोधक ॲड. विवेक हिरोळीकर यांना ५९ मते पडली. एकूण मतदान १४८ झाले असून, २८ मतांनी ॲड. इंगळे विजयी झाले. उपाध्यक्ष पदासाठी ॲड. अंजली साबळे बिनविरोध निवडून आल्या. निवडणुकीत ॲड. टी.बी. जगताप निवडणूक अधिकारी, तसेच सहाय्यक अधिकारी ॲड. बालाजी देशमाने, ॲड.एस.एल. कापसे, ॲड.एस.बी. गायकवाड, ॲड. दिपक हुंडेकर, ॲड. हंगरगेकर यांनी काम पाहिले.

### अवैध मद्यसाठा जप्त, गुन्हा दाखल

**धाराशिव, दि.१७ जानेवारी -**

धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत अंबेजवळगे-सोनेगाव रोडच्या बाजूला कारवाई करण्यात आली. या कारवाईत भिमराव गोफणे याच्याकडून अवैध विक्रीच्या उद्देशाने ठेवलेल्या देशी-विदेशी दारूच्या २० सिलबंद बाटल्या जप्त करण्यात आल्या.

# तेरखेडा जिल्हा परिषद गटात केशव सावंत की विकी चव्हाण; तिकीट कुणाच्या गळ्यात, 'घड्याळा'ची एन्ट्री होणार का?




**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१७ जानेवारी -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील पारा-पारगाव-तेरखेडा जिल्हा परिषद गट यंदाच्या निवडणुकीत सर्वाधिक चर्चेत आला असून, मिनी मंत्रालय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीत मोठा राजकीय भूकंप होण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख जवळ येत असताना उमेदवारांची धावपळ वाढली आहे, मात्र पक्षांतील अंतर्गत तिढा अद्याप सुटलेला नाही. पारगाव आणि पारा हे दोन्ही गट महिला राखीव असून तेरखेडा जिल्हा परिषद गट खुला सुटल्याने येथे निर्णायक आणि अत्यंत लक्षवेधी लढत होणार आहे.

### शिंदे गटात बंडाची ठिणगी; खामकर बाहेर पडणार का?

सध्या या गटात शिवसेना शिंदे गट विरुद्ध अजित पवार गट राष्ट्रवादी काँग्रेस असा थेट सामना रंगण्याची शक्यता असून, बैठका, कार्यकर्त्यांची पळापळ आणि मतदारसंघात गाड्यांची गर्दी वाढल्याने राजकीय वातावरण तापले आहे. शिंदे गटाकडून केशव सावंत, विकी चव्हाण आणि बिभीषण खामकर हे तिन्ही दिग्गज नेते उमेदवारीसाठी इच्छुक असून तिघेही आपापल्या ताकदीवर मैदानात उतरले आहेत.

दरम्यान, बिभीषण खामकर नाराज असल्याची जोरदार चर्चा असून उमेदवारीबाबत स्पष्ट संकेत न मिळाल्याने ते अस्वस्थ असल्याचे बोलले जात आहे, त्यामुळे ते शिंदे गटाला जय महाराष्ट्र करणार का? की वरिष्ठ नेते त्यांची मनधरणी करतील याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

या सगळ्या घडामोडींमध्ये केशव सावंत की विकी चव्हाण हा प्रश्न केंद्रस्थानी आला असून विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत आमदार तानाजी सावंत यांच्या विजयासाठी सर्वाधिक लीड मिळवून देण्यात विकी चव्हाण यांचे मोठे योगदान होते अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे, त्यामुळे शेवटी तिकीट विकी चव्हाण यांना दिले जाईल अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. दुसरीकडे अजित पवार गटाचा उमेदवार अद्याप पडद्याआडच असून योग्य टायमिंग साधून नाव जाहीर करण्याची रणनिती आखली जात असल्याची माहिती आहे, याच पार्श्वभूमीवर नाराज खामकर शिंदे गटाची साथ सोडून घड्याळ हाती घेऊन राष्ट्रवादीकडून थेट विरोधी उमेदवार म्हणून मैदानात उतरतील का याचीही जोरदार चर्चा सुरू आहे.

दरम्यान आ. तानाजी सावंत यांनी वाशी तालुक्यातील तेरखेडा जि.प गटातील इंदापूर येथील १३ वर्षांपासून बंद असलेला नरसिंह साखर कारखाना भैरवनाथ समूहाकडे घेतल्याने परिसरातील शेतकरी, ऊसतोड मजूर आणि व्यावसायिकांमध्ये नव्या अपेक्षा निर्माण झाल्या असून या मुद्द्याचा थेट परिणाम निवडणुकीवर होऊ शकतो.

एकंदरीत नाराजी, बंडखोरी, गुप्त रणनिती, केशव-विकी संघर्ष आणि शिंदे-राष्ट्रवादी सामना यामुळे तेरखेडा जिल्हा परिषद गटाची निवडणूक धाराशिव जिल्ह्यातील सर्वात रंगतदार, चर्चेची आणि निर्णायक ठरणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

## मुरूम येथे नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.१७ जानेवारी -**

मुरूम येथील नगर शिक्षण मंडळ अंतर्गत असलेल्या नूतन प्राथमिक शाळेच्या वतीने नवनिर्वाचित नगराध्यक्ष व भारतीय जनता पार्टीचे नेते बापुराव पाटील तसेच नवनिर्वाचित नगरसेवक व नगरसेविकांचा सत्कार सोहळा शनिवारी उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नूतन प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक राजशेखर कोरे होते. यावेळी युवानेते शरण पाटील, उपनगराध्यक्ष रमेश चव्हाण, नगर शिक्षण मंडळाचे सचिव व्यंकटराव जाधव, संचालक राजेंद्र भोसगे, पालिका गटनेते गणेश अंबर, नगरसेवक गौस शेख, रूपचंद गायकवाड, राजेंद्र बेंडकाळे यांच्यासह सर्व नगरसेवक व नगरसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रसंगी युवानेते शरण पाटील, प्रतिभा निकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य उल्हास गुरगुरे तसेच मुख्याध्यापक इरफान मुजावर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप राजशेखर कोरे यांनी केला.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक बळीराम गंगणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रेमनाथ आपचे यांनी मानले. या सत्कार सोहळ्यास शहर व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## शेतीत वाटेकरी होऊ नये म्हणून अल्पवयीन मुलाकडून वडिलांचा खून

### मानेवाडी येथे धक्कादायक घटना...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१७ जानेवारी -**

तुळजापूर तालुक्यातील मानेवाडी येथे शेतीत दुसरा वाटेकरी होऊ नये, या संशयातून १७ वर्षीय अल्पवयीन मुलाने आपल्या वडिलांच्या डोक्यात दगड घालून खून केल्याची धक्कादायक घटना दि. १६ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, याप्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, मानेवाडी ता. तुळजापूर येथील महीपती आंबाजी सुरवसे (वय ४५) यांनी पहिल्या पत्नीच्या निधनानंतर इराप्पा या महिलेशी दुसरा विवाह केला होता. पहिल्या पत्नीपासून त्यांना धुळप्पा हा मुलगा आहे. वडिलांनी दुसरा विवाह केल्यानंतर सावत्र आई इराप्पा हिचे कुटुंबनियोजनचे ऑपरेशन न केल्याने, भविष्यात अपत्य होऊन शेतीत दुसरा वाटेकरी निर्माण होईल, असा संशय धुळप्पा याच्या मनात होता. याच कारणावरून तो वडिलांवर राग धरून होता.




दि.१६ जानेवारी रोजी सकाळी सुमारे ६ वाजता धुळप्पा हा अणदुर शिवारातील चिकणी तांडा येथील शेतात गव्हाला पाणी देण्यासाठी गेला होता. त्यानंतर दुपारी त्याचे वडील महीपती सुरवसे हे त्याच्यासाठी जेवणाचा डबा घेऊन शेतात गेले. सायंकाळी सुमारे ५.३० वाजण्याच्या सुमारास वडील-मुलामध्ये वाद झाला. या वादातून संतप्त झालेल्या धुळप्पा याने वडिलांच्या डोक्यात दगड घालून त्यांचा खून केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या प्रकरणी लक्ष्मीबाई आंबाजी सुरवसे यांनी नळदुर्ग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक सचिन यादव यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. आरोपी अल्पवयीन असल्याने त्याला ताब्यात घेऊन अटक करण्यात आली आहे. घटनास्थळी अप्पर पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी, तसेच पोलीस निरीक्षक सचिन यादव आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक सोळुंके यांनी भेट दिली.

या प्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात आरोपी धुळप्पा महीपती सुरवसे (वय १७) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक सचिन यादव हे करीत आहेत.

## परंड्यात विनापरवाना तलवार बाळगल्याप्रकरणी एकावर गुन्हा दाखल

**परंडा, दि.१७ जानेवारी -**

परंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा प्रकारे विनापरवाना लोखंडी तलवार बाळगल्याप्रकरणी एका व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी जनार्धन गोरवे (वय ३६, रा. कौडगाव, ता. परंडा) यास दि.१६ जानेवारी रोजी सकाळी १०.३० वाजता कौडगाव येथील बसस्थानक चौकात बेकायदेशीररित्या सुमारे ५०० रुपये किंमतीची लोखंडी तलवार जवळ बाळगताना परंडा पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलिस पथकाने सदर तलवार जप्त केली असून, फिर्यादी राहुल चतुर्भुज खताळ यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरून आरोपीविरुद्ध शस्त्र कायद्यानुसार तसेच मपोका कलम १३५ अन्वये परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने नुतन नगराध्यक्ष, नगरसेवक व पत्रकारांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१७ जानेवारी -**

नळदुर्ग शहरातील वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने दि. १७ जानेवारी रोजी नळदुर्ग नगरीचे नुतन नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, सर्व नगरसेवक तसेच शहरातील पत्रकारांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.



नळदुर्ग शहरातील मल्लिकार्जुन मंदिराच्या सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमास नगराध्यक्ष बसवराज धरणे, उपनगराध्यक्ष नय्यरपाशा जागीरदार, भाजपचे नगरपालिकेतील गटनेते दत्तात्रय दासकर, उपगटनेते तानाजी जाधव, काँग्रेसचे गटनेते मारुती खारवे, उपगटनेते आकाश कुलकर्णी यांच्यासह नगरसेवक सुधीर पोतदार, पांडुरंग पुदाले, निरंजन राठोड, रीजवान काजी, इमाम शेख, अब्दुल गफूर कुरेशी, प्रविण गायकवाड तसेच नगरसेविका मिनाक्षी काळे, राणी सुरवसे, अपर्णा बेडगे, सुमनबाई ठाकुर, कमलबाई गायकवाड उपस्थित होते.

यावेळी ॲड. अरविंद बेडगे, ॲड. धनंजय धरणे, किशोर नळदुर्गकर यांच्यासह पत्रकार सुहास येडगे, विलास येडगे, उत्तम बनजगोळे, दादासाहेब बनसोडे, आयुब शेख, अजित सुरवसे यांचा वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

सध्या शहरातील पाण्याचा प्रश्न गंभीर असून आठ दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. यामध्ये सुधारणा करून किमान तीन दिवसाआड पाणीपुरवठा व्हावा, अशी मागणी त्यांनी केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वीरशैव लिंगायत समाजाचे सल्लागार व माजी नगरसेवक दत्तात्रय कोरे यांनी केले.

## मंगरुळ येथे एकाच रात्री पाच ठिकाणी सलग चोरी

### परिसरात भीतीचे वातावरण

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.१७ जानेवारी -**

तुळजापूर तालुक्यातील मंगरुळ येथे गुरुवार, दि.१५ जानेवारी रोजी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी अक्षरशः धुमाकूळ घालत चार पान टपऱ्या व एका बिअर शॉपीवर सलग चोरी केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. या घटनेत चोरट्यांनी शटर फोडून हजारो रुपयांची रोकड, साहित्य व बिअर लंपास केल्याने मंगरुळ परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांतून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, तुळजापूर-अक्कलकोट मुख्य रस्त्यालगत असलेल्या व्यावसायिक आस्थापनांनाच चोरट्यांनी लक्ष्य केले. येथील शंकर जांभळे, विक्रम हजारे, दिलीप धूरगुडे व संजय राजमाने यांच्या पान टपऱ्या तसेच अमर लबडे यांची बिअर शॉपी अशा एकूण पाच ठिकाणी चोरट्यांनी एकाच रात्री निर्भयपणे हात साफ केला.

मध्यरात्रीच्या सुमारास लोखंडी हत्यारांच्या सहाय्याने शटरची कुलपे तोडण्यात आली. प्रत्येक पान टपरीतून अंदाजे चार ते पाच हजार रुपयांची रोकड, सिगारेट, गुटखा, तंबाखू आदी साहित्य चोरट्यांनी लंपास केले. तसेच बिअर शॉपीमधून १५ ते २० बिअरच्या बाटल्या व रोख चिल्लर रक्कम चोरीस गेली आहे. प्राथमिक अंदाजानुसार ही चोरी चार ते पाच अज्ञात चोरट्यांनी केल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सकाळी नेहमीप्रमाणे दुकाने उघडण्यासाठी आले असता शटर तुटलेल्या अवस्थेत दिसताच व्यावसायिकांची एकच धावपळ उडाली. काही वेळातच ही माहिती वाऱ्यासारखी पसरली आणि ग्रामस्थ घटनास्थळी जमा झाले. एकाच रात्री पाच ठिकाणी झालेल्या चोरीमुळे लहान व्यावसायिक आर्थिक संकटात सापडले असून त्यांची रोजीरोटी धोक्यात आली आहे. मंगरुळ गावात अलीकडच्या काळात चोरीच्या घटनांचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. यापूर्वीही शेतकऱ्यांचे पीक, जनावरे तसेच शेतीसाठी लागणारे साहित्य चोरीस गेल्याच्या घटना घडल्या आहेत. मात्र, त्या प्रकरणांचा आजपर्यंत ठोस छडा लागलेला नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे. चोरट्यांना कोणाचीही भीती उरलेली नाही.




रात्रीच्या वेळी पोलीस गस्त नसल्याचा गैरफायदा घेत हे प्रकार वाढत आहेत, अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिक नागरिक व्यक्त करीत आहेत. चोरीच्या घटना वारंवार घडत असतानाही दोषींवर कारवाई होत नसल्याने पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षम तेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. या घटनेनंतर ग्रामस्थांनी रात्रीची पोलीस गस्त वाढवावी, संशयितांवर बारकाईने नजर ठेवावी, तसेच परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी करून चोरट्यांचा तातडीने शोध घ्यावा, अशी जोरदार मागणी केली आहे. लहान व्यावसायिकांनीही सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आणत प्रशासनाकडे ठोस उपाययोजना राबविण्याची मागणी केली आहे.

दरम्यान, या प्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून घटनास्थळी पाहणी करण्यात येत आहे. मात्र, एकाच रात्री पाच ठिकाणी घडलेली ही चोरी पोलिसांसाठी मोठे तपासाचे आव्हान ठरणार असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

## सहाव्या पंधरवाड्यातील ऊस बिल शेतकऱ्यांच्या खात्यात जमा : चेअरमन पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ जानेवारी -**

सहाव्या पंधरवाड्यात आलेल्या ऊसाचे ४ कोटी ६२ लाख ५५ हजार ७३७ रुपये इतके बिल शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आल्याची माहिती एनव्हीपी शुगरचे चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील यांनी दिली.

तालुक्यातील जागजी शिवारातील एनव्हीपी शुगरच्या वतीने चाचणी गळीत हंगामापासून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अवघ्या पंधरा दिवसांत ऊसाचे बिल अदा करण्याची परंपरा सुरू करण्यात आली आहे. द्वितीय गळीत हंगाम २०२५-२६ मधील सहाव्या पंधरवाड्यात १ जानेवारी ते १५ जानेवारी २०२६ या कालावधीत ऊस पुरवठा केलेल्या सर्व शेतकऱ्यांचे बिल प्रति टन २७०० रुपये दराने दि.१६ जानेवारी २०२६ रोजी थेट संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आले आहे. ज्या शेतकऱ्यांनी उस्मानाबाद जनता सहकारी बँकेचे खाते दिले आहे, त्यांनी बँकेत जाऊन आपले बिल घ्यावे. तसेच ज्यांनी खाते दिलेले नाही, अशा शेतकऱ्यांनी पवनराजे लोकसमृद्धी मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., धाराशिव येथे जाऊन आपले बिल घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

यावेळी चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील यांनी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी कारखान्यास ऊस देऊन सहकार्य करावे, असे आवाहन केले.